**२० व्या पक्ष परिषदेसाठी**
**राजकीय ठरावाचा मसुदा**
**(१७ ते २० जानेवारी, २०१२ रोजी झालेल्या**
**केंद्रीय समितीच्या बैठकीत स्वीकारण्यात आलेला)**

## आंतरराष्ट्रीय

१.१ पक्षाच्या १९व्या परिषदेनंतरच्या कालखंडात एका मोठ्या आर्थिक अरिष्टाने भांडवली जग ग्रासून गेले. भांडवली जगात १९३० च्या दशकात आलेल्या महामंदीनंतरचे हे सर्वात मोठे अरिष्ट होते. आंतरराष्ट्रीय वित्त - भांडवलाच्या हितासाठी स्वीकारण्यात आलेल्या नवउदार भांडवली अर्थनीतीचा हा थेट परिणाम आहे. वित्त – भांडवलाच्या नेतृत्वाखाली होत असलेले जागतिकीकरण किती ठिसूळ (unsustainable) आहे, हेच या प्रदीर्घ अरिष्टाने दाखवून दिले आहे. नवउदार व्यवस्थेचा जगभर वाढता निषेध होत आहे आणि वाढती विषमता आणि वाढती बेरोजगारी या रूपात या व्यवस्थेचा परिणाम दिसू लागला आहे. आपल्या जगण्याची साधने आणि सामाजिक कल्याणकारी सुविधा यांवर जे निष्ठुर हल्ले होत आहेत त्याच्या विरोधात विकसित भांडवली देशांतील लोक वरचेवर मोठ्या संख्येने आंदोलनात उतरू लागले आहेत.

१.२ या प्रदीर्घ अरिष्टाने पछाडलेली साम्राज्यशाही आपल्यावरील ओझे अमेरिकेच्या नेतृत्वाखाली विकसित जगावर लादायचा प्रयत्न करत आहे. त्यासाठी नाटोच्या माध्यमातून पश्चिम आशिया आणि इतर प्रदेशात लष्करी हस्तक्षेप करत आहे. असे असले तरी, नवउदारवादाला पर्याय आहे, हे लॅटिन अमेरिकेतील डाव्या सरकारांनी दाखवून दिले आहे. जग बहुकेंद्री होण्याची प्रवृत्ती बळकट होत आहे आणि, विशेषत: लॅटिन अमेरिकेत, प्रादेशिक सहकार्याची प्रवृत्तीही वाढत आहे. साम्राज्यवादी प्रभुत्वाला विरोध करणे आणि नवउदार व्यवस्थेला प्रागतिक पर्याय उभा करणे आज जगातील डाव्या आणि पुरोगामी शक्तींसमोरील सर्वात प्रमुख आव्हान आहे.

### अरिष्टातील जागतिक भांडवलशाही

१.३ अनिर्बंध वित्तपुरवठा आणि सट्टेबाजीचा वापर करून वित्त भांडवलाने जनतेची जी लूट केली त्यातून २००७ – ०८ ला सुरू झालेले अरिष्ट उद्भवले. करदात्यांनी कररूपाने भरलेल्या पैशातून युरोप आणि अमेरिकेच्या सरकारांनी ज्यांनी अरिष्ट आणले त्या बड्या उद्योगपतींना आणि वित्त कंपन्यांना वाचवण्यासाठी अब्जावधी डॉलर्स ओतले. एकदा का ते वाचले की लगेच साम्राज्यवादी शक्तींनी - विशेषत: अमेरिका, जर्मनी, फ्रान्स आणि इंग्लंड यांनी - काटकसर करायला हवी असा उपदेश करत सामाजिक क्षेत्रातील गुंतवणुकीला कात्री लावून ओझे परत सामान्य लोकांवरच

टाकायला सुरूवात केली. सरकारचे काटकसरीचे उपाय कोणते? सामान्य जनतेसाठी बेरोजगारी, राहत्या घरांतून उचलबांगडी आणि सामाजिक कल्याणाच्या योजनांमधील कमालीची कपात. त्याचवेळी बँका आणि वित्त कंपन्या मात्र सरकारला नुकसानीत ढकलत मोठमोठ्या फायद्याची लयलूट करत आहेत.

१.४ युनोने डिसेंबर २०११ मध्ये प्रसृत केलेल्या **जागतिक आर्थिक स्थिती आणि भवितव्य २०१२** या अहवालात जागतिक अर्थव्यवस्थेची वाढ २०१० मध्ये ४ टक्के होती, ती २०११ मध्ये २. ८ टक्के इतकी खाली आली आहे, याची नोंद घेण्यात आली आहेच. एवढेच नव्हे तर मंदीचे आणखी एक आवर्त येऊ शकते असा धोक्याचा इशाराही दिलेला आहे. २०१२ मध्ये अमेरिका, युरोप आणि जपान या विकसित अर्थव्यवस्थांची एकत्र वाढ केवळ १.३ टक्केच होईल, असेही या अहवालाने म्हटले आहे.

## युरोपातील कर्जाचे अरिष्ट

१.५ युरोपात पसरत असलेल्या देशोदेशींच्या कर्जाच्या अरिष्टाने युरोपियन युनियनच मोडकळीस येऊ लागले आहे. आर्थिक मंदी, सरकारचा घटता महसूल आणि सरकारने आपल्या तिजोरीतून कार्पोरेट कंपन्या आणि बँकांना दिलेली सढळ मदत याचा एकत्रित परिणाम म्हणजे हे कर्जाचे अरिष्ट. कार्पोरेट कर्ज सरकारने आपल्या डोक्यावर घेतले आहे. विकसित देशांचे सार्वजनिक कर्जाचे सकल घरेलू उत्पन्नाशी असलेले प्रमाण २००७ पासून एकदम वाढले आहे. सर्वात अनिष्ट परिणाम ग्रीसवर झाला आहे. ग्रीसवरील कर्जाची पुनर्रचना करून देशाची अर्थव्यवस्था रूळावर आणायला मदत करण्याऐवजी युरोपियन युनियन – आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या जोडगोळीने ग्रीक सरकारला कर्ज देऊन त्याच्यावर कडक काटकसर करायच्या अटी घातल्या आहेत. याच्या परिणामी ग्रीस मंदीच्या गर्तेत जास्तच रुतत जाऊन त्याच्यावरील कर्जाचे अरिष्ट वाढतच चालले आहे. ग्रीसचे दिवाळे वाजेल अशी मोठी भीती व्यक्त केली जाऊ लागली आहे. आणि असे झालेच तर त्याचा कित्येक आंतरराष्ट्रीय बँका आणि वित्तीय बाजारपेठांवर मोठा परिणाम होईल.

१.६ इतर युरोपियन देशदेखील कर्जाच्या गंभीर अरिष्टात अडकले आहेत. देशांना भेडसावणारी कर्जाची समस्या सोडवण्यासाठी युरोपभर विविध देशांच्या सरकारांनी राजकोषीय काटकसरीचे उपाय म्हणून सरकारी खर्चाला कात्री लावली. त्यामुळे समस्या सुटण्याऐवजी आर्थिक वाढ आणि रोजगार आणखीनच खुंटले आहेत. देशचे देश कर्जबाजारी होऊन युरो चलनाचे भवितव्यच धोक्यात येईल अशी भीती व्यक्त केली जात आहे. एक ब्रिटनचा अपवाद सोडल्यास युरोपातील सर्व देश, फ्रान्स आणि जर्मनीच्या आग्रहाखातर, युरोवरील विश्वास वाढावा यासाठी युरोपचा राजकोषीय संघ बनवायला राजी झाले आहेत. याच्या परिणामी देश आपल्या राजकोषीय

धोरणाच्या बाबतीत सार्वभौमत्व गमावून बसण्याचा धोका निर्माण झाला आहे. अंदाजपत्रकी तूट आणि सार्वजनिक गुंतवणुकीला मोठी कात्री लावण्यात येईल आणि त्याचा परिणाम आर्थिक वाढीत घट आणि वाढती बेरोजगारी यात होईल.

## अरिष्टाचा परिणाम

१.७ २०११ मध्ये विकसित देशांतील बेरोजगारीचा सरासरी दर ८.६ टक्के होता. २००९ पासून अमेरिकेतील बेरोजगारीचा दर कायम ९ टक्क्यांच्या वर राहिल आहे. २०११ च्या पहिल्या तिमाहीत विकसित देशांतील जवळ जवळ १/३ बेरोजगार हे एक वर्षाहून अधिक काळ बिनरोजगाराचे राहिले होते. याचा दीड कोटी कामगारांना फटका बसला. विकसित देशांतील युवकांमध्ये बेरोजगारीचा दर २००८ मध्ये १३ टक्के होता, तो २०११ च्या सुरूवातीला १८ टक्के झाला. आज या देशांतील सरकारे सार्वजनिक खर्चात मोठी कपात करत आहेत. त्यामुळे बेरोजगारीत मोठी वाढच होत रहाणार आहे.

१.८ पुढारलेल्या भांडवली देशांतील गरीब आणि श्रीमंतांमधील दरी आज जितकी रूंद आहे तितकी ती गेल्या तीस वर्षात कधीच नव्हती. "आर्थिक सहकार्य आणि विकास संघटने" च्या (OECD) अहवालानुसार या संघटनेत सामील असलेल्या देशांतील सर्वात श्रीमंत १० टक्के लोकांचे उत्पन्न सर्वात गरीब अशा १० टक्के लोकांच्या ९ पट आहे. आणि अमेरिकेत वरच्या १ टक्के लोकांची एकूण संपत्ती तळातल्या ९० टक्के लोकांच्या एकूण संपत्तीहून अधिक आहे. अमेरिकेतील घरबांधणी उद्योगाचा बुडबुडा फुटल्यामुळे कर्जफेड झाली नाही म्हणून लक्षावधी घरे बँकांनी आपल्या ताब्यात घेतली आहेत. एकट्या २०१० मध्येच दहा लाखाहून अधिक लोकांना आपली घरे गमवावी लागली होती. मध्यम वर्गांना याचा फार मोठा फटका बसला आहे.

## विकसनशील देश

१.९ विकसित भांडवली देशांच्या तुलनेत प्रमुख विकसनशील देशांनी आपल्या अर्थव्यवस्थेत गेल्या चार वर्षांत सातत्यपूर्ण वाढ करून दाखवली आहे. जगासमोरील आर्थिक समस्यावर तोडगा काढण्यात अपयश आलेल्या जी ८ देशांनी आपल्या गटाचा जी २० असा विस्तार करून या "उगवत्या अर्थव्यवस्थांना" त्यात सामील करून घेतले. आर्थिक अरिष्ट लांबतच गेल्याने या देशांतील आर्थिक वाढीची गती देखील मंदावली आहे. विकसित देशांत अरिष्टाचे आणखी एक आवर्तन आले तर विकसनशील देशांवर फारच विपरीत परिणाम होईल. त्या देशांची निर्यात मंदावेल; शेती, निसर्गोत्पन्न आणि तिर कच्चा माल अशा प्राथमिक वस्तूंच्या किंमती कोसळतील; आणि भांडवल या देशांतून पळ काढायला लागेल.

१.१०	या "उगवत्या अर्थव्यवस्थांचे", विशेषत: ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या BRICS देशांचे तुलनात्मक आर्थिक बळ पहाता, आर्थिक सत्ता समतोलात काही बदल झाला आहे, असे दिसून येते. युरोपातील अरिष्ट आणि अमेरिकेचे तुलनेने कमी होणारे आर्थिक बळ यांच्या परिणामी साम्राज्यशाहीच्या अंतर्गत असलेले अंतर्विरोध टोकदार होत जाण्याची शक्यता दर्शवतात. विकसित भांडवली देश आणि विकसनशील देश यांच्यातील अंतर्विरोधावर "उगवत्या अर्थव्यवस्थांचा", वाढत्या ताकदीमुळे, गुंतागुंतीचा प्रभाव पडल्याशिवाय रहाणार नाही. साम्राज्यशाही जगावरील आपले प्रभुत्व कायम राखायचा अटीतटीने प्रयत्न करतच राहील. त्यासाठी त्याला विकसनशील देशांतील सत्ताधारी वर्गांवर वरचेवर अवलंबून रहावे लागेल. यामधून साम्राज्यशाही आणि विकसनशील देशांमधील जनता यांच्यातील अंतर्विरोध जास्तच तीव्र होत जाईल.

## साम्राज्यशाही/नाटोचे हस्तक्षेप

१.११	एका बाजूला जागतिक भांडवलशाहीला ग्रासणारे अरिष्ट आणि विकलांग होत जाणाऱ्या अमेरिकन आणि पाश्चात्य युरोपियन अर्थव्यवस्था दिसत असल्या तरी दुसरीकडे साम्राज्यशाहीच्या आक्रमक लष्करी कारवाया सर्रास चालूच आहेत. अशा परिस्थितीत अमेरिकन साम्राज्यशाही आपले प्रभुत्व कायम रहावे म्हणून जास्तच कंबर कसत आहे. यासाठी प्रभुत्व गाजवण्याचे जागतिक साधन म्हणून ती नाटोचा वापर करत आहे.

## विस्कटलेली अफ-पाक व्यूहरचना

१.१२	२००८ मध्ये अध्यक्ष ओबामा यांनी अफगाणिस्तानात आणखी ३०,००० सैनिक पाठवले. तालिबानविरोधी युद्धाने फारशी प्रगती केलेली नाही. नाटोच्या बहुसंख्य सहकारी देशांनी तेथून आपले सैन्य काढून घ्यायला सुरूवात केली आहे. प्रत्यक्ष लढाईसाठी पाठवलेले सैनिक २०१४ पर्यंत माघारी बोलावण्याचे अमेरिकेने जाहीर केले असले तरी त्यानंतरही तेथील लष्करी तळ राखण्यासाठी अमेरिका २५,००० सैनिक अफगाणिस्तानात ठेवणार आहे. दरम्यानच्या काळात तालिबानशी लढायला अफगाण लष्कर सिद्ध होईल अशी अमेरिकेला आशा वाटते. “दहशतवादविरोधी लढाईत" पाकिस्तानी लष्कराला आघाडीवर ठेवण्यासाठी अमेरिकेने पाक – अफगाण सीमा प्रदेशातून अतिरक्यांना हुसकावून लावायचा प्रयत्न केला. तो प्रयत्न फारसा यशस्वी झाला नाही. पाकिस्तानी सरकार आणि अमेरिका यांच्यातील संबंध ताणले आहेत. पाकिस्तानच्या सीमावर्ती प्रदेशात तळ ठोकून बसलेल्या काही अतिरेकी गटांविरुद्ध कारवाई करायला पाकिस्तानी लष्कराने अमेरिकेला सपशेल नकार दिला. अमेरिकेच्या हवाई हल्ल्यात अफगाण सीमेवरील

चौकीवरचे २४ पाकिस्तानी सैनिक ठार झाले. यातून दोन्ही देशांतील संबंध तुटायची पाळी आली होती. पाकिस्तानने अफगाणिस्तानमधील सैन्याला रसद पुरवणारे नाटोचे मार्ग बंद तोडून टाकले आहेत, तर हवाई हल्ल्यासाठी अमेरिका वापरत असलेले तळही बंद करून टाकले आहेत. या प्रदेशात लष्करी हस्तक्षेप करून दहा वर्षे उलटून गेली आहेत. आणि तरीही हा प्रदेश अजून अस्थिरच आहे. एवढेच नव्हे, तर तथाकथित "दहशतवादविरोधी लढाई"मुळे अतिरक्यांच्या कारवाया आणि दहशतवादात भरच पडली आहे.

**उत्तर आफ्रिका आणि पश्चिम आशियातील आक्रमण**

१.१३ अफगाणिस्ताननंतर नाटोचा लिबियातील हस्तक्षेपासाठी वापर करण्यात आला. गडाफीची सत्ता उलथवून त्याचा निर्घृण खून केल्यानंतर आता लिबिया पाश्चात्य देशांच्या प्रभावाखाली आला आहे. या देशांचे पुढचे लक्ष्य आहे सीरिया. या प्रदेशात सीरिया ही एकमेव धर्मनिरपेक्ष अरब सत्ता राहिलेली आहे. नाटोचा भागीदार असलेल्या तुर्कस्तानचा तळ म्हणून सीरियात नागरी युद्ध भडकावण्याचा उद्योग सुरू आहे. हा उद्योग केवळ आजपर्यंत साम्राज्यशाहीची री ओढायला मकार देणाऱ्या या देशात सत्तापालट घडवून आणण्यासाठीच आहे. शेवटचे लक्ष्य आहे इराण. तेलाचे आणि गॅसचे मोठे साठे असलेला पण साम्राज्यशाही प्रभुत्वाच्या बाहेर राहिलेला प. आशियातील एकमेव देश. इराणवर अमेरिकेने निर्बंध लादलेले आहेतच. पण युरोपियन युनियनने देखील जुलै २०१२ पासून इराणहून तेल आयात करायला बंदी घातली आहे.

१.१४ इराकमधील आठ वर्षांच्या हिंस्र आक्रमणानंतर अमेरिकेने आपले लष्कर मागे घेतले आहे. लष्कर मागे घेत असताना इराक सरकारने आपले लष्करी तळ कायम ठेवायला परवानगी द्यावी, असा प्रयत्न अमेरिकेने करून पाहिला. पण त्याला यश आले नाही. त्याऐवजी शेजारच्या कुवेतमध्ये जादा सैन्य आणि आणि पर्शियन आखातात नौदल अमेरिका ठेवणार आहे.

१.१५ लिबियातील "सत्तापालटाचा" वापर अमेरिका आपले आफ्रिकेतील हितसंबंध बळकट करण्यासाठी करत राहील. आफ्रिकेत अमेरिकेचे लष्करी प्राबल्य वाढत आहे. “आफ्रिकॉम" म्हणून ओळखली जाणारी अमेरिकेच्या लष्करी तुकडी कार्यरत आहे. सुदान हे आफ्रिकेतील सर्वात मोठे राष्ट्र होते. त्याची फाळणी होऊन दक्षिण सुदान हा नवा देश निर्माण झाला आहे. आफ्रिकॉमच्या नेतृत्वाखाली तेथे मोठा तळ उभारण्याचे अमेरिकेचे मनसुबे आहेत.

१.१६ आशिया - पॅसिफिक क्षेत्रात अमेरिका आपले लष्करी सामर्थ्य विस्तारत आहे. येत्या दशकात चीनच आपला प्रतिस्पर्धी आहे, हे ध्यानात घेऊन या प्रदेशात

नवनवे मैत्री संबंध प्रस्थापित करत आहे. चीनविरोधातल्या या व्यूहात जपान, ऑस्ट्रेलिया आणि भारत या देशांना भागीदार करायचा तिचा प्रयत्न आहे.

१.१७ बरॅक ओबामा यांनी अध्यक्षपदाची सूत्रे घेत असताना आपण जगातील शांतीदूत आहोत, अशी प्रतिमा निर्माण करायचा प्रयत्न केला. पण प्रत्यक्षात अफगाणिस्तानात जादा सैन्याची कुमक पाठवली; ब्रिटन आणि फ्रान्सच्या सहकार्याने लिबियावर आक्रमण केले; अणु कार्यक्रमाचे निमित्त करून इराणसोबत तणाव निर्माण केला. अशा रीतीने ओबामांनी अमेरिकन सत्ताधारी वर्गांचे हितसंबंधच जोपासले. ओबामा अध्यक्ष झाल्यानंतर अमेरिकेच्या धोरणात एकच बदल झाला आहे. आता पश्चिम आशियात आणि जगातील इतर समस्यांत हस्तक्षेप करत असताना अमेरिका आपल्या युरोपातील साथीदारांना सोबत घेत आहे, इतकेच. साम्राज्यशाही व्यवस्था कायम करण्यासाठी नाटोचा एक सामुहिक साधन म्हणून वापर केला जात आहे, यातूनच हे सहकार्य दिसून येते.

## अरब देशांतील लोकांचे उठाव

१.१८ अरब राष्ट्रांतील लोकांचे उठाव ही एक लक्षणीय घटना आहे. वाढती महागाई, बेरोजगारी आणि हुकूमशाही सत्ता यांच्या परिणामी हे उठाव घडून आले. ट्युनिशियातील उठावाची परिणती बेन अली या हुकूमशाहाची सत्ता उखडून टाकण्यात झाली. ट्यनिशियाच्या उठावाच्या पाठोपाठ ईजिप्तमधील लोकांचा ऐतिहासिक उठाव झाला. या उठावातून लोकांनी होस्नी मुबारकची तीस वर्षांची सत्ता नष्ट केली. ईजिप्त या सर्वात मोठ्या अरब देशातील या उठावामुळे अमेरिकेच्या या विभागातील सामरिक योजनांना मोठाच धोका उत्पन्न झाला. इस्रायल – ईजिप्त युतीचा वापर करून अमेरिका पश्चिम आशियावर सामरिक प्रभुत्व राखून होती. यासाठी तिला ईजिप्तचा मोठाच आधार लाभला होता. ईजिप्तच्या लोक उठावतून बहारिन आणि येमेन सारख्या अमेरिकेच्या सहाय्याने राज्य करणाऱ्या हुकूमशाही राजवटीही उठावाच्या वावटळीत सापडण्याची भीती निर्माण झाली.

१.१९ हे उठाव आपल्या कह्यात आणण्यासाठी अमेरिका आणि नाटोने लिबियात हस्तक्षेप केला. गडाफीच्या विरोधातील तेथील जनतेच्या निषेधलढ्यांचा वापर करून त्यांनी लिबियात हस्तक्षेप केला. बहारिनमधील लोकांचा उठाव मात्र सौदी अरेबियाला हस्तक्षेप करून मोडायला लावला. अमेरिकेने या हस्तक्षेपाला वरदहस्त दिला कारण अमेरिकेच्या पाचव्या अरमाराचा मुख्य तळ बहारिनमध्ये आहे. सीरियातील सत्ता उलथण्याचा प्रयत्न या कारवायांचाच एक भाग आहे. ट्युनिशिया आणि ईजिप्तमध्ये निवडणुका होऊन इस्लामी पक्षांनी तेथे प्रभावी स्थान पटकावले आहे. ईजिप्तची सत्ता अजून लष्करी परिषदेच्याच ताब्यात आहे. अमेरिकेच्या हितसंबंधांना बाधा आणणार नाही आणि या विभागातील

साम्राज्यशाहीचे प्रभुत्व कायम ठेवले जाईल या अटींवर अमेरिका या इस्लामी शक्तींशी सहकार्य करायला राजी आहे.

## पॅलेस्टाईन आणि इस्रायल

१.२० ईजिप्तमधील लोकउठाव आणि होस्नी मुबारकची सत्तेवरून उचलबांगडी या दोन्ही घटनांचा पॅलेस्टिनी आंदोलनावर परिणाम झाला आहे. फताह आणि हमास यांच्यात आता जास्त सहकार्य निर्माण झाले आहे. युनोने आपल्याला सभासद करून घ्यावे या पॅलेस्टाईनने केलेल्या मागणीला युनोच्या सर्व साधारण सभेत व्यापक पाठिंबा मिळाला. २००९ मध्ये इस्रायलने गाझावर हिंस्र हल्ले चढवून धुमाकूळ घातला होता. पण ईजिप्तमधील घटनांमुळे त्याच्या उरात धडकी बसली. इस्रायलने पॅलेस्टाईनच्या भूमीत वसाहत उभारायचे थांबवल्यास शांतता वाटाघाटींसाठी पाया तयार होऊ शकतो. पण ते करायला इस्रायल तयार नाही. खुद्द इस्रायलमध्ये जगण्याच्या समस्यांवरून जनतेमध्ये असंतोष भडकला आहे. इस्रायली नेतृत्वाने इराणविरूद्ध आक्रमक पवित्रा स्वीकारून ते इराणच्या आण्विक सुविधांवर लष्करी हल्ले करायचा विचार करत आहे.

## निषेध आंदोलने

१.२१ प्रदीर्घ भांडवली अरिष्ट आणि त्या अरिष्टाचे ओझे सामान्य जनतेवर टाकण्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्त भांडवल आणि सत्ताधारी वर्ग यांनी घेतलेले धोरण या दोन्हींचा परिणाम म्हणून युरोप, अमेरिका आणि इतर विकसित भांडवली देशांत जनतेचे संघर्ष उफाळून आले आहेत. युरोपातील ग्रीस हे कर्जाच्या अरिष्टाचे केंद्र बनले असून तेथे गेली दोन वर्षे सतत निषेध आंदोलने आणि सार्वत्रिक संप होत आहेत. स्पेनमध्ये प्रामुख्याने तरूण चळवळीत उतरत आहेत तर पोर्तुगाल, इटली, फ्राण्स, ब्रिटन आणि इतर देशांत कामगार सार्वत्रिक संप करत आहेत. शिक्षणावरील खर्चात कपात आणि शिक्षण फी वाढवायच्या धोरणाविरुद्ध आंदोलन करण्यात विद्यार्थी अग्रभागी आहेत.

१.२२ खासगी बँकांना अमाप सवलती, कार्पोरेट आधाशीपणा आणि वॉल स्ट्रीटच्या हातातील अनियंत्रित सत्ता यांच्या विरोधात सप्टेंबर २०११पासून न्यू यॉर्कमध्ये "वॉल स्ट्रीट ताब्यात घ्या" ही चळवळ सुरू झाली. या चळवळीला जनतेच्या विविध स्तरांतून व्यापक समर्थन मिळाले. हे आंदोलन अमेरिकेतील सत्तर शहरांत पसरले आणि त्याला पाठिंबा म्हणून ब्याऐंशी देशांत लोक रस्त्यावर आले. अमेरिकेत या आंदोलनात कामगार संघटना, विद्यार्थी आणि इतर समाज विभागदेखील उतरले. या आंदोलनाने बेरोजगारी, बेघरपणा, उत्पन्नातील विषमता आणि कार्पोरेट कंपन्या आणि वित्तवान उच्चभ्रू करत असलेली लोकशाहीची अवहेलना हे प्रश्न ऐरणीवर

आणले. बळाचा आणि दडपशाहीचा वापर करून पोलिसांनी कित्येक शहरांतील आंदोलकांना उचलून नेले असले तरी आंदोलन चालूच आहे.

१.२३ युरोपमधील अरिष्ट कमी होण्याचे चिन्ह मात्र दिसत नसल्याने येत्या काळात भांडवलाशाहीविरोधातील आंदोलन आणखीनच तीव्र होणार आहेत. काटकसरीच्या नावाखाली जनतेवर कठोर नवउदार धोरणे लादल्यामुळे लोकशाही समाजवादी सरकारे बदनाम झाली आहेत. एका बाजूला जनतेची सामुदायिक निषेध आंदोलने होत आहेत, हे खरेच. परंतु, अरिष्टाचे दुष्परिणाम, वाढती बेरोजगारी आणि सामाजिक सुविधांना लावलेली कात्री यातून निर्माण होणाऱ्या लोकांच्या असंतोषाचा उजव्या शक्ती फायदा उठवून स्थलांतरीत कामगार आणि मुस्लिमांना लक्ष्य करत आहेत. या देशांमध्ये उजव्या एकाधिकारी शक्तींचा धोका वाढला आहे.

१.२४ मात्र, प्रस्थापित व्यवस्थेला अद्याप प्रभावी राजकीय पर्याय निर्माण झालेला नाही. आणि अशा परिस्थितीत ही निषेध आंदोलने आणि संघर्ष उभे रहात आहेत. प्रभावी राजकीय पर्याय नसल्याचा सत्ताधारी वर्ग फायदस उठवून जनतेवर भार ताकत आहेत. या परिस्थितीत काही ठोस बदल व्हायचा तर एक सशक्त डावा पर्यायच उभा करावा लागेल.

१.२५ रशियात प्रस्थापित सत्तेविरुद्ध आणि देशाच्या तेल आणि नैसर्गिक वायुची लूट करून गबर होणाऱ्या भांडवली शक्तींविरुद्ध जनतेमध्ये असंतोष वाढत आहे. डिसेंबर २०११ मध्ये झालेल्या संसदेच्या निवडणुकीमध्ये "युनायटेड रशिया" या सत्ताधारी पक्षाला सत्तेत ठेवण्यासाठी अयोग्य मार्गांचा सर्रास वापर करण्यात आला. या लोकशाहीविरोधी कृत्याचा निषेध करण्यासाठी प्रचंड आंदोलन झाले. निवडणुकीत सत्ताधारी पक्षाने गैरप्रकार करूनही रशियन कम्युनिस्ट पक्षाने १९ टक्के मते मिळवत संसदेच्या ९२ जागा मिळवल्या. कम्युनिस्ट पक्ष प्रमुख विरोधी पक्ष बनला असून निवडणुकीत मिळालेले यश हे त्याच्या वाढत्या लोकप्रियतेचे द्योतकच आहे.

## लॅटिन अमेरिका

१.२६ लॅटिन अमेरिकेत डाव्या शक्तींनी चांगलीच आघाडी घेतली आहे. तेथील डावीकडे झुकणाऱ्या सरकारांनी नवउदार प्रामाण्यवादाला आणि या विभागातील अमेरिकन साम्राज्यवादाच्या पारंपरिक प्रभावाला आव्हान उभे केले आहे. खासगीकरण मागे घेऊन, तेल आणि नैसर्गिक वायुवर शासकीय नियंत्रण प्रस्थापित करून, सामुदायिक उद्योगांना प्रोत्साहन देऊन आणि राजकीय व्यवस्थेचे लोकशाहीकरण करून व्हेनेझुएला आणि बोलिव्हिया हे देश नवउदारवादाला पर्याय देण्यासाठी आघाडीवर आहेत. इक्वाडोर आणि निकारागुआ या देशांच्या

सरकारांच्या सोबतच व्हेनेझुएला आणि बोलिव्हियाने जनतेचे आरोग्य सुधारणे, तिला शिक्षण देणे, संपत्तीचे पुनर्वाटप करणे आणि उत्पन्नातील विषमता कमी करणे या कामांवर लक्ष केंद्रीत केले आहे.

१.२७ नवउदारवाद आणि खासगीकरणाविरुद्ध कामगार आणि जनतेने जो प्रदीर्घ संघर्ष केला त्यातून ही डावी सरकारे अस्तित्त्वात आली. बोलिव्हिया, उरुग्वे, अर्जेन्टिना, निकारागुआ आणि पेरू या देशांत पुन्हा पुन्हा डावी सरकारे आणि त्या पक्षांचे अध्यक्ष निवडून आले यातून नवउदार जागतिकीकरणाला लॅटिन अमेरिकेत राजकीय पर्याय ुभा रहात आहे, हेच दिसून येते.
१.२८ डिसेंबर २०११ मध्ये व्हेनेझुएलाच्या राजधानीत ३३ लॅटिन अमेरिकन आणि कॅरिबियन राष्ट्रांनी एकत्र येऊन CELAC हा गट स्थापन केला ही एक महत्त्वाची घटना आहे. या भौगोलिक गटात सर्व लॅटिन अमेरिकन देश सामील झाले असून त्यातून अमेरिका आणि कॅनडा या देशांना मात्र बाजूला ठेवण्यात आले आहे. या प्रदेशातील देशांनी अमेरिकन प्रभुत्वापासून फारकत घेतली आहे, हेच यातून स्पष्ट होते.

**समाजवादी देश**

१.२९ गेल्या काही वर्षांत चीनची आर्थिक वाढ विलक्षण वेगाने होत आहे. अमेरिकेनंतरची दोन क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून चीन पुढे आला आहे. चीनने जागतिक वित्तीय अरिष्टावर इतर देशांच्या तुलनेत सहजगत्या मात केली. अरिष्टातून मार्ग काढण्यासाठी विकसित भांडवली देशांप्रमाणे कार्पोरेट कंपन्यांना प्रचंड सवलती चीनने दिल्या नाहीत. उलट पायाभूत सुविधांचा आणि ग्रामीण विभागाचा विकास करून देशांतर्गत मागणी वाढवण्यासाठी प्रचंड प्रमाणात राजकोशीय तरतूद करून चीनच्या सरकारने या अरिष्टातून वाट काढली. चीनचा २००९ आणि २०१० चा सकल घरेलू उत्पादनाचा दर प्रत्येकी ८.७ आणि १०.३ टक्के इतका होता. असे असले तरी, वेगाने होणाऱ्या विकासबरोबरच विषमतादेखील वाढत आहे. उत्पन्नाच्या आणि संपत्तीच्या वाटपातील तफावत वाढत आहे. प्रादेशिक आणि सामाजिक विकासातील विषमताही वाढत आहे. भ्रष्टाचार वाढला आहे. आणि या साऱ्यांच्या परिणामी तणावही वाढत आहेत. चीनच्या वाढत्या सामर्थ्यामुळे चीनचा या विभागातील प्रभावही वाढत आहे आणि तो रोखण्यासाठी अमेरिका राजनैतिक, राजकीय आणि लष्करी कारवायांचा आधार घेत आहे.

१.३० व्हिएतनामदेखील सातत्यपूर्ण प्रगती करत आहे. जागतिक अरिष्टातून सावरून त्याने, चलनवाढीची समस्या असली तरी, २०१० मध्ये सकल घरेलू उत्पादनात ६.७८ टक्के वाढ केली आहे. दारिद्र्यात घट आणि मागास विभागांची

प्रगती करण्यात व्हिएतनामला यश आले आहे.

१.३१ उत्तर कोरियाला एकटे पाडण्याचा अमेरिका सतत प्रयत्न करत असला तरी तो देश अमेरिकन कारवायांना पुरून उरला आहे. अलिकडच्या काळात उ. कोरियाने चीन आणि रशियासोबतचे आर्थिक संबंध बळकट केले आहेत.

१.३२ क्युबाला अमेरिकेने त्याच्यावर लादलेल्या नाकेबंदीच्या विरोधात लॅटिन अमेरिकन देशांना एकत्र आणण्यात यश आले आहे. नव्यानेच स्थापन झालेल्या लॅटिन अमेरिकन आणि कॅरिबितन देशांच्या गटाचा सदस्य होऊन त्याने या यशावर शिक्कामोर्तब केले आहे. छोटे आणि स्वंरोजगारावर चालणारे उद्योगधंदे सुरू करायला आणि नियंत्रित बाजारपेठेवर आदारीत संबंध प्रस्थापित करायला परवानगी देऊन क्युबाने काही आर्थिक सुधारणा आणल्या आहेत. या सुधारणांच्या द्वारा आर्थिक आणि सामाजिक पुनरुत्थान होईल अशी आशा क्युबाला वाटते. क्युबाची सार्वजनिक शिक्षण पद्धती आणि आरोग्य सेवा अत्यंत सुधारलेल्या आहेत आणि त्यात आणखी सुधारणा करण्याचे प्रयत्न सतत चालू आहेत.

**बहु-केंद्रितता**

१.३३ जागतिक आर्थिक अरिष्टामुळे विकसनशील देशांचे जागतिक अर्थव्यवस्थेतील महत्त्व वाढले आहे. जगभरच्या आर्थिक धोरणांत सुसूत्रता आणण्यासाठी जी ८ पुरेसे नाही, हे ध्यानात घेऊन जी २० ची स्थापना करण्यात आली. यातूनच विकसनशील देशांना महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. २००९ मध्ये ब्राझिल, रशिया, भारत आणि चीन यांनी BRIC या गटाची स्थापना केली होती. या गटात २०११ साली दक्षिण आफ्रिकेला सहभागी करून त्याचे नाव BRICS झाले. हे विकसनशील देशांचे वजन वाढत असल्याचे द्योतक आहे. युनोतील सुधारणा, आंतरराष्ट्रीय व्यापार, हवामानातील बदल इत्यादी विषयांवर परस्परपूरक भूमिका घेत आंतरारष्ट्रीय व्यासपीठांवर विकसनशील देशांचा आवाज उठवत आहेत. त्यांच्या आर्थिक प्रश्नांवरील सहकार्याचे रूपांतर आंतरराष्ट्रीय प्रश्नांवरील समान राजकीय भूमिकांत होईल तेव्हा या गटाला आणखीन महत्त्व येईल. लॅटिन अमेरिकेत प्रादेशिक गटांनी चामगली आगेकूच केली आहे. अमेरिका आणि कॅनडा यांना वगळून बनवलेल्या CELAC मधून एक नवा प्रवाह दिसून येतो. त्याआधी ALBA (अमेरिकन देशांसाठी बोलिव्हारियन पर्याय) हे एक महत्त्वाचे पाऊल होते. शांघाय सहकार्य संघा (Shanghai Cooperation Organisation - SCO) चा विस्तार करण्यासाठी रशिया प्रयत्नशील आहे. या SCO मध्ये भारत, पाकिस्तान आणि इराण या प्रादेशिक सत्तांचा समावेश झाल्यास जागतिक व्यवस्था बहुकेन्द्री होण्याची शक्यता आणखी बळकट होईल.

**हवामानातील बदल**

१.३४ १९व्या पक्ष परिषदेने हरितगृह वायूंच्या उत्सर्जनावर नियंत्रण न आणल्यास हवामानातील बदलामुळे होणाऱ्या विनाशकारी परिणामांविषयी धोक्याचा इशारा दिला होता. तापमान बदलाचे अरिष्ट हा जागतिक भांडवलशाहीच्या अन्याय्य, अनैतिक आणि पिपासू स्वभावाचा परिणाम आहे. जगाची २० टक्के लोकसंख्या असलेले विकसित भांडवली देश वातावरणात ७४ टक्के कर्बवायू सोडतात, तर ८० टक्के लोक रहात असलेले अविकसित देश २६ टक्के. अशा रीतीने विकसित देशांनी तापमानवाढीचे अरिष्ट जगावर लादलेले असले तरी त्याचे खरे दुष्परिणाम भोगावे लागणार आहेत अविकसित देश आणि जगातील गरीबांना.

१.३५ क्योटो करारात विकसित देशांनी २००८ - १२ या कालावधीत कर्बवायूचे उत्सर्जन १९९०पेक्षा ५.२ टक्के कमी करायचे मान्य केले होते. हे वचन त्यांनी बिलकुल पाळलेले नाही. अमेरिकेने तर हा करार मान्य करायलाच नकार देऊन कर्बवायूंचे उत्सर्जन १७ टक्क्यांनी वाढवले. जगातील विकसित देश अमेरिकेच्या नेतृत्वाखाली कर्बवायूचे उत्सर्जन कमी करायचे ओझे अविकसित देशांवरच ढकलत आहेत. अशा रीतीने ते भविष्यात जास्त जास्त कर्बवायू वातावरणात सोडत रहाणार आहेत. न्यायाचे तत्त्व पाळायचे तर जगातील प्रत्येक व्यक्तीला पर्यावरणाचा समान लाभ मिळायला हवा. प्रत्येक व्यक्तीच्या नैसर्गिक हक्काचे हे तत्त्व लाथाडून अमेरिका भारतासारख्या देशांनी आपले उत्सर्जन कमी करावे असा दबाव आणत असते. तेही भारताचे दरडोई उत्सर्जन अमेरिकेच्या केवळ १/१३ असताना!

१.३६ कोपनहेगनपासून ते दरबानपर्यंतच्या सर्व तापमानविषयक परिषदांमध्ये जागतिक उत्सर्जनावरील नियंत्रणे कमी कमी करण्याचा आणि दरडोई उत्सर्जनातील नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे सतत उल्लंघनच करण्यात आलेले आहे. डिसेंबर २०११ मध्ये दरबानला झालेल्या परिषदेने सर्व देशांवर बंधनकारक राहतील असे नियम करण्यासाठी २०१५ पर्यंतचा कालावधी ठरवून घेतला. त्यात स्वीकारलेले नियम अंमलात आणायला सुरूवात व्हायची २०२० पासून! यानुसार विकसित भांडवली देशांनी आपल्या पारड्यात जास्त माप पाडून घेतले आहे हे उघड आहे. भारताने आपली भूमिका पातळ करत तो आता अमेरिकेच्या बाजूने झुकू लागला आहे. भारताला पुढील चर्चांमध्ये न्यायाचे तत्त्व केंद्रस्थानी ठेवून सर्वांना कायदेशीरपणे बंधनकारक होईल असे आपले हवामानातील तापमान बदलाचे धोरण ठरवावे लागेल. जगातील सर्व पुरोगामी शक्तींनी एक समान भूमिका घेऊन आपापल्या सरकारांवर त्यांनी हवामानाच्या तापमान बदलाविषयी न्याय्य आणि अर्थपूर्ण करार करावा म्हणून दबाव आणला पाहिजे.

**दक्षिण आशिया**

१.३७ **पाकिस्तान:** पाकिस्तान हा अतिरेकी आणि मूलतत्त्ववादी गटांच्या वाढत्या हिंसेच्या भोवऱ्यात हेलकावत आहे. तेथील नागरी सरकार एकाच वेळी अमेरिकेवर अवलंबून आहे आणि तिच्यासोबतचे त्याचे संबंध ताणलेही जात आहेत. अफगाणिस्तान आणि सीमाभागात चालू असलेल्या संघर्षाचा परिणाम होण्याइतके ते तकलादू झाले आहे. अमेरिकेच्या विशेष फौजांनी अबोताबाद येथे रहात असलेल्या ओसामा बिन लादन याला ठार केले. यावरून पाकिस्तानचे गुप्तहेर खाते आणि लष्करातील काही विभागांच्या आश्रयाने अतिरेकी गट या देशात कसे मुळे रोवून आहेत, हेच अधोरेखित होते. तालिबानवरील अमेरिकेच्या हवाई हल्ल्यात स्त्रिया आणि मुलांसकट कित्येक निरपराध नागरिक ठार झाल्याने जनतेच्या मनात संताप उफाळून आला आहे. त्याच्या परिणामी अतिरेक्यांनी सूडभावनेने कित्येक हल्ले केले आहेत. अलिकडेच अमेरिकेने अफगाण सीमेवर हवाई हल्ला केला, त्यात २४ पाकिस्तानी सैनिक ठार झाले. त्यातून पाकिस्तान आणि अमेरिकेच्या लष्करी सहकार्यात मोठे विघ्न आले. पाक – अमेरिका लष्करी सहकार्य कमी झाल्याचे या विभागात दूरगामी परिणाम होणार आहेत.

१.३८ पंजाबचे गव्हर्नर आणि पंजाबच्या सरकारातील एकमेव ख्रिश्चन मंत्री अशा दोघांची दहशतवाद्यांनी हत्त्या केली. यावरून दहशतवादी आणि जिहादी शक्ती किती उजळ माथ्याने वावरत आहेत, हेच दिसून येते. वाढती महागाई आणि बेरोजगारी यांच्यामुळे लोकांचे जीवनमान कमालीचे खालावले आहे. पाकिस्तानच्या तीन क्षेत्रात सुरू असलेल्या संघर्षाचे पाकिस्तानच्या भवितव्यावर दूरगामी परिणाम होत आहेत. एक, अमेरिका आणि पाकिस्तानच्या लष्करातील प्रस्थापित आणि प्रभावी विभाग यांच्यातील संघर्ष; दोन, लष्करी क्रांतीच्या शक्यतेविषयी अमेरिकेला सादर करण्यात आलेल्या निवेदनावरून नागरी सरकार आणि लष्कर यांच्यात सुरू झालेला संघर्ष; आणि तीन, भ्रष्टाचाराचे खटले चालवण्यावरून सुप्रीम कोर्ट आणि सरकार यांच्यातला संघर्ष. दहशतवादी - अतिरेकी शक्तींना अलग पाडता आले आणि अमेरिकेशी असलेले दुय्यमपणाचे नाते नष्ट करता आले तरच लोकांच्या आकांक्षांना प्रतिसाद देणारी लोकशाही व्यवस्था पाकिस्तान निर्माण करू शकेल.

१.३९ **बांगलादेश:** २००९ मध्ये संसदीय लोकशाहीची यशस्वी पुनर्स्थापना होऊन अवामी लीगच्या नेतृत्वाखालील आघाडी विजयी जाली आणि शेख हसिनांचे सरकार सत्तारूढ झाले. सत्तेवर आल्यापासून या सरकारने शासकीय व्यवहारात धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाची पुनर्स्थापना करण्यासाठी पावले उचलली. या लोकशाही - धर्मनिरपेक्ष उपायांची पायमल्ली करायचा प्रयत्न उजव्या - मूलतत्त्ववादी शक्ती करत आहेत. अलिकडेच लष्कराने लष्करी क्रांतीचा प्रयत्न हाणून पाडल्याचे उघड

झाले आहे. यावरून उजव्या - मूलतत्त्ववादी शक्तींचा केवढा धोका आहे, हे स्पष्ट होते. देशाला आर्थिक अरिष्टाचा मोठा फटका बसला आहे. अन्नधान्याच्या सतत वाढणाऱ्या किंमतींमुळे जनतेचे अतोनात हाल होत आहेत. भारत आणि बांगलादेश यांच्यातील सहकार्यात लक्षणीय वाढ झाली आहे. उल्फासारख्या बांगलादेशच्या भूमीतून काम करणाऱ्या दहशतवादी संघटनांच्या कारवायांना आळा घालण्यासाठी सरकारने निश्चित पावले उचलली आहेत. भारतीय पंतप्रधानांच्या भेटी दरम्यान दोन्ही देशांच्या सीमांमध्ये अडकलेल्या परस्परांच्या प्रदेशांची देवाणघेवाण करण्याचा आणि दोन्ही देशांतील सीमा निश्चित करण्याचा करार झाला, ही एक सकारात्मक घटना आहे.

१.४० **नेपाळ:** माओवादी नेते प्रचंड यांनी पंतप्रधानपदाचा राजिनामा दिल्यानंतर दोन वर्षांचा प्रदीर्घ कालावधी अनिश्चित अवस्थेत गेला. हा पेच सोडवण्यासाठी एक करार झाला. बाबुराम भट्टराय यांनी पंतप्रधानपद ग्रहण केल्यावर माओवादी सैनिकांचे काही विभाग लष्करात विलीन करण्याचा आणि इतरांचे पुनर्वसन करण्याचा तीन प्रमुख पक्षांमध्ये करार झाला. यातून नवी राज्यघटना बनवण्याचा मार्ग खुला झाला; पण त्यासाठी तिन्ही प्रमुख पक्षांचे सहकार्य आवश्यक आहे. लोकांच्या आकांक्षांची कदर करणारी संघराज्यीय आणि लोकशाही व्यवस्था रुजण्यासाठी शांतता प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे.

१.४१ **म्यानमार (ब्रह्मदेश):** आपल्या सत्तेला नागरी मुखवटा चढवण्यासाठी तयार केलेल्या नव्या घटनेनुसार लष्करी राजवटीने २०१० मध्ये निवडणूक घेतली. थेन सीन यांनी अध्यक्षपद स्वीकारल्यापासून लष्करी हुकूमशाहीतील काही नियम शिथिल करून काही लोकशाही हक्क प्रस्थापित करणारी पावले उचलण्यात आली आहेत, आणि राजकीय कैद्यांची सुटका करण्यात आली आहे. ऑंग सां सू क्यी यांनीही याला प्रतिसाद देत आपला राजकीय पक्ष नोंदवून घेतला आहे आणि एक पोट-निवडणूक लढवायचा निर्णय घेतला आहे. कित्येक दशकांच्या लष्करी हुकूमशाहीनंतर सरकार आणिच. भारताचे म्यानमारच्या सरकारबरोबरचे संबंध सलोख्याचे आहेत, त्याचा वापर करून लोकशाही व्यवस्था पूर्णपणे प्रस्थापित व्हावी म्हणून पावले उचलायला हवीत.

१.४२ **श्रीलंका:** एलटीटीईच्या लष्करी पराभवासोबतच देशात पंचवीस वर्षे चाललेले नागरी युद्ध संपुष्टात आले. तामीळ परिसरात युद्धाने विस्थापित झालेल्या लोकांचे श्रीलंकेच्या सरकारने अजून संपूर्ण पुनर्वसन केलेले नाही. युद्धाच्या शेवटच्या टप्प्यात नागरिकांवर झालेल्या अत्याचारांची चौकशी होऊन गुन्हेगारांना सासन झाले पाहिजे. लष्करी संघर्षाचा आणि एलटीटीई चा अंत होऊन तब्बल दोन वर्षे लोटली असूनही तामीळ समस्येची राजकीय उकल करण्यासाठी श्रीलंकेच्या सरकारने काहीही ठोस उपाय केलेले नाहीत.

१.४३	श्रीलंका सरकारने राजकीय चर्चेच्या प्रक्रियेचा वेग वाढवून उत्तर आणि पूर्व भागातील तामीळ भाषिक प्रदेशांना स्वायत्तता देऊन सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत. एकात्म श्रीलंकेत तामीळांना त्यांचे हक्क मिळण्याची हीच हमी आहे. तामीळ जनतेचे संपूर्ण पुनर्वसन होण्यासाठी आणि तामीळ प्रश्नाची राजकीय सोडवणूक होण्यासाठी भारत सरकारने राजनैतिक आणि राजकीय प्रयत्न जारी ठेवण्याची गरज आहे.

१.४४	भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) दक्षिण आशियातील लोकशाहीवादी आणि पुरोगामी शक्तींशी बांधिलकी व्यक्त करून या विभागातील डाव्या, लोकशाहीवादी आणि धर्मनिरपेक्ष शक्तींसोबतचे सहकार्य वाढवण्याचा प्रयत्न करत राहील.

**सारांश**

१.४५	सोव्हिएत युनियनच्या पतनानंतरच्या काही काळात उफाळलेला भांडवली विजयोन्माद आता गायब झाला आहे. त्याची जागा सत्ताधारी वर्गांना भांडवलशाहीच्या भवितव्याबद्दल वाटणाऱ्या अनिश्चिततेने घेतली आहे. लोकांनी लढून मिळवलेल्या अधिकारांवर आणि त्यांच्या आर्थिक हक्कांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या विरोधात लोक वरचेवर संघर्षात उतरत आहेत. अरब जगात एकाधिकारशाहीच्या विरोधात लोकांनी केलेल्या उठावांनी एक नवा राजकीय बदल घडवून आणला आहे. लॅटिन अमेरिकेने विकासाच्या नवउदार धोरणांना पर्याय असू शकतो हे दाखवून दिले आहे. जगातील कम्युनिस्ट आणि डाव्या शक्तींनी साम्राज्यशाहीविरोधी आंदोलने उभी करून ती बळकट केली पाहिजेत; भांडवलशाहीला पर्याय निर्माण करण्यासाठी वित्तीय भांडवलशाहीच्या पाशवी शोषणाविरुद्ध कष्टकरी जनतेला संघटीत केले पाहिजे. अरिष्टाच्या चक्रातून बाहेर पडायचे तर समाजवाद हाच पर्याय आहे. कामगारवर्गाची चळवळ बांधणे आणि व्यापक डावा राजकीय पर्याय उभा करणे ही काळाची गरज आहे.

१.४६	भारतात साम्राज्यवादी जागतिकीकरण आणि जनताविरोधी नवउदार धोरणांविरुद्धचे लढे एकमेकांशी घनिष्टपणे जोडलेले आहेत. साम्राज्यवादी प्रभुत्वाविरुद्ध संघर्ष करत राष्ट्रीय सार्वभौमत्वाचे रक्षण करणाऱ्या सर्व शक्तींशी मा.क.प. भ्रातृभाव व्यक्त करतो. मा.क.प. देशातील डाव्या आणि लोकशाहीवादी चळवळीचा अभेद्य हिस्सा म्हणून भारतात एक बलशाली साम्राज्यवादविरोधी आंदोलन उभे करायचा अहर्निश प्रयत्न करत राहील.

## राष्ट्रीय परिस्थिती

२.१ संपुआ सरकार प्रामुख्याने बडे उद्योग आणि परकीय भांडवल यांच्या हिताची धोरणे राबवत आहे, असा निष्कर्ष १९व्या पक्ष परिषदेने काढला होता. त्यावेळी सरकारला पाठिंबा देत असतानाच सरकारच्या नवउदार धोरणांना विरोध चालू ठेवत आपले स्वतंत्र स्थान कायम ठेवण्याचा निर्णय पक्ष परिषदेने घेतला होता. त्याचसोबत भाजप आणि गेलेले स्थान पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या जमातवादी शक्तींना अलग पाडण्याचाही निर्णय आपण घेतला होता. अमेरिकेसोबत सामरिक आघाडी करण्यास विरोध करून साम्राज्यवादी प्रभावाच्या विरोधात जनतेला संघटित करायचा निर्णय घेतला होता. सामाजिक अन्याय, कामगार वर्ग आणि जनतेच्या इतर विभागांचे होत असलेले वर्गीय शोषण याविरुद्ध एका पर्यायी धोरणावर जनतेला संघटित करून आंदोलन उभारण्याची हाक त्या परिषदेने दिली होती. नवउदार धोरण आणि अमेरिकेसोबतची सामरिक आघाडी याविरुद्ध माकपने घेतलेल्या भूमिकेमुळे पक्षाला देशातील सत्ताधारी वर्ग आणि साम्राज्यवादी शक्ती हल्ल्याचे लक्ष करत असून पक्षाचा बळकट आधार असलेल्या पश्चिम बंगालमध्ये हा हल्ला सुरू झालाही असल्याचा इशारा १९व्या पक्ष परिषदेने दिला होता.

२.२ संपुआ सरकारने दिलेल्या आश्वासनाला हरताळ फासत अमेरिकेसोबत अणुकरार केला आणि पक्ष परिषदेनंतर अवघ्या तीन महिन्यातच डाव्या पक्षांनी सरकारचा पाठिंबा काढून घेतला. सरकारने बहुमत गमावले, पण पैशाचा वापर आणि विरोधी पक्षांतील फुटीला उद्युक्त करत संपुआने लोकसभेतील विश्वासदर्शक ठराव अनैतिक मार्गाने जिंकला. त्यानंतर मे २००९ मध्ये झालेल्या संसदीय निवडणुकीत कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीने, तिला स्पष्ट बहुमत मिळाले नाही तरी, निवडणूक जिंकली. संपुआ – २ सरकार संपुआ – १ प्रमाणेच नवउदार आर्थिक धोरण राबवत आहे; आता ते जास्तच आक्रमकपणे राबवत आहे. संपुआ - २ सरकारच्या तीन वर्षांच्या कार्यकालात खालील बाबी ठळकपणे घडत आलेल्या आहेत:

I. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत होत असलेली अप्रतिहत वाढ
II. संपुआ - १ मध्ये सुरू झालेल्या उच्चस्तरीय भ्रष्टाचारात कमालीची वाढ
III. अमेरिकेसोबत सुरू ठेवलेली सामरिक आघाडी आणि अमेरिकाधार्जिणे परराष्ट्र धोरण
IV. कामगार वर्ग, शेतकरी आणि इतर कष्टकरी विभागांचे वाढत जात असलेले शोषण आणि दैन्य

२.३ आता डाव्या पक्षांवर अवलंबून रहावे लागत नसल्याने मनमोहनसिंग सरकारने आपला नवउदार धोरणाचा गाडा पुढे रेटायचा प्रयत्न जारी ठेवला आहे. पण संसदेत त्याला स्थिर बहुमत नसल्याने तो फार बेदरकारपणे पुढे रेटता येत नाही.

रोज उघडकीला येणाऱ्या भ्रष्टाचारांच्या प्रकरणामुळे सरकार भोवऱ्यात सापडले आहे आणि या दिशाहीन सरकारला योग्य राजकीय दिशा द्यायला सत्ताधारी कॉंग्रेस असमर्थ दिसत आहे.

**नव-उदार विषयपत्रिका**

२.४ संपुआ - १ ला नवउदार धोरण राबवण्याची इच्छा असूनही डाव्या पक्षांच्या विरोधामुळे ते शक्य झाले नव्हते. संपुआ - २ ला मोकळीक मिळाल्याने आता सरकारला ते राबवण्याची घाई झाली आहे. सार्वजनिक क्षेत्राचा संकोच करणे, नैसर्गिक संसाधनांचे अनिर्बंध शोषण करायला खासगी क्षेत्राला मुक्त परवाना देणे आणि देशी आणि परदेशी कार्पोरेट भांडवलाच्या नफेखोरीला मदत करणे हा नवउदार धोरणांचा गाभा आहे. २००९ पासून सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांतील ४७,५०० कोटी रुपयांचे भागभांडवल विकून निर्गुंतवणुकीचा कार्यक्रम नव्याने रेटायला सुरूवात झाली आहे. सर्व नफ्यात असलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांना आपले किमान १० टक्के भांडवल शेअर बाजारात आणायची सरकारने सक्ती केली आहे.

२.५ तेल आणि नैसर्गिक वायू या संसाधनांचे खासगीकरण करून टाकल्यामुळे देशातील नैसर्गिक वायुच्या उत्पादनात खासगी क्षेत्राने अगोदरच सार्वजनिक क्षेत्रावर आघाडी घेतली आहे. भारताची तेल आणि नैसर्गिक वायु संसाधने विकायचे मोठमोठे करार सरकार खासगी क्षेत्राशी करत आहे. खाण उद्योगाचे धोरण बदलून हे क्षेत्रही देशी आणि परदेशी कार्पोरेट भांडवलाला मोठ्या प्रमाणात खुले करून दिले जात आहे. २००९-१० मध्ये २१.८६ कोटी टन लोह खनिजनाचे उत्पादन झाले होते, आणि त्यातील ४५ टक्के निर्यात करण्यात आले होते. त्यापैकी ६३ टक्के हिस्सा खासगी क्षेत्राचा होता. कोळसा खाणींचेही खासगीकरण करण्याचा घाट घातला जात आहे. खाण आणि खनिज क्षेत्र खुले केल्याने बेकायदेशीर खाणकाम आणि अनियंत्रित निर्यातीचा सपाटा सुरू झाला आहे.

२.६ विमा क्षेत्रात परकीय थेट गुंतवणूक वाढवणे, बॅंक उद्योगावरील नियंत्रणे काढून टाकणे आणि पेन्शन फंडाची रक्कम शेअर बाजारात विक्रीसाठी आणण्यासाठी संपुआ सरकार कायदे करायचे करायचे धोरण पुढे रेटत आहे. अशी पावले स्वीकारल्यास भारताचे वित्तीय क्षेत्र वित्तीय भांडवलातील सट्टेबाजीच्या कच्छपी दिले जाईल. वित्तीय क्षेत्र आणखी खुले करायला डाव्या पक्षांनी जो कडवा विरोध केला होता त्यामुळेच केवळ देश जागतिक वित्तीय अरिष्टाच्या दुष्परिणामांपासून बचावला होता. परकीय विद्यापीठांना प्रवेश देण्याचे विधेयकदेखील सरकारने तयार ठेवले आहे. संरक्षण क्षेत्रातील परकीय थेट गुंतवणुकीची मर्यादा वाढवण्याचेदेखील घाटत आहे.

२.७ संसदेच्या २०११ च्या हिवाळी अधिवेशनात संपुआ मंत्रिमंडळाने मल्टी-ब्रॅन्ड किरकोळ व्यापारात ५१ टक्के परकीय थेट गुंतवणुकीला परवानगी द्यायचे ठरवले. त्याचा ४ कोटीहून अधिक असलेल्या व्यापाऱ्यांवर मोठा दुष्परिणाम होईल आणि शेतकरी व छोट्या उत्पादकांची मोठी पिळवणूक होईल. यामुळे राजकीय पक्ष, व्यापारी आणि जनतेच्या संघटनांचा मोठा विरोध होऊन सरकारला निर्णय स्थगित ठेवणे भाग पडले. पण आता होत असलेल्या विधानसभा निवडणुकीनंतर या निर्णयाची अंमलबाजावणी केली जाईल असे पंतप्रधानांनी जाहीर केले आहे.

२.८ औषध उत्पादनाच्या क्षेत्रात १०० टक्के परकीय थेट गुंतवणुकीला परवानगी दिल्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या देशातील औषध कंपन्या विकत घेऊन भारतीय औषध बाजारपेठेवर आपला कब्जा मजबूत करू लागल्या आहेत. भारतातल्या सर्वात वरच्या पाच औषध विक्रेत्या कंपन्यांपैकी तीन या बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत. औषधांच्या बाजारपेठेचे असे केंद्रीकरण होऊ लागल्यामुळे औषधांच्या किंमती बेलगामपणे वाढू लागल्या आहेत. औषधांच्या किंमतींवर अथवा या क्षेत्रातील परकीय थेट गुंतवणुकीवर नियंत्रण घालायला सरकार नाखूश आहे.

**चलनवाढ आणि भाववाढ**

२.९ चलनवाढ आणि जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ रोखायला संपुआ सरकार पूर्णत: अपयशी ठरले आहे. नोव्हेंबर २०११ मध्ये ठोक भाव निर्देशांक ९.१ टक्के होता. अन्नधान्यांच्या भाववाढीचा दर सप्टेंबर २००८ ते ऑक्टोबर २०११ या दरम्यानच्या ३८ महिन्यात १० टक्क्यांच्या वर ठेवण्याचा विक्रम या सरकारने केला आहे. दहा आकड्यांच्या वर अन्नधान्यातील दरवाढ इतकी दीर्घकाळ राहिली हे स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्यांदाच घडत आहे. दाळी, भाजीपाला, फळे, तेल, साखर, दूध, अंडी, मांस आणि मासे या सर्वच पदार्थांच्या दरात खूप वाढ झाल्यामुळे जनतेचे हाल होत आहेत. या अन्नधान्यातील चलनवाढीला सराकरचे या क्षेत्रातील नवउदार धोरण कारणीभूत आहे. धान्याची साठेबाजी, त्याचा वायदे बाजार, चुकीचे निर्यात धोरण आणि धान्यसाखळीत बड्या कार्पोरेट कंपन्यांचा शिरकाव हे घटक या भाववाढीला कारणीभूत आहेत. अन्नधान्याची खुंटलेली उत्पादकता आणि शेतीचा अगदीच संथ विकास यांनी परिस्थिती जास्तच बिकट झाली आहे.

२.१० पेट्रोलच्या किंमतींवरील नियंत्रण काढून टाकल्यानंतर अनेकदा पेट्रोलचे दर वाढवण्यात आले. दिल्लीमध्ये २००९ साली पेट्रोलचा प्रतिलिटर दर ४० रुपये होता. आता तो ६५ रुपये झाला आहे. पेट्रोलपासून बनणाऱ्या उत्पादनांवर केंद्र सरकार प्रचंड कर लावते. २०११ मध्ये डिझेलमध्ये प्रतिलिटर ३ रुपये, केरोसीनमध्ये

२ रुपये आणि घरगुती गॅसच्या सिलिंडरमागे ५० रुपये वाढ केल्याने देखील चलनवाढीत भर पडली आहे.

२.११ २०१०नंतर युरियाच्या दरात २० टक्के वाढ करण्यात आली आहे, आणि आता तो काळ्या बाजारात विकला जात आहे. बिगर युरिया खतांच्या किंमतींवरील नियंत्रण काढून टाकल्यामुळे २०१० मध्ये डी ए पी आणि एम् ओ पी या खतांच्या दरांत १०० टक्के वाढ झाली आहे. शेतीच्या आदानांच्या किंमतीत वाढ झाल्याने खर्च वाढल्याने होणारी चलनवाढ झाली आहे. आदानांच्या किंमती आटोक्यात ठेवण्याऐवजी इंधन आणि खतांवरील अनुदाने कापण्यावरच सरकारचा रोख राहिलेला आहे.

२.१२ सरकारने योग्य वेळी हस्तक्षेप न केल्याने रुपयाचे अवमूल्यन झाले आहे. भारताला खनिज तेल आणि खते आयात करावी लागत असल्याने अवमूल्यनामुळे चलनवाढीचा दबाव आणखीच वाढला आहे. रिझर्व बँक व्याजाचे दर सतत वाढवत राहिल्यानेसुद्धा अर्थव्यवस्थेत एकूणच उत्पादन खर्चात वाढ झाली आहे.

२.१३ पेट्रोलियम पदार्थांची दरवाढ मागे घ्यावी, जीवनावश्यक वस्तूंच्या वायदे बाजारावर बंदी घालावी, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून बीपीएल कींमतीना राज्यांनी वाटप करण्यासाठी केंद्राच्या अखत्यारीतील गोदामातील धान्यसाठे खुले करावेत , आणि सार्वजनिक वितरण व्यवस्था सार्वत्रिक करावी यासाठी माकपने सुचवलेले सर्व प्रस्ताव स्वीकारायला संपुआने सतत नकारच दिला. हे प्रस्ताव स्वीकारले असते तर सतत वाढणाऱ्या भाववाढीला चांगलाच अटकाव करता आला असता.

**अन्न सुरक्षा**

२.१४ केंद्र सरकारच्या धोरणांमुळे सार्वजनिक वितरण व्यवस्था खिळखिळी झाली असून अन्नधान्याच्या वाढणाऱ्या किंमतीपासून जनतेला संरक्षण द्यायला सरकार अपयशी ठरले आहे. ए पी एल/ बी पी एल या विभागणीमुळे कित्येक लोक वगळल्याच्या चुका झाल्या असून गरीबांना त्यांच्या अन्नापासून वंचित रहावे लागत आहे. नियोजन आयोगाने गरीबी ठरवण्यासाठी शहरी भागासाठी ३२ रुपये आणि ग्रामीण भागासाठी २६ रुपये दरडोई दैनंदिन उत्पन्न धरण्याची जी बनवेगिरी केली त्यावर देशभर मोठे काहूर उठले. तरीदेखील अजूनही लक्ष्याधारीत धोरणे ठरवताना हाच दंडक सरकार मानत रहाते.

२.१५ सरकारचे प्रस्तावित अन्न संरक्षण विधेयक हे अत्यंत केंद्रानुवर्ती विधेयक आहे. त्यात लक्ष्याधारीत व्यवस्था स्वीकारली आहेच, पण गरीबांच्यात आणखी

चिरफळ्या पाडण्यासाठी प्राधान्याने दारिद्र्य रेषेखालील (बी पी एल), सर्वसाधारण (ए पी एल) आणि वगळलेले थर अशी विभागणी आढळते. गरीबांच्या पदरात काय आणि किती पडायचे यालाही अटी घातलेल्या आहेत. अनुदानीत अन्नधान्य मिळायला पात्र घरांची संख्या किती हे ठरवायच्या राज्याच्या अधिकारदेखील केंद्र सरकार बासनात गुंडाळत राहील. केंद्र सरकारने धान्यावरील अनुदानाची रक्कम लाभधारकांना रोख देणे आणि त्यांना धान्याची कुपने देणे यासारख्या लोकविरोधी अटी स्वीकारायचे बंधन ही नवउदार चौकट राज्यांना घालते. याचा परिणाम शेवटी सार्वजनिक वितरण व्यवस्था रद्दबातल होऊन धान्याची अर्थव्यवस्था कार्पोरेट कंपन्यांच्या ताब्यात जाईल.

२.१६ अन्न सुरक्षेचा एकमेव विश्वसार्ह उपाय म्हणजे सार्वजनिक वितरण व्यवस्थेची पुनर्स्थापना. प्रति किलो २ रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा किंमतीला ३५ किलो धान्य प्रत्येक कुटुंबाला मिळणे हा सार्वत्रिक हक्क असला पाहिजे या भूमिकेशी माकप ठाम आहे. दाळी, खाद्यतेले आणि साखर हे पदार्थदेखील अनुदानीत किंमतींना सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून सर्वांसाठी उपलब्ध झाले पाहिजे.

**अर्थव्यवस्थेची मंदावलेली गती**

२.१७ सकल घरेलू उत्पादनाच्या वाढीचा दर मंदावला आहे. २०१० – ११ च्या ८.५ टक्क्यावरून २०११ – १२ मध्ये तो ७ टक्के इतका खाली आला आहे. जागतिक आर्थिक मंदी आणि देशात राबवले जात असलेले नव-उदार धोरण ही अर्थव्यवस्थेची गती मंद होण्याची कारणे होत. सतत वाढणाऱ्या महागाईमुळे लोकांची क्रयशक्ती कमी होत आहे आणि त्यामुळे देशातील मागणी खालावली आहे. याच्या परिणामी औद्योगिक उत्पादन मंदावून पायाभूत क्षेत्राची अधोगतीच होत आहे.

२.१८ रोजगाराची परिस्थिती तर जास्तच बिकट झाली आहे. सकल घरेलू उत्पादनात वाढ होऊनही देशातील एकूण रोजगारात घटच झाली आहे. नॅशनल सॅम्पल सर्व्हेच्या अगदी अलीकडील पहाणीनुसार २०००-२००५ या काळात रोजगारवाढीचा दर २.७ टक्के होता, तो २००५-२०१० च्या दरम्यान केवळ ०.८ होता. या काळात सकल घरेलू उत्पन्न वाढीचा वार्षिक दर ८ टक्क्यांच्या वर असताना बिगरशेती क्षेत्रात रोजगारवाढीचा दर ४.६५ वरून २.५३ टक्के इतका खाली आला आहे. आता सकल घरेलू उत्पादन वाढीच्या दरात घट होत असताना रोजगाराची अवस्था जास्तच चिंताजनक होत जाणार आहे.

२.१९ अर्थव्यवस्थेच्या वाढीला उत्तेजन मिळण्यासाठी सार्वजनिक गुंतवणुकीत वाढ केली पाहिजे. योजनेवरील खर्च २००९-१० मध्ये सकल घरेलू उत्पादनाच्या

५.६ टक्के होता. तो २०१०-११ मध्ये ४.६ टक्के झाला आहे. २००९ च्या आर्थिक अरिष्टातून मार्ग काढण्यासाठी केलेल्या राजकोषीय उपायात सार्वजनिक खर्च वाढवण्याऐवजी कर सवलतीच देण्यात आल्या. २००८-२०११ या तीन वर्षांत २,२८,०४५ कोटींच्या कर सवलतींची कार्पोरेट कंपन्यांवर खैरात करण्यात आली. २००७-०८ मध्ये कराचे सकल घरेलू उत्पादनाचे परस्परांशी प्रमाण १२ टक्के होते. २०१०-११ मध्ये ते ९.५ टक्के इतके खाली आले. परिणामी सार्वजनिक क्षेत्रावरील खर्चात कपात जाली. हा प्रवाह उलटा फिरवून कल्याणकारी योजना आणि पायाभूत सुविधा उभारण्यासाठी श्रीमंतांवरील करातून निधी उभा केला पाहिजे.

२.२० केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमधील गुंतवणूकदेखील वाढवली पाहिजे. भारताच्या सकल घरेलू उत्पादनात २००९-१० मध्ये जी एकूण मूल्यवृद्धी झाली त्यात केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचा वाटा केवळ ६.३ टक्के होता. सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे दूरसंचार, नागरी उड्डयन आणि खतनिर्मितीतील केंद्रीय सार्वजनिक उद्योग तोट्यात गेले आहेत. केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचा एकूण राखीव आणि वरकड निधी २००९-१०मध्ये ६ लाख कोटी होता. नवी गुंतवणूक आणि आर्थिक विस्तार करण्यासाठी या निधीतून तरतूद केली पाहिजे.

**शेतीक्षेत्राची अवस्था**

२.२१ भारताची जवळ जवळ ६० टक्के लोकसंख्या अजूनही शेतीवरच अवलंबून आहे. २००७ – १२ या ११व्या योजनेच्या काळात शेती उत्पादनवाढीच्या दराचे उद्दिष्ट ४ टक्के ठेवले होते. तो प्रत्यक्षात ३ टक्केच राहिला. ९व्या योजनेपासून शेती उत्पादनात वाढ करण्याची ठरवेलेली उद्दिष्टे कधीच गाठता आलेली नाहीत. अन्नधान्याची रोजची दरडोई उपलब्धता १९९१ मध्ये ५१० ग्रॅम होती. ती २०१० मध्ये ४३८ ग्रॅम इतकी खाली आली. उत्पादन वाढीचा कमी दर, अपुरी सिंचन व्यवस्था आणि मान्सूनवरील अति अवलंबित्व या कारणांनी मागणी पुरवता येईल इतके प्रमुख पिकांचे उत्पादन होईनासे झाले आहे. अन्नधान्याच्या वाढणाऱ्या किंमतींचे हे प्रमुख कारण आहे.

२.२२ नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरोनुसार १९९५ ते २०१० च्या दरम्यान देशात २, ५६,९१३ शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केली. शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येमागे कर्जबाजारीपणा हे एक महत्त्वाचे कारण आहे. २०११ मध्ये महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशात कापसाच्या किंमती कोसळल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. कर्नाटक आणि इतर राज्यातील रेशीम उत्पादक शेतकरीदेखील अत्यंत अडचणीत आहेत. भारतीय शेतकऱ्यांसाठी अत्यंत खर्चिक अशी नगदी एक-पीक पद्धती धोकादायक ठरली आहे.

२.२३ शेतकरी वर्गाला भेडसावणाऱ्या या अरिष्टाला नव-उदार धोरणच

कारणीभूत आहे. राष्ट्रीय शेतकरी आयोगाने केलेल्या शिफारशींकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीत (MSP) बहुतेक पिकांच्या उत्पादन खर्चात जी मोठी वाढ झालेली आहे, तिचा विचार करण्यात आलेला नाही. केंद्र सरकार करत असलेल्या धान्य खरेदीची व्याप्तीदेखील खूप मर्यादित आहे. त्यात धान्य साठवण्याच्या सुविधा नसल्याने सरकारच्या एकूणच धान्य खरेदीला मोठ्या मर्यादा आहेत. अपुरी सार्वजनिक गंतवणूक आणि अनुदानात करण्यात आलेली घट यााच्या परिणामी बियाणे, खते, इंधन/वीज इत्यादी आदानांच्या खर्चात खूप वाढ झाली आहे. यामुळे शेतीमालाला वाजवी दर न मिळाल्याने कित्येक शेतकऱ्यांना शेती परवडेनाशी झाली आहे. ग्रामीण पत पुरवठ्यावर मुख्यत: ग्रामीण श्रीमंतांनीच मक्तेदारी मिळवले आहे. शिवाय त्याचा वापर बिगरशेती व्यवहारासाठीच होत आहे. कमी दरातील पत पुरवठ्याचा अभाव आणि शेतीतून कमी मिळत जाणारे उत्पन्न यापायी कित्येक शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचे डोंगर आहेत, कर्जपोटी कित्येक आत्महत्त्या करतात तर कित्येकांना हतबल होऊन शेती विकणे भाग पडते.

२.२४ भारतातील एकूण शेतकरी कुटुंबांपैकी ८० टक्के छोटे किंवा सीमान्त शेतकरी आहेत. आणि तेच प्रामुख्याने शेतीतील अरिष्टाचे बळी ठरले आहेत. बटईदार आणि दुसऱ्याच्या शेतात राबणाऱ्या गरीब शेतकऱ्यांना या अरिष्टाला तोंड द्यावे लागतेच, पण त्यांचे तीव्र शोषणही होत रहाते. खेडयांतील जमीनदार आणि श्रीमंत शेतकऱ्यांचा वर्ग कुळांचे आणि शेतमजुरांचे विविध प्रकारे शोषण करतो. त्यासाठी कुळांचे हक्क डावलणे, दिलेल्या कर्जावर अवाच्या सव्वा व्याजदर लावणे आणि कमी वेतन देणे इ. मार्गांचा अवलंब केला जातो. ग्रामीण सधन बांधकाम उद्योगासारख्या इतर विविध बिगरशेती व्यवसायातही गुंतवणूक करू लागले आहेत. कार्पोरेट आणि कंत्राटी शेतीचे प्रमाणही वाढले आहे.

२.२५ शेतमजुरांची अवस्था हळूहळू फारच बिकट होत आहे. २०१० मध्ये शेतमजुरांची संख्या १४ कोटी होती. नव-उदार धोरणांपायी भूमीहीनांत वाढ होऊन शेतमजुरांची संख्या वाढली आहे. कित्येक राज्यांत शेतमजुरांसाठी किमान वेतनाचा कायदाच नाही, आणी त्यांच्यासाठी काही सामाजिक सुरक्षेच्या योजनाही नाहीत. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढलेल्या किंमतींचा सर्वात मोठा फटका त्यांनाच बसला आहे. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजना वरचेवर पातळ करत मजुरांना त्यांची न्याय्य मजुरी मिळण्याचा हक्क पायदळी तुडवला जात आहे. शेतमजुरांना दारूण अवस्थेत रहावे लागते आणि बहुसंख्य राज्यांत त्यांना रहायला घरे किंवा घरे बांधायला जागा द्यायचे प्रयत्नदेखील केले जात नाहीत. शेतमजूर स्त्रियांची अवस्था तर याहून भीषण आहे. शेतमजुरांतील कर्जाचे प्रमाण वाढत आहे आणि त्यांना आता जगायचे कसे हा प्रश्नच भेडसावू लागला आहे. सराकरच्या धोरणांमुळे त्यांना शहरांत नाही तर दुसऱ्या भागात स्थलांतर करून भयाण अवस्थेत जगणे भाग पडू

लागले आहे. शेतमजुरांसाठी वेतन आणि सामाजिक सुरक्षेच्या तरतुदी करणारा व्यापक कायदा करायला केंद्र सरकार सतत नकारच देत आले आहे.

२.२६ मुक्त व्यापार करार (FTA) आणि आयातकरात कपात या मार्गांनी व्यापाराचे उदारीकरण करून आणि शेतीचा शासकीय आधार काढून घेऊन सराकर नव-उदार धोरणांचा पाठपुरावा करत आहे. हे छोटा शेतकरी शेतीतून उठावा यासाठीच केले जात आहे. जागतिकीकरणामुळे इतर अनेक विकसनशील देशांत झाले त्याप्रमाणे भारतीय शेती परकीय आणि देशातील कार्पोरेट कंपन्यांच्या घशात घालण्याचा मार्ग मोकळा केला जात आहे. हा हल्ला परतवून लावणे हे भारतीय शेतकऱ्यासमोरील प्रमुख वर्गीय आव्हान आहे.

## भूमी अधिग्रहण

२.२७ अलिकडच्या काळात सेझ, कार्पोरेटस् आणि खाणउद्योगासाठी १८९४ च्या पाशवी भूमी अधिग्रहण कायद्याचा वापर केल्याने या बळजबरीने जमिनी ताब्यात घेण्याच्या प्रकारांविरुद्ध शेतकरी, शेतमजूर आणि स्थानिक जनतेचे कित्येक लढे झाले आहेत. गेल्या तीन वर्षांत जमीन ताब्यात घेण्याविरुद्ध १७ राज्यातील ४०हून अधिक जिल्ह्यांत निषेध आंदोलने झाली आहेत. शेतकरी आणि त्या जमिनीवर अवलंबून असलेल्यांना अगदी किरकोळ नुकसान भरपाई देऊन आणि त्यांच्या पुनर्वसनाचे कोणतेच उपाय न करता हजारो एकर जमीन ताब्यात घेण्यात आली. विशेषत: आदिवासींना त्यांच्या पारंपरिक हक्काच्या जमिनी हिरावून घेऊन आणि त्यांच्या राहत्या वस्त्यांतून विस्थापित करण्यात आले. हजारो मच्छीमारांना समुद्र किनाऱ्यावरून हुसकावून लावण्यात आले आहे. त्यामुळे त्यांना जगणेच कठीण झाले आहे. उत्तर प्रदेशात यमुना एक्सप्रेसवे प्रकल्पात केवळ राजमार्गासाठीच नव्हे तर विकसकांना शहरी वस्त्या उभ्या करता याव्यात म्हणून मोठ्या प्रमाणात जमिनी ताब्यात घेण्यात आल्या. या अदिग्रहणाच्या विरुद्ध पश्चिम उ. प्रदेशात अलिगढ, मथुरा, आणि बृहन् नॉईडा या ठिकाणी झालेल्या आंदोलनात १४ लोक ठार जाले. हरयाणा, ओरिसा, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश या राज्यांतही जमीन अधिग्रहणाविरुद्ध आंदोलने झाली आहेत. महाराष्ट्रात रायगड जिल्ह्यात रिलायन्स कंपनीच्या महामुंबई सेझसाठी जमीन अधिग्रहित करनूयात आली होती. त्याविरुद्ध तेथील लोकांनी मोठ्या निर्धाराने आंदोलन करून तो प्रकल्पच रद्द करायला भाग पाडले. पक्ष, किसान आणि शेतमजूर यांच्या संघटनांनी बळजबरीच्या जमीन अधिग्रहणाला विरोध करून शेतकऱ्यांचा जमिनीवरचा हक्क अबाधित ठेवण्यास लढा करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

२.२८ सरकारच्या प्रस्तावित भूमी अधिग्रहण आणि पुनर्वसन विधेयकात नुकसान भरपाई आणि पुनर्वसन या दोन्ही निकषांवर शेतकऱ्यांचे पुरेसे संरक्षण करणाऱ्या तरतुदी नाहीतच, शिवाय खासगी रित्या जमीन अधिग्रहित करण्यात येत

असेल तर या अपुऱ्या तरतुदीही सक्तीच्या केलेल्या नाहीत. असा रीतीने खनिजांनी संपन्न असलेले आदिवासी प्रदेश कार्पोरेट कंपन्यांना खुले होऊन आदिवासींच्या जमिनीवरील हक्कावर गदा येईल.

२.२९ जमीन मालकांचे, विशेषत: छोटे जमीन मालक आणि त्यांच्या जमिनीवर अवलंबून असलेले वाटेकरी आणि शेतमजूर यांच्या हितसंबंधांचे संरक्षण करणाऱ्या भूमी अधिग्रहण आणि पुनर्वसन विधेयकासाठी माकप संघर्ष करत राहील. तसेच, जुलूम आणि अन्यायाने जमीन हिरावून घेण्याचे प्रयत्नही हाणून पाडण्यासाठी संघर्ष करत राहील.

## उदारीकरणाची वीस वर्षे

२.३० भारतातामध्ये नव-उदार आर्थिक सुधारणा लागू केल्याला २०११ साली वीस वर्षे पूर्ण होतात. या वीस वर्षांत केंद्र सरकारने भारताची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेत विलीन करण्याचे आणि उदारीकरण व खासगीकरण करण्याचे धोरण अवलंबले. सत्तेत कोणताही पक्ष असो, त्याने नव-उदार धोरणेच राबवली आहेत आणि त्याला भारतातल्या सत्ताधारी वर्गांनी बड्या भांडवलदाराच्या नेतृत्वाखाली सतत पाठिंबाच दिला आहे. वेगाने वाढणारे उत्पन्न आणि वाढती क्रयशक्ती याचा मोठा लाभ बडे उद्योजक आणि शहरी उच्चभ्रू यांना होत आहे. पण दुसऱ्या बाजूला शहरांत कामगार वर्ग व कनिष्ठ मध्यमवर्ग, आणि ग्रामीण भागात जमीनदार आणि श्रीमंत सोडून शेतीतले सर्व वर्ग, य सर्वांचे जीवन कठीण होऊ लागले आहे. वरिष्ठ वर्गांना संपन्नता आणि कष्ट करून जगणाऱ्या आणि बहुसंख्येने असलेल्या वर्गांना विपन्नता ही नव-उदार भारताची ओळख आहे.

## बडे भांडवल

२.३१ नव-उदार सुधारणांचे खरे लाभधारक बडे भांडवलदार असल्याचे दिसून आले आहे. गेल्या वीस वर्षांत बड्या भांडवलदार घराण्यांची संपत्ती आणि मालमत्ता अक्षरश: आकाशाला गवसणी घालू लागली आहे. ज्यांची संपत्ती ५००० कोटी रुपयांहून अधिक आहे अशा बड्या भांडवलदारांची संख्या २००३ साली १३ होती. फोर्ब्सच्या यादीनुसार ती मार्च २०११ मध्ये ५५ झाली होती.

२.३२ गेल्या दहा वर्षांत बडे भारतीय भांडवलदार जगात इतरत्रही प्रभाव निर्माण करू लागले आहेत. भारतातून बाहेर जाणारी परकीय थेट गुंतवणूक वाढली आहे. ती २००० साली १०,००० कोटी रुपये होती. २०१० मध्ये ती ४ लाख कोटी झाली. २०१०-११ मध्ये देशातून २,१५,००० कोटी रु. परकीय थेट गुंतवणुकीसाठी देशाबाहेर गेले. भारतीय कार्पोरेट कंपन्यांची परदेशात होणारी गुंतवणूक बऱ्याच प्रमाणात विकसित देशांतील कार्पोरेट कंपन्या विकत घेण्यासाठी होते. उदा. टाटा स्टीलने कोरस खरेदी करण्यासाठी ६०,००० कोटी रु. गुंतवले आणि टाटा मोटर्सने

जग्वार आणि लॅन्ड रोव्हर घेण्यासाठी १०,००० कोटी रु. गुंतवले. भारतीय शेती-उद्योजक (agribusiness) आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि पूर्व आशियात मोठ्या प्रमाणावर जमिनी घेऊन नगदी पिके काढत आहेत. एका अंदाजानुसार ८० हून अधिक भारतीय कंपन्यांनी जवळ जवळ ११,००० कोटी रु. आफ्रिकेतील मळे विकत वा भाडेपट्टीवर घेण्यासाठी गुंतवून त्या जमिनीत आता भारतीय बाजारपेठेसाठी धान्याचे उत्पादन केले जाणार आहे.

**कामगारांचे शोषण**

२.३३ १९९८ मध्ये संघटित क्षेत्रातील एकूण रोजगार २.८२ होता. २००८ साली तो २.७५ कोटी झाला. "उद्योगाचे वार्षिक सर्वेक्षण" च्या अहवालानुसार १९८० मध्ये manufacturing उद्योगातील वाढलेल्या मूल्यात कामगारांच्या पगाराचा हिस्सा जवळ जवळ ३० टक्के होता. तो नव्वदीत २० टक्के आणि २००८-०९ मध्ये तर केवळ १० टक्के इतका खाली आला आहे. याउलट १९८० च्या दशकात वाढलेल्या मूल्यातील नफ्याचा हिस्सा कामगारांच्या पगाराहून कमी म्हणजे सुमारे २० टक्के होता. १९९० च्या दशकात उदारीकरणानंतर तो पगाराच्या हिश्श्याहून जास्त होत संपूर्ण दशकभर ३० टक्क्याच्या आसपास राहिला. २००१ पासून नफ्याचा हिस्सा वाढत जाऊन २००८ मध्ये ६० थक्क्यांवर जाऊन पोहोचला. कारखाना क्षेत्रात एकूण कामगारांमध्ये कंत्राटी कामगारांचे प्रमाण १९९९ – २००० मध्ये २० टक्के होते, ते वाढून २००८ – ०९ मध्ये ३२ टक्के झाले. या कंत्राटी कामगारांना कायमच्या कामाचे संरक्षण सोडाच, पण इतर सामाजिक सुरक्षेचे फायदेही मिळत नाहीत.

२.३४ अशा रीतीने सकल घरेलू उत्पादन वाढले तरी त्यामुळे पुरेसा रोजगार वाढलेला नाही, आणि जो रोजगार निर्माण झाला आहे, त्याचे स्वरूपही खूप शोषक झाले आहे. उत्पन्नातील नफ्याचा हिस्सा वाढत जाऊन कायमच्या कामगारांची जागा कंत्राटी कामगार घेत आहेत. त्यामुळे कामगारांची मालकांबरोबर सौदा करायची ताकद कमी झाली आहे. २००९ – १० च्या नॅशनल सॅम्पल सर्व्हेने देशातील एकूण कामगारांमध्ये ५१ टक्के स्वयंरोजगार करणारे, ३३.५ टक्के नैमित्तिक कामगार आणि १५.६ टक्के हे पगारदार नोकर आहेत हे दाखवून दिले आहे. एकूण रोजगारातील नैमित्तिक रोजगाराचे प्रमाण, विशेषत: स्त्रियांमध्ये, वाढले आहे.

२.३५ असंघटित क्षेत्रातील उद्योगांसाठी राष्ट्रीय आयोगाने (NCEUS ने) दिलेल्या अहवालानुसार २००४ – ०५ मध्ये भारतात एकूण कामगारांची संख्या ४५.६ कोटी होती. त्यापैकी ३९.३ कोटी असंघटित (informal) क्षेत्रात होते. याचाच अर्थ २००४ – ०५ मध्ये असंघटित कामगार एकूण कामगारांच्या ८६ टक्के होते. समाजाच्या या सर्वात शोषित विभागातील ७७ टक्के लोकांनाच दर दिवशी २० रुपयांहून कमी रकमेवर गुजराण करावी लागते. राज्या - राज्यामधील स्थलांतरात

वाढ झाली असून या स्थलांतरीत कामगारांचे शोषण कमालीचे वाढले आहे.

२.३६ काम करणाऱ्यांचे जीवनमान उंचावेल असा रोजगार देणे नवउदार अर्थव्यवस्थेला शक्य नसल्याने कामकऱ्यांचे समूहच्या समूह असंघटित आणि स्वयंरोजगाराय्या खातेऱ्यात ढकलले जात आहेत. त्यांना अत्यंत असुरक्षित आणि दैन्यावस्थेत जगावे लागत आहे. स्वयं रोजगार म्हणजे हमखास कमी उत्पादनाचे, किरकोळ आणि अनिश्चित कमाई देणारे क्षेत्र. आर्थिक मंदी आणि पाठ मोडणारी अन्न् धान्याची भाववाढ याची झळ पोहोचते ती या विभागालाच.

**अभूतपूर्व भ्रष्टाचार:**
**संपुआ सरकारचे व्यवच्छेदक लक्षण**

२.३७ संपुआ सरकार म्हणजे उच्च पदस्थांचा भ्रष्टाचार हे समीकरणच झाले आहे. २जी स्पेक्ट्रम घोटाळा उघड होऊन द्रमुकचे माजी दूरसंचार मंत्री, एक खासदार, काही नोकरशहा आणि कार्पोरेट कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना अटक होऊन त्यांच्यावर खटले दाखल झाले. २००८ मध्ये दूरसंचार कंपन्यांना अगदी किरकोळ किंमतींना २ जी परवाने देण्यात आले. त्यामुळे सरकारला कॅगच्या अंदाजानुसार ५७,००० कोटी ते १.७६ लाख कोटी रुपयांचा तोटा झाला. स्वतंत्र भारतातला हा सर्वात मोठा भ्रष्टाचाराचा घोटाळा झाकण्याचे प्रयत्न सर्वोच्च न्यायालयाचा हस्तक्षेप आणि त्याने सी बी आय च्या तपासणीवर नजर ठेवल्यामुळे विफल झाले. माजी अर्थमंत्री आणि पंतप्रधानांच्या भूमिकेविषयीही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. बडे भांडवलदार, सत्तेतील राजकारणी आणि नोकरशहा यांच्यातील साखळी २जी स्पेक्ट्रम प्रकरणाने नाट्यमयरित्या उघड केली आहे. ही साखळीच मुळात नव-उदार अर्थव्यवस्थेचे अपत्य असून भ्रष्टाचाराचे उगमस्थान आहे. या साखळीशी कार्पोरेट प्रसारमाध्यमे कशी जोडली आहेत हे राडिया टेप्सने उघड केले आहे.

२.३८ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये झालेल्या घोटाळयामुळे एक कॉंग्रेसचे खासदार आणि त्यांचे काही चेले अटकेत आहेत. लाच घेऊन त्यांनी काही कंपन्यांना जादा दराची कंत्राटे बहाल करून टाकली. या स्पर्धांसाठी दिल्लीत राज्य आणि केंद्र सरकारच्या विभागांनी कित्येक प्रकल्प उभे केले. त्यातही मोठा भ्रष्टाचार झाल्याचे कॅगच्या अहवालात म्हटले आहे. केजी बेसीन नैसर्गिक वायु घोटाळाही उघडकीला आला आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहकार्याने रिलायन्स इंडस्ट्रीज लि. ला नैसर्गिक वायु भूस्तराखालून काढण्यासाठी भांडवली खर्च कृत्रिम रित्या वाढवून दाखवण्यात आला. यामुळे सरकारचे मोठे नुकसान झाले. कोट्यावधी रुपयांचे बेकायदेशीर खाणकामही केवळ वरील भ्रष्ट साखळीमुळेच अव्याहत चालू आहे. आय पी एल, आदर्श, इस्रोचा ॲन्ट्रिक्स-देवास सोबतचा करार आदी इतरही घोटाळे उघड झाले आहेत. सरकारच्या वरिष्ठ स्तरावरील निर्णय प्रक्रिया वशिलेबाजीमुळे (cronyism)

किती विकृत झाली आहे, हेच या घोटाळ्यांवरून दिसून येते. सरकारमधील कॉंग्रेस नेतृत्वाची या घोटाळ्यातील जबाबदारी झाकण्याचा प्रयत्न होत आहे. भ्रष्टाचाराची अनिष्ट सांगड जोपासण्यासाठी संपुआ सरकार काहीही करायला तयार असल्याचे दिसून आले.

२.३९ ग्लोबल फायनान्शियल इन्टेग्रिटी (GFI) या संस्थेच्या अंदाजानुसार २००८ पर्यंत भारतातून बेकायदेशीररित्या बाहेर नेलेल्या भांडवलाची रक्कम २३ लाख कोटीहूनही अधिक आहे. लाचखोरी, गुन्हेगारी आणि बुडवलेले कर यातून जमा केलेली ही बेकायदेशीर रक्कम आहे. १९९१-२००८ या दरम्यान सुधारणा कार्यक्रमाचा भाग म्हणून विनियंत्रण आणि उदारीकरण राबवण्यात आले, त्यामुळे पैसा बेकायदेशीरपणे देशाबाहेर जायच्या प्रक्रियेला वेग आला, असे GFI च्या अभ्यासात नमूद केले आहे.

२.४० काळा पैसा, स्विस बॅंका आणि इतर करापासून सशरक्षण असलेल्या देशांत जो पैसा जमा करण्यात आला आहे तो परत आणण्याबाबत सरकार कमालीची दिरंगाई करत आहे. या बॅंकांमध्ये कुणाची गुप्त खाती आहे याची यादी सरकारकडे आहे. मात्र, सरकार त्यांची नावे उघड करायला तयार नाही. हे बाहेर साठवून ठेवलेले पेसे जप्त करून सरकारने ते विकासकामासाठी वापरले पाहिजेत, अशी मागणी माकप करीत आहे. भारतात कमावलेला पैसा मॉरिशसमार्गे परत भारतात आणणे हा काळ पैसा निर्माण करायचा सर्वात मोठा मार्ग आहे. भारतात येणारा परकीय थेट गुंतवणुकीतला ४१ टक्के पैसा हा मॉरिशसमार्गेच येतो. भारताचा मॉरिशससोबतचा दुहेरी करमाफी करणारा Double Tax Avoidance Agreement (DTAA) हा करार मोडीत काढला पाहिजे.

२.४१ भाजप आणि कॉंग्रेस यांची आर्थिक विचारसरणी एकच असल्याने भ्रष्टाचाराशी लढायला योग्य व्यासपीठ भाजप देऊ शकत नाही. कर्नाटकच्या लोकायुक्तांनी भाजपच्या माजी मुख्यमंत्र्यांना जमीन घोटाळ्यात दोषी ठरवले आहे. बाजपच्या सरकारमध्ये मंत्री असलेले रेड्डी बंधूंची बेकायदेशीर खाणींच्या आरोपावरून तुरूंगात रवानगी करण्यात आली आहे. बाजपच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकारची राजवटही संशयास्पद संरक्षण करार, युटीआय घोटाळा आणि सार्वजनिक क्षेत्र कवडीमोल किंमतीला फुंकून टाकायचा झपाटा अशा घोटाळ्यांनी कलंकीत झाली होती. त्यामुळे भाजपने भ्रष्टाचाराच्या विरुद्ध कितीही मोहीम चालवायचा आव आणला तरी त्याला विश्वासार्हता येणे शक्य नाही.

## भ्रष्टाचारविरोधातील उपाय/भ्रष्टाचारावरील उपाय

२.४२ कल्पनातीत भ्रष्टाचार आणि महा घोटाळे उघड झाल्याने जनतेत

संतापाचा उद्रेक झाला. अण्णा हजारेंच्या नेतृत्वाखालील आंदोलनाने परिणामकारक लोकपाल विधेयक आणण्याची मागणी केली आणि तिला जनतेचा, विशेषत: मध्यमवर्गांचा, व्यापक पाठिंबा मिळाला. परिणामकारक कायदा करायला नाखूश असलेल्या सरकारला जनतेच्या सततच्या दबावामुळे शेवटी विधेयक आणावे लागले. संसदेसमोर सरकारने सादर केलेले अधिकृत विधेयक दुबळेच आहे. त्यात लोकपालाचे अधिकार कमी करून त्याला सरकारवर अवलंबून ठेवले आहे. २९ डिसेंबरला हे विधेयक राज्यसभेत सादर करण्यात आले. विरोधी पक्षांनी सुचवलेल्या दुरूस्त्या राज्यसभेत स्वीकारल्या गेल्या असत्या. सरकारने राज्यसभेत ते विधेयक ज्या रीतीने बारगळून टाकले, त्यावरून सरकारला परिणामकारक लोकपाल नको आहे, हेच स्पष्ट झाले.

२.४३ माकपने नेहमीच स्वतंत्र अस्तित्व आणि स्वत:ची तपासणी यंत्रणा असलेल्या सक्षम लोकपालाची मागणी केली आहे. परंतु, भ्रष्टाचाराशी सामना करण्याच्या व्यापक प्रश्नाबाबत आपल्या पक्षाचा आणि सर्वच डाव्या पक्षांचा दृष्टिकोन अण्णा हजारेंच्या गटाहून भिन्न आहे. नव-उदार आर्थिक नीतीमुळे बडे भांडवलदार-सत्ताधारी राजकारणी-नोकरशहा यांची परस्परांचे हितसंबंध जोपासणारी साखळी तयार झाली आहे, आणि या साखळीतूनच उच्चस्तरीय भ्रष्टाचाराची लागण झाली आहे, असे माकप मानतो. कार्पोरेट कंपन्यांना नैसर्गिक साधनसंपत्तीची लूट करायला शासनसंस्था मदत करत आहे आणि भले मोठे घोटाळे झालेत ते जमीन, नैसर्गिक वायु, स्पेक्ट्रम आणि खाण उद्योगात. लोकपालासिवात इतरही उपाय करण्याची गरज आहे. न्यायाधिशांची नेमणूक आणि न्यायालयीन भ्रष्टाचाराची चौकशी करायचे अधिकार असलेला राष्ट्रीय न्याय आयोग स्थापन केला पाहिजे. निवडणुकीत होत असलेला बेकायदेशीर पैश्याचा वापर थांबवण्यासाठी निवडणूक सुधारणा करायलाच हव्यात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कार्पोरेट लुटीला आणि भ्रष्टाचाराला खतपाणी घालणारी नव-उदार धोरणे बदलण्यासाठी जनतेचा बळकट लढा उभा केला पाहिजे.

**जमातवाद**

२.४४ २००९च्या लोकसभा निवडणुकीत बाजपचा पराभव झाल्यानंतर जमातवादी विषयपत्रिका पुढे नेत त्या पराभवातून सावरायचा प्रयत्न हिंदुत्ववादी शक्ती करत आहेत. राजकीय स्तरावर सातत्याने "मुस्लिम दहशतवादा"विरुद्ध मोहीम उघडून या आरोपावरून मुस्लिम समाजाला लक्ष्य केले जात आहे. दैनंदिन सार्वजनिक जीवनात धार्मिक तणाव आणि हिंसा चेतवण्याचा आपला आवडता उद्योग जमातवादी शक्ती करत आहेत. १९व्या परिषदेनंतर हैद्राबाद, बरेलि, अहमदाबाद, नांदेड, गोपालगड, मुरादाबाद आणि रुद्रपूर येथे जाती हिंसाचार घडून आला. गृह मंत्रालयाच्या माहितीनुसार २००९ मध्ये ७९१ धार्मिक आणि

जमातवादी हिंसाचाराच्या घटना घडल्या आणि त्यांत ११९ लोक मृत्युमुखी पडून २,३४२ जण जखमी झाले. २०१०मध्ये ६५८ घटनांमध्ये १११ जण बळी गेले तर १,९७१ जखमी झाले. अशा घटना आणि परिस्थितीमुळे जमातवादी राजकारणाला खतपाणीच मिळत रहाते. कर्नाटक, मध्य प्रदेश आणि गुजरात या भाजपचे सरकार असलेल्या राज्यांत मुस्लिम आणि ख्रिश्चन या दोन्ही अल्पसंख्याक समाजांना हल्ल्याचे लक्ष्य केले जात आहे. भाजपचे सरकार गेलेल्या राजस्थानमध्ये जमातवादी हिंसाचारच्या कित्येक घटना घडल्या आहेत.

**दहशतवादाचा धोका**

२.४५ दहशतवादी हिंसाचारामध्ये हिंदुत्ववादी अतिरेकी शक्तींचा हात असल्याचे उघड झाल्यापासून रा.स्व. संघ आणि भाजपच्या दहशतवादाला जमातवादी रंग द्यायच्या प्रयत्नांना गंभीर खीळ बसली आहे. मालेगाव, अजमेर शरीफ, मक्का मस्जिद आणि समझौता एक्सप्रेस या साऱ्या बॉबस्फोटांचे धागेदोरे हिंदुत्ववादी अतिरेक्यांपर्यंत जाऊन पोहोचले आहेत. या निंदनीय गुन्हयांवरून प्रज्ञा ठाकूर, असीमानंद आणि त्यांच्या बगलबच्च्यांवर खटले दाखल झाले आहेत. हिंदुत्ववादी धार्मिक व्यक्तींचा सरकार छळ करीत असल्याचा दांभिक आरोप करून रा. स्व. संघ आणि भाजपने या अतिरेक्यांना संरक्षण द्यायचा प्रयत्न केला. परंतु सज्जड पुरावा मिळालयाने त्यांचे हे प्रयत्न फोल ठरले. गुजरात सरकारचे इशरत जहान सारखे पोलीस एन्काऊंटर प्रकरण, २००२चे अल्पसंख्याकांचे शिरकाण झाकून टाकण्याचा प्रयत्न आणि न्यायव्यवस्था, कायदा आणि सुव्यवस्था यांची हेतुपुरस्सर हेटाळणी यामधून हिंदुत्ववादी विचारसरणी ही धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही व्यवस्थेला किती मारक आहे, हेच दिसून येते.

२.४६ गेल्या चार वर्षांत काही मुस्लिम अतिरकी गटांनी सततच्या हिंसक घटना घडवून आणल्या आहेत. नोव्हेंबर २००८ मधील मुंबईवरील दहशतवादी हल्ला पाकिस्तानातील जिहादी गटांनी केला होता. मुंबईत पुन्हा २०११ च्या जुलैमध्ये झालेले एका मागोमाग एक असे तीन स्फोट आणि त्यानंतर दिल्ली उच्च न्यायालयाच्या बाहेर झालेल्या स्फोटात कित्येक लोक ठार आणि शेकडो जखमी झाले. मुस्लिम आणि हिंदु या दोन्ही अतिरेक्यांच्या दहशतवादी कारवायाना विरोध करून त्यांचा मुकाबला केला पाहिजे. अतिरेकी जमातवादी विचारसरणी दहशतवाद जन्माला घालते. ही विचारसरणी आणि ती जोपासणारे गट यांना अलग पाडून त्याविरोधात लोकांना संघटित करायला हवे. जमातवाद आणि दहशतवाद यांच्यातील नाते उघड करून दोन्हीविरुद्ध मोहीम उघडायला हवी.

**घातक माओवादी हिंसाचार**

२.४७ माओवाद्यांची कृत्ये लोकशाही चळवळीला किती घातक आहेत, हे

गेल्या तीन वर्षांत खूपच स्पष्ट झाले आहे. छत्तीसगड, झारखंड, ओडिशा आणि प. बंगालमध्ये माओवादी हिंसाचारात वाढ झाली आहे. माओवादी या राज्यांतील तसेच बिहार, आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्राच्या काही भागातील आदिवासी प्रदेशात आणि जंगलांत कार्यरत आहेत. ते आदिवासींना शासनसत्तेविरुद्ध शस्त्र घ्यायला लावतात. त्यामुळे आदिवासींना शासनसंस्थेच्या दडपशाहीची तीव्र झळ सोसावी लागते. माओवादी केवळ संरक्षक दलातील सैनिकांवरच हल्ले करून थांबत नाहीत. राजकीय पक्ष आणि माओवाद्यांना सहकार्य न करणाऱ्या इतर लोकांनाही ते आपल्या हल्ल्याचे लक्ष्य बनवतात.

२.४८ एक अत्यंत धक्कादायक गोष्ट म्हणजे माओवाद्यांनी गेल्या तीन वर्षांत प. बंगालमध्ये माकपच्या २१० कार्यकर्त्यांना आणि पाठीराख्यांना ठार केले आहे. यातून त्यांचा खरा चेहरा दिसून येतो. क्रांतीकारक भाषेचा बुरखा पांघरून ते प्रत्यक्षात डाव्या शक्तींच्या विरोधातील साधन म्हणून काम करतात. माओवाद्यांनी संपूर्ण देशांत इतर सर्व राजकीय पक्षांचे जितके कार्यकर्ते ठार केले आहेत, त्याहून किती तरी अधिक कार्यकर्ते एकट्या माकपचे ठार केले आहेत.

२.४९ माओवाद्यांनी दांतेवाडा येथे बसमध्ये स्फोट करून कित्येक प्रवाशांना ठार केले. तसेच ज्ञानेश्वरी एक्सप्रेसला घातपात करून १४९ निरपराध प्रवाशांची निर्घृण हत्त्या केली. त्यांच्या या अमानुष कृत्यांवरून ते सामान्य जनतेच्या विरुद्ध कसे दहशतवाद वापरत आहेत, हे स्पष्ट होते.

२.५० माकपवर हल्ले करण्यासाठी माओवाद्यांनी तृणमूल कॉंग्रेससोबत हातमिळवणी केली, हे नक्षलवाद्यांच्या इतिहासातील एक अत्यंत निंदनीय असे प्रकरण आहे. माओवादी निवडणूक काळात पैश्यासाठी भांडवली पक्षांशी कसे हातमिळवणी करतात हे झारखंड, छत्तिसगड आणि ओडिशात दिसून आले आहे. कंत्राटदार, उद्योजक आणि स्थानिक अधिकाऱ्यांकडून "कराच्या" नावाखाली ते हप्ते वसूल करतात.

२.५१ अशा रीतीने माओवाद हे अति-डाव्या साहसवादाचे विकृत रूप आहे. माओवाद्यांच्या प्रतिगामी विचारसरणीचा आणि घातक राजकारणाचा पर्दाफाश केला पाहिजे. स्वत:ला डावे म्हणवून घेणारे काही मध्यमवर्गीय (petty bourgeois) बुद्धिवादी माओवाद्यांचे समर्थन करताना दिसून येतात. त्यांची संशयास्पद भूमिका उघड करून त्याविरुद्ध वैचारिक संघर्ष केला पाहिजे.

२.५२ माओवादयांच सततच हिंसाचार, फॅसिस्टांसारखा राजकीय विरोधकांविषयी असलेला intolerance आणि प. बंगालमधील माकपचे कार्यकर्ते आणि समर्थक यांच्यावर करत असलेले हल्ले याविरुद्ध पक्षाने लोकशाही विचार

मानणाऱ्यांना संघटित करून कृतीत उतरवायला हवे.

## ईशान्य भारत

२.५३ ईशान्य भारतातील राजकीय परिस्थितीत आदिवासी आणि विविध वांशिक गटांच्या अस्मितांच्या राजकारणाचे प्राबल्य दिसून येते. केंद्र सरकारने सातत्याने या प्रदेशाची अवहेलना करून त्याला विषमतेची वागणूक दिली आहे. त्यामुळे तेथील जनतेत असंतोष निर्माण होऊन त्यांना परात्मतेच्या, तुटलेपणाच्या भावनेने ग्रासले आहे. त्यांच्या या भावनिक अवस्थेचा आणि विविध वंशांमधील व जमाती- जमातींमधील भेदांचा वापर अतिरेकी गट करत असल्याचे दिसून येते.

२.५४ मणिपूरमध्ये सलग १२० दिवस राज्यात येणारे महामार्ग बंद केल्यामुळे जनतेला मोठ्या यातना भोगाव्या लागल्या. डोंगरी प्रदेशातील कुकी आणि नागा लोकांमधील स्पर्धेचा हा परिणाम होता. या नाकेबंदीच्या संपूर्ण काळात केंद्र सरकार हात बांधून स्वस्थ बसून राहिले होते. ही नाकेबंदी उठवण्यासाठी हस्तक्षेप करायला त्याने नकार दिला. कित्येक गटांनी आपापली सशस्त्र दले उभारली आहेत. त्यांचा वापर करून ते हप्ते गोळा करतात, प्रशासनाच्या अधिकारांना आव्हान देतात. जनतेने व्यापक प्रमाणावर मागणी करूनही AFSPA हा लष्कराला विशेष अधिकार देणारा कायदा सरकारने मागे घेतलेला नाही.

२.५५ या भागातील भांडवली ताजकारणी, नोकरशहा आणि कंत्राटदार यांच्या भ्रष्ट साखळीमुळे केंद्रातून आलेला निधी मधल्या मध्ये हडप केला जातो. यामुळे या प्रदेशाच्या आर्थिक आणि पायभूत सुविधांच्या विकासावर दुष्परिणाम झाला आहे. या भागातील त्रिपुरा हे एकमेव राज्य अशा भ्रष्ट साखळीला अपवाद आहे.

२.५६ बांगलादेश सरकारने आपल्या हद्दीत रहात असलेल्या उल्फाच्या बऱ्याच नेत्यांना भारताच्या हवाली केल्यानंतर उल्फाचे नेतृत्व, राज्य आणि केंद्र सरकार यांच्यात त्रिपक्षीय बोलणी सुरू झाली, आणि त्यामुळे आसाममध्ये शांतता प्रस्थापित होण्याची शक्यता वाढली आहे. उल्फा नेतृत्वात बहुमत असलेल्या गटाने सशस्त्र लढ्याचा त्याग करून या चर्चेत सहभागी व्हायचा निर्णय घेतला. परेश बारुआच्या नेतृत्वाखालील एक छोटा गट अजूनही शांतता प्रक्रियेच्या विरोधात आहे. नॅशनल सोशलिस्ट कौन्सिल ऑफ नागालॅण्ड (IM) यांच्याबरोबर चर्चा चालू आहे, पण अजून त्याला म्हणावे तसे यश आलेले नाही. नागालिम या नावाच्या बृहन नागालॅण्ड राज्याची मागणी हा प्रश्न सुटण्यातील प्रमुख अडथळा आहे. ईशान्य भारतातील राजकीय प्रश्न सोडवण्यासाठी केंद्र सरकारने इतर सर्वच अतिरेकी गटांशी चर्चा सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.

२.५७ त्रिपुरामध्ये डावे सरकार जनतेमध्ये अव्याहत करत असलेले राजकीय

काम, विकास कार्यक्रम आणि दहसतवादाविरुद्ध घेतलेली ठाम भूमिका यामुळे तेथील अतिरेकी अलग पडून त्यांच्या हिंसक कारवायांना आळा घालून आदिवासी आणि बिगर-आदिवासी यांच्यात सौदार्ह आणि एकजूट घडवून आणण्यात यश आले आहे. ईशान्येतील इतर राज्यांसाठी हा वस्तुपाठच आहे.

**जम्मू आणि काश्मीर**

२.५८ राज्यात अतिरेक्यांच्या आणि दहशतवाद्यांच्या हिंसाचारात लक्षणीय घट झाली आहे. तथापि, यामुळे तेथील जनतेमधील भारतीय शासनसंस्थेविषयी निर्माण झालेली अलगपणाची भावना कमी झालेली नाही. २०१०च्या उन्हाळ्यातील सामुहिक निषेध आंदोलनांत १२० युवकांचा बळी गेला. त्यात काही कोवळया वयातील युवकही होते. संरक्षण दलांवर दगडफेक करणाऱ्या या युवकांना गोळया घालून निर्घृणपणे ठार करण्यात आले. मोठ्या प्रमाणावर कायम तैनात केलेले लष्कर आणि सुरक्षा दलांची जुलमी दडपशाही यामुळे जनता त्रस्त आणि संतप्त झाली आहे. आपल्या सवयीनुसार केंद्र सरकार, त्या निषेध आंदोलनांनंतर दिलेले आश्वासन पाळायला तयार नाही.

२.५९ राज्याच्या भागात लष्कर तैनात केलेले नाही तेथील लष्कराला विशेष अधिकार देणारा AFSPA हा कायदा, तशी व्यापक मागणी होऊनही, सरकार काही मागे घ्यायला तयार नाही. त्याप्रमाणेच राज्यातील विविध मते आणि मतांतरे असणाऱ्या गटांशी राजकीय चर्चा करायला सरकार भरीव पावले उचलायला तयार नाही. तीन मध्यस्थांची नेमणूक हा काही अशा चर्चेला पर्याय असू शकत नाही. तणाव कमी व्हावा, लोकांत विश्वास निर्माण व्हावा आणि राजकीय चर्चेला प्रोत्साहन मिळावे यासाठी माकप ने ठोस आणि व्यापक प्रस्ताव दिलोा होता. या प्रस्तावात राज्यातील लष्कराची संख्या कमी करावी; सीमा प्रदेश सोडून राज्याच्या इतर भागातून AFSPA मागे घ्यावा; आणि दडपशाही करणारी संरक्षण यंत्रणा रद्दबातल करावी या सूचनांचा समावेश होता. सुरक्षा रक्षकांनी केलेले अत्याचार आणि मानवी हक्कांचे उल्लंघन यांची चौकशी होऊन गुन्हेगारांना शासन झाले पाहिजे. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेपलिकडील जनतेशी थेट संबंध आणि त्यांची ये-जा व्हावी म्हणून पावले उचलली पाहिजेत. राजकीय स्तरावर लोकांच्या आकांक्षा प्रत्यक्षात येण्यासाठी राज्याच्या तीनही विभागांना जास्तीत जास्त स्वायत्तता दिली पाहिजे.

२.६० पक्षाच्या केंद्रीय समितीने नोव्हेंबर २०१० च्या बैठकीत स्वीकारलेल्या ठरावात समाविष्ट केलेले राजकीय उापय सरकारने करावेत म्हणून पक्षाने सतत पाठपुरावा केला पाहिजे. जम्मू आणि काश्मीरला दीर्घ काळ ग्रासणाऱ्या या प्रश्नांवर राजकीय उपाय केले पाहिजेत म्हणून देशातील लोकशाहीवादी आणि धर्मनिरपेक्ष शक्तींना संघटित केले पाहिजे.

## तेलंगण चळवळ आणि नवी राज्ये

२.६१ गेल्या दोन वर्षात स्वतंत्र तेलंगणासाठी चाललेल्या आंदोलनाने चांगलाच जोर पकडला आहे. तेलंगण राष्ट्रीय समिती, भाजप आणि इतरांनी केलेल्या मागणीला २००९च्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी तेलुगु देसम पक्षाने आणि निवडणूक झाल्यानंतर त्या विभागातील कॉंग्रेसने पाठिंबा दिला. स्वतंत्र राज्याला भारतीय कम्युनिस्ट पक्षाने देखील पाठिंबा दिला. भाषिक पायावर निर्माण करण्यात आलेल्या आंध्र प्रदेशची विभागणी करायच्या बाजूचे आपण नाही आहोत, अशी स्पष्ट आणि सातत्यपूर्ण भूमिका केवळ माकपनेच घेतली आहे. प्रदीर्घ अशा आंदोलनानंतर भाषिक राज्ये निर्माण झाली आहेत, त्यांची तोडफोड करून नवीन राज्ये निर्माण करायची गरज नाही, या पक्षाच्या धोरणाशी ही भूमिका सुसंगतच आहे.

२.६२ गृहमंत्र्यांनी नव्या राज्याची निर्मिती केल्याचे जाहीर केले; ती घोषणा केंद्र सरकारने लगेच फिरवली; त्यानंतर या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी श्रीकृष्ण समितीची नेमणूक केली. अशा रीतीने केंद्र सरकारने आगीत तेलच ओतले. समितीने आपला अहवाल सादर करून एक वर्ष होऊन गेले तरी केंद्राला अजून निर्णय घेता आलेला नाही. जितका विलंब लागेल तितकी जनतेत जास्त जास्त फूट पडत राहील. त्यामुळे आता बिलकुल विलंब न करता केंद्र सरकारने आपला निर्णय जाहीर केला पाहिजे.

२.६३ विदर्भ, गोरखालॅंड, बोडोलॅंड, कामतापुरी आदी स्वतंत्र राज्यांसाठी मागण्या केल्या जात आहेतच. शासनसत्तेचे लोकशाहीकरण करण्याचा एक भाग म्हणून भाषिक तत्त्वावर राज्यांची पुनर्रचना करण्यात आली. ती मोडायला माकपचा विरोध आहे याचा आम्ही पुनर्रुच्चार करतो. तत्त्व म्हणून छोटी राज्ये निर्माण करावीत हा युक्तिवाद कदापि स्वीकारता येणार नाही. आर्थिक दृष्ट्या जी राज्ये स्वत:च्या पायावर उभी राहू शकणार नाहीत अशी दुर्बल राज्ये केंद्रावर अवलंबून राहतील आणि संघराज्याची चौकट खिळखिळी होईल. एखाद्या राज्यात मागास विभाग असल्यास त्याच्या सामजिक-आर्थिक विकासासाठी काही खास उपाय केले पाहिजेत. गरज असेल तेथे प्रादेशिक स्वायत्तता देणे शक्य आहे.

## अस्मितेचे राजकारण

२.६४ जात, धर्म, जमात वा वंशाच्या अस्मितेच्या वाढत्या राजकारणाने देशातील डाव्या राजकारणासमोर मोठे आव्हान उभे केले आहे. सत्ताधारी वर्गांना आणि साम्राज्यवादी वित्त भांडवलाला असे राजकारण त्यांच्या हित संबंधांसाठी फारच उपयुक्त वाटते. अस्मितांच्या आधारावर जनतेच्या चिरफळ्या पडल्या आणि त्यांच्यातील फूट अस्मितेच्या राजकारणाने कायम ठेवली की शासनसंस्था आणि भांडवलाच्या सत्तेला कसलाच धोका निर्माण होत नाही.

२.६५ ज्या सामाजिक विभागांना सामाजिक दडपशाही, विषमता आणि शोषणाची शिकार व्हावे लागते त्यांच्यात अस्मितेच्या राजकारणाला सुपीक जमीन लाभते. जात, जमात वा लिंग यामच्या आधारे ज्यांचे शोषण होते असे स्तर अस्मितेच्या राजकारणासाठी संघटित करणे सोपर जाते. वर्गीय एकजूट नष्ट व्हावी, वर्गीय पायावरील चळवळींची ताकद कमी व्हावी, यासाठी स्वयंसेवी संस्था आणि कोत्या दृष्टीचे गट अस्मितेचे राजकारण जोपासण्यासाठी निधी पुरवतात.

२.६६ माकपने वर्गीय पायावर चळवळी उभारून, पण त्याच वेळी जातीचे प्रश्न, सामाजिक आणि लैंगिक अत्याचाराचे प्रश्न घेऊन, अस्मितेच्या राजकारणाला प्रत्युत्तर दिले पाहिजे.

## परराष्ट्रीय धोरण

२.६७ संपुआ सरकारने आपल्या आठ वर्षांच्या कार्यकालात अमेरिकेसोबत सामरिक आघाडी करण्याचे धोरण स्वीकारून भारताच्या स्वतंत्र परराष्ट्रीय धोरणापासून फारकत घेतली. जुलै २००५ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष आणि भारताचे पंतप्रधान यांनी जारी केलेल्या संयुक्त निवेदनानंतर ही आघाडी करण्याच्या दिशेने एक एक पाऊल उचलले जात आहे. १९व्या परिषदेनंतर ही आघाडी बळकट करण्यासाठी आणखी काही पावले उचलली आहेत.

२.६८ भारताने अमेरिकेच्या अटी मान्य करून अमेरिकेकडून शस्त्रास्त्रे विकत घेण्यासाठी एक करार केला. त्यानुसार अमेरिकेकडून ४०,००० कोटी रुपयांची शस्त्रास्त्रे विकत घेतली. अध्यक्ष ओबामा यांच्या ऑक्टोबर २०१० मधील भेटीत भारताची भाजारपेठ अमेरिकेच्या व्यापारी हितसंबंधासाठी खुली करणे आणि भारताला लष्करी दृष्ट्या अमेरिकेकडे खेचणे अशी दुहेरी उद्दिष्ट्ये साध्य करण्यात आली. ओबामांनी युनोच्या सुरक्षा समितीत भारताला कायमचे सदस्य म्हणून घ्यायला पाठिंबा दिला तो भारताने अमेरिकेला काही महत्वाच्या सामरिक मुद्द्यांवर सहाय्य करावे या अटीवर. भारताने अमेरिकेच्या अफगाणिस्तानातील सामरिक योजनेला पुरेपूर समर्थन दिले आहे. आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संघटनेत (IAEA) अणुप्रश्नी भारताने चार वेळा इराणच्या विरोधात मतदान केले. इराण-पाकिस्तान-भारत पाईप लाईन (IPI) गुंडाळून टाकल्यातच जमा आहे. त्याऐवजी भारताने अमेरिकेने प्रायोजित केलेली तुर्कमेनिस्तान-अफगाणिस्तान-पाकिस्तान-भारत (TAPI) स्वीकारली आहे.

२.६९ युनोच्या सुरक्षा समितीचा सदस्य या नात्याने भारत लिबियावरील ठरावावर अलिप्त राहिला, याचा अर्थ नाटो आणि पाश्चात्यांच्या लिबियावरील निर्लज्ज आक्रमणाला पाठिंबाच दिला. नाटोला अफगाणिस्तानात पाठिंबा दिल्याने आता नाटोच्या इतर देशांतील भूमिकेबाबत स्पष्ट विरोधाची भूमिका घेणे भारताला

अशक्य झाले आहे. भारत BRICS आणि भारत, चीन आणि रशिया यांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या त्रिपक्षीय सल्लागार समितीचा सदस्य असला तरी अमेरिका आणि इस्रायलसोबत सामरिक सहकार्य केल्याने भारताला स्वतंत्र परराष्ट्र धोरण अंगिकारून जगात बहुकेंद्रित व्यवस्था निर्माण करण्यात महत्वाची भूमिका घेणे अशक्य झाले आहे.

२.७०  चीनसोबतचे संबंध वाढवण्यासाठी आणि सुधारण्यासाठी टिकाऊ प्रयत्न झाले पाहिजेत. हे भारताच्या हिताचेच असून अमेरिका चीनला रोखण्यासाठी भारताला सामरिक आघाडीत बांधून घ्यायचा प्रयत्न करत आहे, हे ध्यानात घेऊन चीनसोबत सौहार्दाचे संबंध ठेवले पाहिजेत. चीन हा भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार बनला आहे. २०१०-११ मध्ये या दोन देशांचा व्यापार ६३,००० कोटी डॉलर्सचा झाला होता.

२.७१  २०११ मध्ये पाकिस्तानसोबत पुन्हा सुरू झालेली चर्चा ही एक सकारात्मक घटना आहे. पाकिस्तानने भारताला दिलेले "मोस्ट फेवर्ड नेशन" हे स्थान, जम्मू आणि काश्मीरमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेसंबंधी परस्पर विश्वास वाढवण्यासाठी सुरू केलेली चर्चा ही योग्य दिशेने उचललेली पावले आहेत. भारताने पाकिस्तानच्या भूमीवरून कार्यरत असणाऱ्या अतिरेक्यांच्या विरुद्ध ठोस उपाय करावेत म्हणून पाकिस्तान सरकारकडे आग्रह धरायला हवा.

२.७२  स्वतंत्र परराष्ट्र धोरण स्वीकारण्यासाठी आणि अमेरिकेसोबतची सामरिक आघाडी मोडण्यासाठी करावयाचा संघर्ष हा भारताने विकासाचे नवउदार मॉडेल सोडून पर्यायी विकासासाठी करायच्या संघर्षाशी अगदी थेटपणे जोडलेला आहे. परराष्ट्र धोरण आणि अमेरिकेसोबतची सामरिक आघाडी यांचा देशातल्या धोरणांवर आणि जनतेच्या जीवनावर थेट परिणाम होत असतो. मग ती परकीय थेट गुंतवणूक (FDI) असो, नाही तर मुक्त व्यापाराचे करार. कारण ही धोरणे शेतकरी आणि छोटा व्यवसायिक यांना अत्यंत घातक असतात. हे करार होऊ लागलेत त्याचे कारण म्हणजे भारत-अमेरिका सामरिक आघाडी. ऊर्जेचे दर वाढवणारे आणि पर्यावरणाला अत्यंत हानिकारक आणि खूप महाग अशा अणुभट्ट्या आपण आयात करणार आहोत. याला कारणही अणुकरारात मान्य केलेल्या अटीच होत. गॅस पाईपलाईनमधून आपल्याला स्वस्त ऊर्जा मिळू शकलो. पण आपण त्यालाही वंचित झालो आहोत, त्यालाही आपले अमेरिकाधार्जिणे परराष्ट्र धोरणच कारणीभूत आहे. या सामरिक करारामुळेच आपल्याला अमेरिकेकडून अत्यंत महाग शस्त्रास्त्रे आयात करावी लागतात. त्यामुळे दुर्मीळ अशा संसाधनांचा जनतेला मूलभूत सेवा देण्यासाठी आणि तिचा विकास करण्यासाठी आपल्याला वापर करता येत नाही.

२.७३  आपल्या देशाने स्वतंत्र परराष्ट्र धोरण अवलंबावे यासाठी माकप अत्यंत निर्धारपूर्वक आणि सुनियोजित रीतीने लोकांमध्ये मोहीम करत राहील. देशाच्या

विकासासाठी त्यातूनच नवी वाट मिळेल असा माकपला विश्वास वाटतो.

**अणुकराराची फलश्रुती/फलनिष्पत्ती / अणुकराराचे विषारी फळ**

२.७४ भारत-अमेरिकेदरम्यान करण्यात आलेल्या अणुकराराचे परिणाम आता दिसू लागले आहेत. मनमोहन सिंग सरकारने केलेल्या दाव्यांचे पितळ उघडे पडून हा करार अन्याय्य आहे आणि भारताचे परराष्ट्र धोरण अमेरिकेच्या जोखडात अडकेल, असे माकप सांगत आला होता, ते खरे ठरू लागले आहे. सर्वात प्रथम, या अणुकरारामुळे अमेरिकेचे संपूर्ण नागरी अणु-सहकार्य मिळेल आणि भारताला अत्यंत संवेदनाशील अणु तंत्रज्ञान उपलब्ध होईल, हा दावा पोकळ आणि जनतेची दिशाभूल करणारा ठरला आहे. जून २०११ मध्ये अणु पुरवठा गटाने, अमेरिकेच्या इशाराबरहुकूम, अणुप्रसारबंदी करारावर (NPT) सही न करणाऱ्या भारतासारख्या देशांना पुनर्प्रक्रिया आणि सधनीकरण (enrichment) तंत्रज्ञान देण्याला मनाई करणारी नवी मार्गदर्शक सूत्रे जारी केली. त्यामुळे भारताला आता अत्याधुनिक तंत्रज्ञान मिळण्याची आशा सोडून देऊन परदेशातून अत्यंत महागड्या अणुभट्टया आणि अणु इंधन खरेदी करावे लागणार. अमेरिकेने भारताशी अणु करार करायची जणु मेहरबानी केल्यामुळे भारताने अमेरिकेकडून १०,००० मेगॅवॉटच्या अणुभट्टया खरेदी करायचे मान्य केले होते. त्याच बरोबर परदेशी पुरवठादारांना सर्व जोखमीतून मुक्त करणारा कायदा करू असे वचनही दिले होते. यासाठीच सरकारने संसदेत परकीय पुरवठादारांना जबाबदारीतून सूट देणारे विधेयक आणले. पण संसदेने ते विधेयक न स्वीकारता त्यात परदेशी पुरवठादारांवर जबाबदारी निश्चित करून नुकसानभरपाई देण्याविषयीचे कलम त्यात अंतर्भूत केले. आता कायद्यांतर्गत नियम बनवताना परदेशी पुरवठादारांवरील जबाबदारी पातळ करायचे प्रयत्न चालू आहेत.

२.७५ अणु-अपघात झाल्यास त्याला जबाबदार असलेल्या अमेरिकन कंपन्यांना अभय देऊन अमेरिकेला खूश करण्याचा संपुआ सरकार प्रयत्न करत आहे, आणि ही गोष्ट भारतीय नागरिकांच्या जीवित आणि सुरक्षा अधिकारावर गदा आणणारी आहे. जगातल्या सर्वात मोठ्या अणु-अपघातात मोडणाऱ्या जपानमधील फुकुशिमा अपघातानंतरही संपुआ सरकार अमेरिका आणि फ्रान्ससारख्या इतर अणु पुरवठादारांपुढे गुडघे टेकायला अत्यंत उत्सुक आहे. आपली ऊर्जेची गरज भागवण्यासाठी २०२० सालापर्यंत ४०,००० मेगॅवॉट क्षमतेच्या अणुभट्टया आयात कराव्या लागतील, असा अत्यंत संशयास्पद प्रस्ताव संपुआ सरकारने पुढे दामटला आहे. त्यासाठी अरेवा या फ्रेंच कंपनीच्या अत्यंत महागड्या अणुभट्ट्या विकत घ्यायचा करार केला आहे. त्यात वापरलेल्या तंत्रज्ञानाची कुठेही कसलीही परीक्षा घेण्यात आलेली नाही की जगात कुठेही ते वापरण्यात आलेले नाही. या अणुभट्टया महाराष्ट्रातील जैतापूर येथे बसवण्यात येत आहेत. या अणुप्रकल्पाच्या विरोधात तेथील स्थानिक जनता सातत्यपूर्ण संघर्ष करत आहे.

२.७६ माकपने जैतापूर आणि इतर ठिकाणी बसवण्यासाठी अणुभट्ट्या आयात करायचे ताबडतोब थांबवावे, अशी मागणी केली आहे. एका स्वतंत्र यंत्रणेने भारतात अस्तित्वात असलेल्या अणुभट्ट्यांच्या सुरक्षिततेची सर्वांगिण तपासणी केली पाहिजे. एक स्वतंत्र आणि स्वायत्त अणुसुरक्षा नियंत्रण प्राधिकरण स्थापन केले पाहिजे. पण सरकारने आणलेल्या प्रस्तावानुसार असे प्राधिकरण स्थापले तर ते सरकारची पूर्ण ताबेदारी असेलेले अंकित प्राधिकरण असेल.

## बडे भांडवल, पैशाची सत्ता आणि राजकारण

२.७७ नव-उदारवादाचा राजकारण आणि राजकीय व्यवस्थेवर अत्यंत थेट असा परिणाम झाला आहे. बडे भांडवल आणि राजकारण यांची सांगड खूप पक्की झाली आहे. एकामागोमाग आलेल्या सरकारांनी लोकांचा बळी देऊन उघडपणे बड्या आणि परकीय भांडवलाचे हित साधून देणारी धोरणे राबवली आहेत. निवडणुकीत होणारा पैशाचा अभूतपूर्व वापर हा या सांगडीचा थेट परिणाम आहे. पैशाच्या अतोनात सत्तेने सर्व व्यवस्थाच नासत आहे. भांडवली पक्ष आपल्या उमेदवारांची निवड त्यांच्या पैशाच्या ताकदीच्या आधारावर करत आहेत. पैशाची सत्ता आता झिरपत पंचायत निवडणुकांपर्यंत पोचू लागली आहे. कित्येक राज्यात मतदारांना पैसे वाटणे हा नियमच बनला आहे. यापासून लोकशाही व्यवस्थेला गंभीर धोका पोचू शकतो. राजकारण आणि निवडणुकात होणाऱ्या पैशाच्या वाढत्या प्रादुर्भावाविरुद्ध पक्षाने फार व्यापक मोहीम हाती घ्यायला हवी. त्याने सार्वजनिक हिताच्या धोरणाला नख लावत असलेल्या बड्या भांडवलाचे, आणि असे मार्ग बिनदिक्कतपणे वापरणाऱ्या भांडवली पक्षांचे वस्त्रहरण केले पाहिजे.

२.७८ पैशाच्या सत्तेचा वाढता वापर आणि नव-उदार दृष्टिकोन यांची संसदीय लोकशाहीला कसर लागत आहे. पैसा, गुन्हेगारी आणि विविध स्तरांवरील माफियांचा प्रभाव यामुळे लोकशाहीचा ऱ्हास घडवून आणला जात आहे. नव-उदार नीतीच्या अंमलाखाली चाललेल्या राजकारणामुळे लोकशाही हक्कांवर वाढती संक्रांत येत आहे. निदर्शने करणे, सार्वजनिक सभा घेणे आणि सार्वत्रिक संप करणे हे हक्क प्रशासकीय हुकूम आणि न्यायालयीन आदेशांचा वापर करून पायदळी तुडवले जात आहेत. कष्टकरी जनता करत असलेल्या निषेध आंदोलनांविरुद्ध कृत्रिम सहमती उत्पन्न करायसाठी कार्पोरेट प्रसार माध्यमांचा सर्रास वापर केला जात आहे.

## निवडणूक सुधारणा

२.७९ लोकशाही व्यवस्थेचे संरक्षण करण्यासाठी आणि राजकीय भ्रष्टाचारावर प्रभावी अंकुश ठेवण्यासाठी निवडणूक सुधारणा आवश्यक आहेत. बेकायदेशीर पैश्याचा आणि एकूणच पैश्याच्या सत्तेचा निवडणुकीतील वापर रोखण्यासाठी निवडणुकीच्या नियमांत कडक तरतूद करायला हवी. निवडणुकीचे प्रचार साहित्य

आणि इतर सुविधा पुरवण्यासाठी शासकीय निधीची तरतूद करायला हवी. प्रसार माध्यमामतून प्रचार करण्यासाठी सर्वांना समान संधी असली पाहिजे. पैसे घेऊन बातम्या देण्यावर, "पेड न्यूज" वर, बंदी आणून तो निवडणूक कायद्यानुसार गुन्हा ठरवण्यासाठी कायद्यात दुरूस्ती केली पाहिजे. पैसा आणि शारीरिक बळाचा वापर, किमान काही प्रमाणात कमी करण्यासाठी, अंशत: यादीच्या तत्वावर प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची तरतूद करण्यासाठी निवडणुकीच्या व्यवस्थेत मूलभूत सुधारणा करायला हवी. माकप आणि डाव्या शक्तींनी निवडणूक सुधारणा राजकीय विषयपत्रिकेवरील प्रमुख मुद्दा बनवला पाहिजे.

## केंद्र – राज्य संबंध

२.८० केंद्राच्या हातात सत्ता केंद्रीत करून राज्यांच्या अधिकारांवर अतिक्रमण करण्याची प्रवृत्ती अखंडपणे चालूच आहे. केंद्रामध्ये आघाडीची सरकारे येत असल्याने आणि सत्ताधारी आघाडीकडे कित्येकदा संसदेच्या दोन्ही सभागृहात बहुमत नसल्याने राज्य शासनाच्या विरोधात कलम ३५६ वापरून राजकीय हस्तक्षेप करण्याचे प्रमाण कमी झाले असले तरी वित्तीय आणि वैधानिक क्षेत्रात राज्यांच्या हक्कांवर हल्ले केले जातच आहेत. संसाधने आणि निधी देण्यासाठी नव-उदार सुधारणा करण्याची अट घातली जात आहे. यासाठी केंद्राने प्रायोजित केलेल्या योजनांचा वापर केला जात आहे. १३व्या वित्त आयोगाने आधीच्याच आयोगांची री ओढत अटी आणखीच जाचक केल्या आहेत. केंद्र जमा झालेल्या करातील ५० टक्के हिस्सा राज्यांना द्यायला सपशेल नकार देते. शिक्षण, सहकारी संस्था आणि अगदी प्रस्तावित अन्नसुरक्षा कायद्याच्या बाबतीतदेखील संपुआ-२ सरकार राज्यांच्या सत्तेवर गदा आणणारे कायदे करायचे प्रयत्न पुढे दामटत आहे. राज्यांचे केंद्रावरील अवलंबित्व वाढत असले तरी दुसऱ्या बाजूला केंद्राच्या अरेरावीविरुद्धचा असंतोषदेखील वाढत आहे. माकप सातत्याने केंद्र-राज्य संबंधांची पुनर्रचना करण्याच्या बाजूने राहिलेला आहे. राज्यांच्या अधिकाराचे संरक्षण आणि केंद्र-राज्य संबंधाची पुनर्रचना करण्याच्या प्रयत्नात पक्ष सदैव आघाडीवर असला पाहिजे.

## स्त्रियांचे स्थान

२.८१ स्त्रियांच्या प्रश्नांच्या बाबतीत संपुआ सरकार अत्यंत ढोंगी व्यवहार करताना दिसते. उदाहरणादाखल स्त्रियांसाठी राखीव जागाचे विधेयक घेता येईल. हे विधेयक राज्यसभेत मंजूर होऊन जवळ जवळ दोन वर्षे लोटली तरी संपुआ सरकार अजून ते लोकसभेत मांडायला तयार नाही. अनेक राज्यांनी पुढाकार घेतल्यानंतर पंचायती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांसाठी ५० टक्के जागा राखीव करणारा कायदा केंद्र सरकारने केला. संसदेत स्त्रियांना प्रतिनिधित्व देण्याच्या बाबतीत भारत आपल्या बहुतेक सर्व शेजारी देशांच्या, अगदी पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्याही, मागे आहे. श्रमातील सहभाग, शिक्षण, आरोग्य आणि

आयुर्मान, आणि राजकीय सबलीकरण या चार निकषांवर लिंगभेदाचा जागतिक लिंगविषयक निर्देशांक (Global Gender Index) ठरवला जातो. २००६ मध्ये १३५ देशांमध्ये ९८व्या स्थानावर होता. तो २०११मध्ये ११३व्या स्थानावर फेकला गेला आहे. भारताच्या २०११च्या जनगणनेत एक भयकारक वास्तव समोर आले आहे. स्त्रीभ्रूण हत्त्येसाठी लिंगनिवड पद्धतीचा होणारा सर्रास वापर हे ते सत्त्य होय. २०११ मध्ये लहान मुलांतील स्त्री-पुरूषांचे प्रमाण १००० मुलांमागे ९१४ मुली असे झाले होते. हे प्रमाण स्वातंत्र्यानंतरचे सर्वात कमी तर आहेच, पण गेल्या दहा वर्षांत त्यात एकदम १३ टक्क्यांची घट झालेली आहे. या काळात सरकारने घेतलेल्या धोरणांपायी दरवाढ, अनियमित रोजगार, त्यामुळे उत्पन्नात येणारी अनिश्चितता, तसेच वाढता हिंसाचार या साऱ्यांचा स्त्रियांच्या जीवनावर फारच विपरीत परिणाम झाला होऊन स्त्रियांचे समाजातील स्थान घसरले आहे. नव-उदार धोरणात सामाजिक अनुदाने कमी करण्यावर भर दिला जातो. त्यामुळे स्त्रियांच्या घरकामाच्या ओझ्यात आणखी वाढ झाली आहे, तसेच शुश्रूषेची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावरच येऊन पदली आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या चढत्या दरांमुळे कुपोषित मुली आणि स्त्रियांची संख्या वाढतच आहे. ५ वर्षांखालील ४२ टक्के मुले कुपोषणाने ग्रासलेली आहेत.

२.८२ राष्ट्रीय स्तरावर म. गांधी रोजगार हमी योजनेत (नरेगा) एकूण कामगारांपैकी ५१ टक्के महिला असल्याचा दावा संपुआ सरकार करते. या योजनेतील काम अत्यंत कष्टदायी असते. तरीही स्त्रिया या योजनेत कामाला येतात. त्यांना इतरत्र कुठेच काम मिळत नाही म्हणून इतके जिकीरीचे आणि कष्टाचे काम करायची आपत्ती त्यांच्यावर येते, हे वास्तव आहे. सरकारनेच दिलेल्या आकडेवारीवरून हे स्पष्ट होते. नरेगात काम करणाऱ्या महिलांना किमान वेतनाहून कमी पगार, कित्येकदा २५ ते ३० टक्के कमी पगार मिळतो. या काळात महिला श्रमशक्तीचे मोठ्या प्रमाणावर कंत्राटीकरण आणि रोजंदारीकरण झाले आहे. महिला मोठ्या संख्येने स्वत:च्या घरीच पीसरेटवर तेही अत्यंत तुटपुंज्या दरात काम करू लागल्या आहेत. त्यांना कामगार कायद्याचे वा सामाजिक सुरक्षेचे कसलेच संरक्षण नाही. सरकार स्वत:च महिलांचा सर्वात मोठा शोषक असल्याचे अंगणवाडी सेविका किंवा ग्रामीण आरोग्य अभियानातील आशा सेविका नाही तर शाळेत दुपारचे जेवण पुरवणाऱ्या महिलांच्या परिस्थितीवरून दिसून येते. सरकारच्या अशा प्रकल्पांमध्ये काम करणाऱ्या महिलांची संख्या ५० लाखांहून अधिक आहे. सरकार निर्लज्जपणे त्यांना कसलेही वेतन न देता अत्यंत क्षुल्लक "मानधनावर" राबवते. यातून शासन महिलांच्या कामाकडे "पुरूषी" (पितृसत्ताक) दृष्टिकोनातूनच पहाते, हे स्पष्ट होते. शहरांत घरकाम करणाऱ्यांची संख्या मोठी असून त्यात स्त्रियांचे प्रमाण खूपच आहे. काही राज्यांत त्यांनी लढा करून काही हक्क मिळवले असले तरी राष्ट्रीय स्तरावर त्यांना अजून कामगार मानले जात नाही.

२.८३ बँकिंग क्षेत्राचे खासगीकरण आणि प्राथमिक क्षेत्रातील पतपुरवठ्यात

झालेली घट यांनी ३ कोटीहून अधिक महिलांनी चालवलेल्या SHG मधून केलेल्या कमाईवर बोळा फिरवला आहे. महिलांच्या या SHG ना बॅंका कर्ज देत आणि हे गट बॅंकांशी जोडलेले असत. त्यांची जागा कसल्याही प्रकारचे नियंत्रण नसलेल्या आणि चढ्या दराने व्याज आकारणाऱ्या "लघु वित्त संस्था" (Micro Finance Institutions) घेत आहेत. याचा महिलांच्या या गटांवर मोठा दुष्परिणाम झाला आहे. या लघु वित्त संस्था नव-उदार युगातल्या सावकारच बनल्या असून त्यांनी हजारो महिलांवर आत्महत्त्या करायची पाळी आणली आहे, आणि केंद्र सरकारच्या आधारने चालणाऱ्या या लघु वित्त संस्था (MFI) आपल्या अनियंत्रित आणि बेबंद कारभाराने हजारो कुटुंबांची अक्षरश: धूळदाण करत आहेत. अनुसूचित जाती आणि जमातीतील स्त्रियांना याची विशेष झळ लागली आहे.

**२.८४ स्त्रीचे लैंगिक वस्तू म्हणून ओंगळ प्रदर्शन मांडणारा नव-उदारवाद स्त्रीची मानहानी करणारी आणि तिला दडपणारी अगदीच हीन संस्कृती प्रसृत करत आहे. सायबर गुन्ह्यासारखे शोषणाचे आणि तिला ब्लॅकमेल करायचे नवनवे मार्ग वापरले जात आहेत. त्यांचा भीतीदायक प्रसार होत आहे. याला आळा घालायला अस्तित्वात असलेली कायद्याची चौकट फारच अपुरी आहे. एकूणच स्त्रियांवरील अत्याचारात वाढ झाली आहे. त्यात लहान मुलांवरील अत्याचार, दलित आणि आदिवासी महिलांवरील अत्याचार आणि जोडप्यांच्या तथाकथित "सन्मानहत्त्या" यांचे प्रमाण वाढत आहे. लैंगिक हल्ला, कामाच्या ठिकाणचे लैंगिक अत्याचार आणि लहान मुलांवरील अत्याचार आणि त्यांचा दुरूपयोग रोखणारी विधेयके गेली कित्येक वर्षे पडून आहेत. सरकार ती संसदेत आणत नाही, हे अत्यंत धक्कादायक आहे. केंद्र सरकारने आश्वासन देऊनही "सन्मानहत्त्या" बंद करण्यासाठी कायदा केला जात नाही. काही राज्य सरकारांपुढे, विशेषत: प्रचंड संख्येने असे गुन्हे घडत असलेल्या हरियाना सरकारपुढे, केंद्र सरकारने गुडघे टेकले आहेत.**

**२.८५ या काळात अनेक प्रश्नांवर स्त्रियांचै संघर्ष आणि आंदोलने झाली आहेत. लोकशाही लढ्यातील स्त्रियांचा सहभागदेखील वाढला आहे. काम करणाऱ्या स्त्रियांना चांगले वतन मिळावे आणि त्यांची कामाची परिस्थिती सुधारावी यासाठी होणाऱ्या लढ्यांचे नेतृत्व करत असतानाच स्त्रियांना भेडासवणाऱ्या सामाजिक प्रश्नांत पक्षाने जास्त सामर्थ्याने आणि सातत्याने हस्तक्षेप केला पाहिजे.**

### मुस्लिम अल्पसंख्याकांचे प्रश्न

२.८६ सच्चर समितीने मुस्लिम समाजाच्या आर्थिक सामाजिक स्थितीचा सर्वांगीण अभ्यास करून सरकारला काही शिफारसी केल्या होत्या. पण त्या शिफारसींचा पाठपुरावा करून त्यांची अंमलबजावणी करण्यात सरकारला अपयश आल्याने मुस्लिम समाज नाराज झाला आहे. ज्या विभागात मुस्लिम लोकसंख्या लक्षणीय आहे अशा विभागांच्या विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा म्हणून

अनुसूचित जमातींसाठी असलेल्या उपयोजनेच्या धर्तीवर मुस्लिम अल्पसंख्याकांसाठी देखील उपयोजना असावी, अशी माकपने केलेली मागणी संपुआ सरकारने धुडकावून लावली आहे.

२.८७ न्यायमूर्ती रंगनाथ मिश्रा यांच्या अध्यक्षतेखालील धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याक विषयीच्या राष्ट्रीय आयोगाने सादर केलेला अहवाल बराच कालावधी उलटून गेल्यावर संसदेत सादर करण्यात आला. सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले' म्हणून केंद्र आणि राज्य सरकारांत सर्व स्तरांवर मुस्लिम अल्पसंख्याकांना १० टक्के आणि इतर अल्पसंख्याकांना ५ टक्के जागा राखीव करण्याची शिफारस आयोगाने केली आहे. देशातील सर्व राज्यांपैकी केवळ प. बंगालच्या डाव्या आघाडी सरकारने मुस्लिमांतील ओबीसींसाठी १० टक्के जागा राखीव ठेवल्या.

२.८८ या शिफारसींकडे संपुआ सरकारने दुर्लक्ष केले आहे. त्याऐवजी, त्याने ओबीसीसाठी असलेल्या २७ टक्क्यांतून सर्व अल्पसंख्याकांसाठी ४.५ टक्के जागा राखीव केल्याचे जाहीर केले आहे. हे आधीच अस्तित्वात असलेल्या ओबीसी मुस्लिमांच्या राखीव जागांवरच गदा आणणारे पाऊल आहे. ही किरकोळ सवलत म्हणजे मुस्लिमांतील मोठ्या संख्येने वंचित असलेल्या समाज विभागांची क्रूर थट्टाच होय.

२.८९ रंगनाथ मिश्रा आयोगाने केलेल्या 'क्रीमी लेयर" वगळून मुस्लिमांना १० टक्के राखीव जागा देण्याच्या शिफारसीचे माकप समर्थन करतो.अनुसूचित जातींना मिळत असलेल्या राखीव जागांच्या सवलती मुस्लिम आणि ख्रिश्चनांतील तशाच प्रकारच्या मागास विभागांना मिळाल्या पाहिजेत. मात्र, ह्या शिफारसींची अंमलबजावणी करताना मागास वर्ग आणि आणि अनुसूचित जातींना मिळणाऱ्या सवलतींना बिलकुल हात लावता कामा नये. त्यासाठी ओपन कोट्यातूनच तरतूद केली पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्क्यांची मर्यादा घातल्याने योग्य ती घटना दुरूस्ती केली पाहिजे.

२.९० जेव्हा जेव्हा दहशतवादी घटना घडतात, तेव्हा तेव्हा बेलगाम अटकसत्र, छळ आणि मानवी हक्कांचे उल्लंघन याबाबतीत शासन मुस्लिम समाजाला लक्ष्य करते. अशा घटनांनंतर मुस्लिम तरूणांना ताब्यात घेतले जाते; त्यांचा छळ केला जातो आणि शेवटी त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केले जातात. हैद्राबादच्या मक्का मशिदीत आणि मालेगावला झालेल्या बॉम्बस्फोटानंतर पकडण्यात आलेल्या मुस्लिम तरूणांना कित्येक वर्षे तुरूंगात ठेवण्यात आल्यानंतर या हल्ल्यांमागे हिंदुत्ववादी संघटना आहेत हे उघड झाल्यावर सोडून देण्यात आले. निरनिराळ्या प्रसंगी उत्तर प्रदेशातील आझमगड जिल्ह्यातील कित्येक मुस्लिम तरूणांना ताब्यात घेऊन कोणताही सबळ पुरावा नसताना गुन्ह्यात गोवले होते. पोलीस आणि तपास यंत्रणांकडून होत असलेला हा पूर्वग्रहदूषित व्यवहार आणि ते देत असलेली वागणूक

हा ढळढळीत अन्याय आहे, आणि मुस्लिम समाजाला जमातवादी रंग फासटायच्या उद्योगाला त्यामुळे बळच मिळते. असा पुर्वग्रहदूषित व्यवहार आणि मानवी हक्कांचे उल्लंघन त्वरीत थांबलेच पाहिजेत अशी मागणी माकप करीत आहे.

**आदिवासींच्या हक्कांवरील हल्ले**

२.९१ या काळात सरकारने खाण उद्योगातील कार्पोरेट कंपन्यांसाठी, तसेच ऊर्जा आणि संचन प्रकल्पांसाठी, आदिवासीमची जमीन ताब्यात घेतल्याने आदिवासी आपल्या जमिनींवरून बेदखल आणि विस्थापित झाले आहेत.भारतातील आदिवासी समाजांना भेडसावणारा हा अत्यंत ज्वलंत प्रश्न आहे. केंद्र सरकारने आंध्र प्रदेश, झारखंड, ओरिसा आदी राज्यांतील या जमिनी ताब्यात घ्यायला परवानगी दिलेली आहे, एवढेच नव्हे तर त्याला प्रोत्साहनही दिले आहे. आदिवासींच्या जमिनींचे संरक्षण व्हावे, यासाठी केलेल्या PESA कायद्यातील ग्रामसभांच्या आगाऊ परवानगीच्या अधिकाराचे धडधडीत उल्लंघन होत असते. त्याचबरोबर, ऐतिहासिक अशा जंगल हक्क कायदा उधळून लावायचा प्रयत्न होत आहे. आदिवासींना जमिनीवर वैयक्तिक आणि सामुदायिक हक्क देणे हा खनिजांनी समृद्ध असलेल्या आदिवासी पट्ट्यांत कार्पोरेटना प्रवेश करायला मोठा अडसर आहे, असे मानले जात आहे. आदिवासींनी हक्कासाठी केलेल्या अर्जापैकी ५० टक्क्यांहून अधिक अर्ज सरकारने फेटाळून लावले आहेत. विशेषत: आदिवासींचे दावे फेटाळून लावण्यासाठी नवनव्या कायदाबाह्य अटी आणि नियम लादले जात आहेत. आपण आदिवासी आहोत हे सिद्ध करण्यासाठी अशक्य अशी ७५ वर्षे जंगलात रहिवासाची अट घातली आहे. त्यामुळे परंपरेने जंगलात रहाणाऱ्या बिगरआदिवासी गरीब आणि वंचितांवर अन्याय होत आहे. परिणामी या विभागांना सामुदायिक पातळीवर हक्क नाकारण्यात आले आहेत. हे कलम वगळून सर्वोच्च न्यायालयाने या विभागामसाठी ठरवून दिलेली १९८० ही तारीख पाळण्यासाठी या कायद्यात योग्य ती दुरूस्ती त्वरीत करून या वंचित समाजविभागांना न्याय मिळवून दिला पाहिजे.

२.९२ आदिवासींची जमीन संपादन करायची झाल्यास त्यांची पूर्वपरवानगी आवश्यक असे. ती प्रस्तावित भूमी अधिग्रहण आणि पुनर्वसन कायद्यातून सार्वजनिक हेतूच्या नावाखाली पूर्णत: काढून टाकण्यात आली आहे. यामुळे आदिवासींची जमीन काढून घेण्याचा प्रश्न फारच गंभीर झाला आहे. आदिवासींच्या जमिनीचे संरक्षण करण्याचा प्रश्न अत्यंत कळीचा बनल्याने पक्षाला तो सातत्यपूर्ण रीतीने हाती घ्यावा लागेल. त्याचसोबत, आदिवासींचा खनिज संपत्तीवरील मालकीत हिस्सा असण्याचा मुद्दाही महत्त्वाचा आहे. आदिवासी भागाच्या विकासासाठी खाणकंपनीकडून रॉयल्टीच्या २६ टक्के रक्कम घेण्याचा केंद्र शासनाचा प्रस्ताव आहे. ही रक्कम अगदीच किरकोळ असून अजिबात मान्य नाही. खरे तर, समता खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने खनिज संपत्तीवर आदिवासींचा हक्क असल्याचा दिलेला निवाडा हा या बाबतीत धोरण ठरवताना पायाभूत मानायला हवा. त्यानुसार आदिवासींची मान्यता

आणि त्यांचा सहभाग हे या धोरणाचे महत्त्वाचे अंग असायला हवे.

२.९३ सर्व आदिवासींच्या, आणि विशेषत: आदिवासी विद्यार्थ्यांच्या, आरोग्य आणि शिक्षणविषयक गरजा पुऱ्या करण्याकडे गुन्हेगारी स्वरूपाचे दुर्लक्ष झाले आहे. आदिवासींच्यातील बेरोजगाराचा गंभीर प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने आदिवासी प्रदेशातील युवकांसाठी प्रशिक्षण संस्था काढण्यात केंद्र सरकारला दारूण अपयश आले आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या नोकऱ्यात अनुसूचित जमातींच्या जागा भरण्यात मोठा बॅकलॉग राहिला आहे. या समस्या आपण पूर्वी अधोरेखीत केल्या होत्या. त्यात गेल्या तीन वर्षांत काहीही सुधारणा झालेली नाही. उलट, आदिवासींसाठी अंदाजपत्रकात किमान ८.२ टक्के थेट तरतूद असावी हे सरकारला बंधनकारक असले तरी केंद्र सरकार सातत्याने त्याचे उल्लंघन करत आले आहे.

२.९४ अनेक आदिवासी विभागात आदिवासी एका बाजूने माओवाद्यांचे हल्ले आणि दुसऱ्या बाजूने सुरक्षा दलांचे अत्याचार अशा कात्रीत सापडले आहेत. माओवाद्यांच्या गरीबांकडून खंडणी वसूल करणे आणि त्यांना लुटणे या कृत्याच्या विरोधात आदिवासींना संघटीत करत असतानाच शासनाच्या दडपशाहीच्या विरोधात पक्षाने उभे राहिलेच पाहिजे. जमीन आणि जंगलावरील आदिवासींच्या अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांना विकासातील न्याय्य वाटा मिळण्यासाठी पक्ष आदिवासींना संघटीत करून त्यांच्या लढ्याच्या अग्रभागी राहील.

**दलितांचे प्रश्न**

**२.९५ भार**तात एकूण लोकसंख्येच्या १६.२ टक्के असलेल्या अनुसूचीत जातीतील लोकांची संख्या १६,६६,३५,७०० इतकी आहे. जातीय दडपशाही हा त्यांच्या मानवी हक्कावरील सर्वात मोठा हल्ला आहे. भूमीहीनता; पाणी पुरवठा, सार्वजनिक रस्ते आणि इतर सुविधांपासून ते वंचित आहेत. भंगीकामावर कायद्याने बंदी असूनही १० लाखाहून अधिक दलितांना ते काम करणे भाग पाडले जाते. अनुसूचित जाती कायद्यानुसार दरवर्षी सरासरी ३०,००० गुन्हे नोंदवले जातात यावरूनच दलितांवरील अत्याचारात किती वाढ झाली आहे, हे स्पष्ट दिसून येते. भांडवली-सरंजामी व्यवस्था औपचारिक घटनात्मक आणि कायदेशीर अधिकार देते, पण ते अर्थपूर्ण रीतीने अंमलात आणण्याची कसलीच तजवीज करत नाही.

२.९६ खासगीकरण आणि सरकारी नोकऱ्यावरील बंदीमुळे दलितांना रोजगार मिळण्याच्या संधी कमी झाल्या आहेत. अनुसूचित जातींसाठी असलेल्या शेड्यूल्ड कास्ट कॉम्पोनंट प्लॅन (SCSP) मधील विशेष निधी इतरत्र वळवून त्याचा दुरूपयोग केला जात आहे. SCSP साठी पुरेसा निधी दिला जावा, दिलेला निधी इतरत्र वळवता येणार नाही आणि तो मुदतीत वापरला न गेल्यास रद्द होणार नाही अशी तरतूद करणाराकेंद्रीय कायदा करणे आवश्यक आहे. संपूर्ण कोटा वापरण्यातील त्रुटी दूर

केल्या जात नाहीत. खासगी क्षेत्रातही राखीव जागा ठेवण्यासाठी करण्यात आलेली न्याय्य मागणीदेखील केंद्र सरकारने अमान्य केली आहे.

२.९७ अस्पृश्यता आणि दलितांवरील जातीय अत्याचाराविरोधात पक्षाने जोरदार संघर्ष केला पाहिजे. अलिकडील काळात तामीळनाडुतील पक्षाने आणि पुरोगामी शक्तींनी सुरू केलेल्या अस्पृश्ताविरोधी चळवळीने सक्षणीय प्रगती केली आहे. इतर राज्यांतदेखील अशी चळवळ सुरू करायला हवी.

## अपंगांचे अधिकार

२.९८ विविध प्रकारचे अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींना समाजात अत्यंत विषम वागणूक मिळते. अपंगत्व हा जणू कलंक आहे, असे मानले जाते. त्यांना मानवी हक्क नाकारले जातातच, पण त्यांना छळही सोसावा लागतो. अपंगांची नीट मोजदाद न केल्याने त्यांची खरी संख्या झाकली जाते, आणि त्यामुळे त्यांच्यासाठी योग्य निधीची तरतूद होत नाही. अपंगांमध्ये गरीबांची संख्या मोठी असल्याने त्यांचा दुहेरी तोटा होतो. सध्या अस्तित्वात असलेली कायद्याची चौकट अत्यंत अपुरी असून कायदा आणि धोरण या दोन्हीमध्ये अपंगांच्या मूलभूत हक्कांची जाणीव ठेवून बदल करायला हवेत. अपंगांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात, त्यांना शिक्षण आणि रोजगार देऊन जगण्याची साधने पुरवण्यात आलेले अपयश; त्यांच्यासाठी आरोग्य सुविधांचा कमालीचा अभाव; आणि एकूणच त्यांना सन्मानाने समाजात एकरूप करून घेण्यात आलेले अपयश – या सर्व समस्यांचे तातडीने निवारण केले पाहिजे. युनोचा अपंग व्यक्तींविषयीचा करार (United Nations Convention on Persons with Disabilities) अंमलात आल्याने तर आपले अस्तित्वातील कायदे तातडीने या कराराशी जुळवून घ्यायला हवेत. अपंगांना दया नको आहे, तर एक नागरीक म्हणून त्यांना इतर नागरिकांप्रमाणेच समान हक्क आहेत हे ओळखण्यावर त्यांचा विकास आणि त्यांचे कल्याण अवलंबून आहे.

## शिक्षण

२.९९ २०१० च्या मानव विकास निर्देशांकानुसार १६९ देशांत भारताचा क्रमांक ११९ वा असावा हे अत्यंत लांच्छनास्पद आहे. २०११च्या जनगणनेनुसार एकूण भारतीयांपैकी २६ टक्के अजून निरक्षर आहेत. त्यापैकी महिला ३५ टक्के आहेत. २०१०च्या आकडेवारीनुसार भारतीयांचे सरासरी शालेय शिक्षण फक्त ४.४ वर्षे होते. जागतिक सरासरी मात्र ७.४ वर्षे इतकी आहे. उच्च शिक्षणात प्रवेश घेणाऱ्यांचे जगात प्रमाण सरासरी २६ टक्के असताना भारताचे मात्र केवळ १५ टक्केच आहे. २०१०-११ मध्ये केंद्र आणि राज्य या दोघांचा शिक्षणावरील एकत्र खर्च एकूण घरेलू उत्पन्नाच्या (GDP) ३ टक्क्यांहूनदेखील कमी आहे. यातून

भारतातील शिक्षणाची अवस्था किती मागासलेली आहे आणि भारतीय शासनाला लोकांना शिक्षण देण्याविषयी काहीच बांधिलकी वाटत नाही हेच स्पष्ट होते.

२.१०० बराच गाजावाजा करून आणलेल्या "शिक्षणाचा हक्क" या कायद्याला, मुख्यत: पुरेशी आर्थिक तरतूद न केल्याने, सर्व मुलांसाठी शाळेची दारे उघडण्यात अपयश आले आहे. त्याचबरोबर, विकलांग मुलांच्या खास गरजांकडेहीदुर्लक्ष करण्यात आले आहे. शिक्षणाच्या हक्कासाठी आवश्यक असलेल्या निधीतील मोठा हिस्सा उचलायला केंद्राने नकार दिला आहे. त्याऐवजी, देशभर खासगी उद्योजकांनी खासगी-सार्वजनिक-भागीदारीत (PPP) काढलेल्या २,५०० "आदर्श" शाळांना अनुदान द्यायच्या नावाखाली खासगीकरणालाच उत्तेजन दिले जात आहे. सरकारी शाळातील बहुसंख्य शिक्षक कंत्राटी पद्धतीने नेमलेले आहेत. शालेय शिक्षण हा मूलभूत आणि सार्वत्रिक हक्क असून तो शासनाने पुरवला पाहिजे.

२.१०१ सर्व स्तरांवर शिक्षणाचे खासगीकरण आणि केंद्रिकरण करायचा सपाटा लावून संपुआ-२ सरकारने शिक्षणक्षेत्रात नव-उदार नीती आक्रमकपणे राबवायला सुरूवात केली आहे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात देशाच्या संघराज्यीय ढाच्याचे महत्व कमी करणारे, लोकशाही रचना दुर्बल करणारे आणि खासगी नफेखोरीला उत्तेजन देणारे कित्येक कायदे पुढे दामटायला केंद्राने सुरूवात केली आहे. परदेशी शैक्षणिक संस्था विधेयकातून पुढे प्रचंड फी आकारणाऱ्या परकीय भांडवलादारांची दुकाने सुरू होऊन भारतीय विद्यार्थ्यांची खुलेआम लूट होऊ लागेल. राष्ट्रीय उच्च शिक्षण आयोग स्थापन करण्याचा कायदा करायचा सरकारचा प्रस्ताव आहे. हा कायदा झाल्यास तो उच्च शिक्षणातील स्वायत्तता आणि शेक्षणिक संस्थांचे वैविध्य यांच्या मुळावरचा घावच ठरणार आहे. सरकारच्या या प्रस्तावाचा खंबीरपणे मुकाबला करायला हवा.

२.१०२ बहुसंख्य शिक्षणसंस्थांनी ओबीसी साठी असलेल्या २७ टक्के राखीव जागांची नीट अंमलबजावणी केलेली नाही. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मुद्दाम भरल्या जात नाहीत. त्यांचा शिक्षणाच्या गुणवत्तेवर दुष्परिणाम होतो. सार्वजनिक उच्च शिक्षणाची पुनर्रचना आणि त्याचे लोकशाहीकरण केले पाहिजे. अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि व्यवस्थापन शिक्षण देणाऱ्या खासगी संस्थांनी या अभ्यासक्रमाचा नफा कमावून देणारा धंदा बनवला आहे. देणग्या रोखण्यासाठी आणि खासगी शिक्षणसंस्थांवर कडक नियंत्रण आणण्यासाठी केंद्रीय कायदा केला पाहिजे.

२.१०३ विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या लोकशाही हक्कांवर बंधने घातली जात आहेत. कित्येक शिक्षणसंस्थांमध्ये विद्यार्थी संसदांच्या निवडणुकांवर बंदी घातली आहे. प. बंगालमध्ये शैक्षणिक समित्या, मंडळे आणि विद्यापीठांच्या अधिसभा निवडून दिलेल्या शिक्षणक्षेत्रातील प्रतिनिधींनी लोकशाही तत्त्वाने चालवण्याची प्रदीर्घ आणि वैभवशाली परंपरा होती. तृणमूल कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालील नव्या सरकारने प. बंगालच्या या परंपरेवर घाला घालायला सुरूवात

केली आहे. विद्यार्थी कार्यकर्त्यांना धमकावणे, विद्यार्थी राजकारणाची बदनामी करणे आणि आपला शिक्षणक्षेत्रातील सर्व प्रकारची लोकशाही राजकीय कृतिशीलता संपवण्याचा कार्यक्रम पुढे नेण्यासाठी तृणमूल कॉंग्रेस विद्यार्थी मंडळांच्या निवडणुकीत पद्धतशीर हिंसाचार माजवत आहे. २०११ मध्ये केरळमध्ये SFI च्या नेतृत्वाखाली प्रवेशातील गैरप्रकार, ज्यादा फी आकारणे आणि नियम धाब्यावर बसवणे याविरुद्ध विद्यार्थ्यांनी मोठी चळवळ केली. पोलीसांनी केलेल्या पाशवी लाठीमारात आणि स्टन ग्रेनेड हल्ल्यात शेकडो विद्यार्थी जखमी झाले.

२.१०४ सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे, शिक्षणाचे बाजारीकरण थांबले पाहिजे आणि विद्यार्थी व शिक्षणक्षेत्रातील इतर विभागांच्या लोकशाही हक्कांचे संरक्षण झाले पाहिजे याचा माकप जोरदार पुरस्कार करत राहील.

**आरोग्यसेवा**

२.१०५ सार्वजनिक आरोग्य सेवेवरील खर्च सकल घरेलू उत्पादनाच्या केवळ १.२ टक्क्यांवरच रेंगाळतो आहे. देशाच्या कित्येक विभागात सार्वजनिक आरोग्य व्यवस्था पार कोलमडून पडली आहे आणि भारतीयांना आपल्या एकूण आरोग्यावरील एकूण खर्चापैकी ७० टक्के खर्च स्वत:च्या खिश्यातून करावा लागतो. माता आणि बालकांच्या मृत्यूला प्रमाणच राहिलेले नाही. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाने कधीच अपेक्षित गती घेतली नाहीच, उलट ती भ्रष्टाचाराने पार पोखरून निघाली आहे. शहरांसाठी आरोग्य अभियान चालू करायच्या योजना नुसत्याच जाहीर करून खासगी वैद्यकीय दबावगटाच्या दडपणाने वारंवार बासनात गुंडाळून ठेवल्या आहेत. सार्वजनिक आरोग्यसेवेत भगदाडे ठेवल्याने कार्पोरेट कंपन्यांच्या खासगी वैद्यकीय उद्योग क्षेत्राला वाटेल तितके पाय पसरायला आणि खासगी आरोग्यसेवा-क्षेत्र बळकट करायला मोकळे रान मिळाले आहे. सार्वजनिक आरोग्यसेवा उपलब्ध नसल्याने गरीबांना कसलेही नियंत्रण नसलेल्या आणि बहुतेक वेळा संशयास्पद गुणवत्तेचे आणि अत्यंत महागडे उपचार करणाऱ्या खासगी क्षेत्राच्या नफेखोरीला बळी पडावे लागते.

२.१०६ सार्वजनिक आरोग्य विमा योजनांमध्ये रोग्याला इस्पितळात दाखल करावे लागल्यास त्याच्या खर्चाची अगदी मर्यादित भरपाई केली जातेच, शिवाय त्यासाठी फक्त दारिद्र्य रेषेखालील व्यक्तीच पात्र ठरवल्या जातात. इस्पितळात दाखल करून सेवा पुरवण्यासाठी या सर्व योजना खासगी क्षेत्रावर अवलंबून ठेवण्यात आल्या आहेत. तेव्हा या योजना उपचारासाठी पुरेश्या सुविधा देत तर नाहीतच, पण सार्वजनिक संपत्तीचा खासगी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी वापरल्या जातात.

२.१०७ औषध-उत्पादन क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी प्रवेश करून त्यावर आपली मांड पक्की बसवल्याने औषधांच्या किंमती एकदम वाढल्या आहेत. जीवनावश्यक औषधांच्या किंमतींवर परिणामकारक नियंत्रण ठेवायला सरकार राजी नाही. कित्येक

औषधांच्या किंमती एकदम चढ्या झाल्यानंतर सरकारने आहे त्या किंमती आधार मानून औषधे किंमत धोरण ठरवण्याचा प्रस्ताव मांडला आहे. यातून औषध कंपन्यांच्या नफेखोरीला सरकारी मान्यताच मिळणार आहे. २००५ मध्ये औषधे आणि प्रसाधने कायदा दुरूस्त करून, सार्वजनिक आणि खासगी या दोन्ही क्षेत्रात,भारतीय नागरिकांवर नव्या औषधांच्या चाचण्या घ्यायला परदेशी कंपन्यांना मुभा देण्यासाठी नियम शिथिल केले आहेत.

२.१०८ सर्वांच्या आरोग्याची काळजी घेईल अशी मोफत, सर्वंकष आणि सार्वत्रिक आरोग्यसेवा पुरवणारी व्यवस्था सार्वजनिक क्षेत्रात निर्माण करण्यासाठी त्वरीत पावले उचलावीत अशी मागणी माकप करत आहे. आरोग्य सेवेवरील सार्वजनिक खर्च सकल घरेलू उत्पादनाच्या ५ टक्क्यांपर्यंत वाढवला पाहिजे. देशाच्या ग्रामीण आणि शहरी अशा सर्व भागांत सार्वजनिक आरोग्य सेवा बळकट करील अशी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची पुनर्रचना करून तिला नवा आशय आणि नवी दृष्टी दिली पाहिजे. खासगी क्षेत्रावर सर्व स्तरावर सक्त नियंत्रण ठेवले पाहिजे. उत्पादन खर्चाच्या आधारावर सर्व जीवनावश्यक औषधांच्या किंमती नियंत्रित केल्या पाहिजेत. आणि गरजेची सर्व औषधे सार्वजनिक सुविधाकेंद्रांत मोफत पुरवली पाहिजेत. ज्या औषधाचे पेटंट घेण्यात आले असेल त्यांच्या किंमतींवर नजर ठेवून सर्व सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाची औषधे किंमत-नियंत्रणाखाली आणली पाहिजेत. बड्या औषध कंपन्या भारतात घेत असलेल्या औषधांच्या चाचण्या कडक नियमांखालीच झाल्या पाहिजेत.

## कार्पोरेटच्या घट्ट पकडीतील प्रसारमाध्यमे

२.१०९ दोन दशकांच्या नवउदारवादाने भारतातील प्रसारमाध्यमे पूर्णत: बदलून गेली आहेत. प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमे आता कार्पोरेट धंद्याचा भाग बनली आहेत. राष्ट्रीय असो वा स्थानिक, वृत्तपत्रे आणि टी व्ही वाहिन्या बड्या कंपन्याच चालवतात. वृत्तक्षेत्रात २६ टक्के थेट परकीय गुंतवणुकीचा आणि बिगर-वृत्तक्षेत्रात १०० टक्के भाग भांडवलाचा शिरकाव झाल्याने प्रसार माध्यमातील बादशहा मर्डॉक याला इलेक्ट्रॉनिक माध्यमावर मोठे नियंत्रण मिळवणे शक्य झाले आहे. यामुळे माध्यमांच्या आशयात नाट्यपूर्ण बदल झाले आहेत. नफेखोरीच्या मागे लागलेली कार्पोरेटनी चालवलेली माध्यमे सनसनाटी बातम्या आणि सेक्स-हिंसेचा मसाला घातलेले खाद्य अव्याहत पुरवत असतात. जाहिरातींमधून मिळणारा महसूल महत्त्वाचा असल्याने चंगळवाद प्रभावी होत आहे. स्त्रियांचे वस्तुकरण आणि प्रतिगामी मूल्यांचा सर्रास प्रसार करणारे चित्रण याचा समाजावर घातक परिणाम होत आहे. पाठोपाठ आलेल्या सर्वच सरकारांनी सार्वजनिक प्रसारणक्षेत्राचे अवमूल्यन करून खासगीकरणाला प्रोत्साहन दिले आहे. नवउदार मूल्यांनी पैसे घेऊन बातम्या छापायच्या प्रवृत्तीला, पेड न्यूजला, जन्माला घातले असून आता खासगी प्रसार घराणी आणि कार्पोरेट कंपन्या यांच्यात सर्रास करार होऊ लागले आहेत.

२.११० प्रसार माध्यमांचे लोकशाहीकरण झाले पाहिजे आणि या महत्त्वाच्या क्षेत्रावरील बड्या भांडवलाची पकड नष्ट केली पाहिजे असे माकप मानतो. यासाठी माध्यमांतील थेट परकीय गुंतवणुकीचे धोरण फिरवले पाहिजे; बहुमाध्यमांवरील मालकीला बंदी घातली पाहिजे (याचा अर्थ ज्या भांडवली घराण्याच्या मालकीचे वृत्तपत्र असेल त्याला टेलिव्हिजन वाहिनी चालू करायला परवानगी नसणे); सार्वजनिक प्रसारण सेवा ही प्रसार माध्यमांतील महत्त्वाचा घटक बनावा यासाठी प्रसार भारतीची पुनर्रचना करणे; आता अस्तित्वात असलेल्या प्रेस कौन्सिलच्या जागी स्वतंत्र नियंत्रणाचा अधिकार असलेली माध्यम कौन्सिल स्थापन करणे आदी उपाय करावे लागतील.

## संस्कृती

२.१११ बाजारपेठेच्या प्रेरणेने चालणाऱ्या नव-उदार व्यवस्थेत संस्कृतीला चंगळवादी, व्यापारी आणि व्यक्तिवादी वळण देण्याचा प्रयत्न होत आहे. तसेच, हिंदुत्ववादी शक्तींचे धर्मनिरपेक्षता आणि संस्कृतीच्या सर्वसमावेशक चारित्र्यावर हल्ले चालूच आहेत. संस्कृतीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती आणि सांस्कृतिक व्हहारावरही हिंदुत्ववादी हल्ले करत आहेत. गेल्या काही वर्षांत जातींवर आधारीत संघटनादेखील सांस्कृतिक निर्मितीवर, विशेषत: चित्रपटांवर, सेन्सॉरशिप लादायचा प्रयत्न करू लागल्या आहेत. अत्यंत शक्तीमान असलेली आणि समूहांवर प्रभाव टाकणारी माध्यमे केवळ बाजारू संस्कृतीला उठाव देऊन थांबत नाहीत, तर स्त्रियांविषयी पितृसत्ताक मूल्यांचा प्रसार, हिंसेचे उदात्तीकरण, अंधश्रद्धा आणि प्रतिगामी विचारंचा प्रसार अशा समाजावर घातक परिणाम करणाऱ्या गोष्टींना उत्तेजन देत असतात.

२.११२ भारत हा शेतकरी, कारागीर, आदिवासी आणि इतर अनेक समाज विभागांच्या लोककला आणि परंपरा यांनी समृद्ध असलेला देश आहे. शेतीतील अरिष्ट सखोल होत असताना आणि संस्कऋतीला बाजारू मूल्यांनी वेठीला धरले असताना या कला आणि कलाकर यांचे भवितव्य अनिश्चित बनले आहे. सर्व प्रागतिक आणि लोकशाही शक्तींना एकत्र करणाऱ्या धर्मनिरपेक्ष, लोकशाही आणि बहुपेडी संस्कृतीचे संवर्धन करू शकणारा कार्यक्रम विकसित करायला हवा. या प्रकारच्या सर्व प्रयत्नांना पक्ष अगदी मनापासून संपूर्ण सहाय्य करील.

## राजकीय परिस्थिती

### कॉंग्रेस

२.११३ काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आगाडीने २००९ ची लोकसभा निवडणूक जिंकली. या आघाडीला जरी बहुमत प्राप्त करता आले नाही तरी तिला बहुमतासाठी समाजवादी पक्ष, बहुनज समाज पक्ष, राष्ट्रीय जनता दल आणि जनता दल (धर्मनिरपेक्ष) यांचे समर्थन मिळाले. सत्ताधारी वर्गाचा प्रभावी हिस्सा असलेल्या बड्या भांडवलदार विभागाने काँग्रेसला पाठिंबा दिला.जनतेच्या एका मोठ्या विभागाला भाजप परत सत्तेमध्ये येऊ नये असे वाटल्याने, त्याचाही फायदा झाला. काँग्रेसला अल्पसंख्याक, मध्यम वर्ग आणि युवकांत मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला.

२.११४ सत्तेवर आरूढ होऊन तीन वर्षे व्हायच्या आत प्रचंड भ्रष्टाचाराची प्रकरणे उघड झाल्याने मध्यम वर्गाचा मोठा विभाग संपुआ सरकारपासून दूर गेला. वाढत्या बेरोजगारीमुळे युवकांचाही मोठ्या प्रमाणात भ्रमनिरास होऊ लागला आहे. आणखी नव-उदार सुधारणा रेटायला सरकारला अपयश येत असल्याने बडा भांडवलदारदेखील आपली नाराजी व्यक्त करू लागला आहे.धर्मनिरपेक्ष पर्याय नसल्याने मुस्लिम समाज अजून बऱ्याच ठिकाणी काँग्रेसच्या पाठीशी उभा आहे. सत्तेवर असलेल्या राज्यांत भाजप आपली विश्वासार्हता गमावून बसल्याचाही काँग्रेसला फायदा होत आहे. सतत वाढत जाणारी महागाई रोखण्यात अपयश आल्याचा काँग्रेसला फटका बसला आहे. याचबरोबर उच्च स्तरावरील भ्रष्टाचारामुळे काँग्रेस पक्षाची प्रतिमा आणखी काळवंडली आहे.

२.११५ आपल्या दुसऱ्या कार्यकालात संपुआ सरकार नव-उदार कार्यक्रम नेटाने रेटायचा प्रयत्न करत आहे. लोकसभेत फारच तुटपुंजे बहुमत असल्याने त्याचे हे प्रयत्न काही बाबतीत अयशस्वी ठरले आहेत. प्रत्येक वेळी बहुमत मिळवण्यासाठी पाठिंबा देणाऱ्या पक्षांना आपल्या बाजूला ठेवण्यासाठी काँग्रेसला सतत कसरत करावी लागते, त्यांच्याशी काही करार करावे लागतात. काही समाज कल्याणाच्या उपाय योजना करत आपला नव-उदार कार्यक्रम झाकायचा आटापिटा काँग्रेस पक्षाला करावा लागतो. या उलाघालीत अन्न सुरक्षेसारख्या महत्वाच्या कायद्याची तोडमोड होते. हे विसविशीत उपाय म्हणजे पक्षाची "आम आदमी"शी असलेली बांधिलकी असा मुखवटा त्याला घ्यावा लागतो. पण एकूण नव-उदार धोरणाच्या चौकटीमुळे या उपायांनाही वरचेवर मर्यादा येऊ लागल्या आहेत.

२.११६ उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या राज्यांत काँग्रेस आपला गमावून बसलेला आधार आणि प्रभाव पुन्हा मिळवायच्या खटपटीत आहे. बिहारच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची अवस्था फारच शोचनीय झाली. आंध्र प्रदेशात जगनमोहन रेड्डीने घडवून आणलेल्या फुटीने पक्षापुढे अडचणी निर्माण झाल्या आहेत. तामीळनाडुच्या विधानसभा निवडणुकीत द्रमुकचा प्रचंड पराभव झाल्याने संपुआ आघाडी दुर्बल झाली आहे. तृणमूल काँग्रेस हा त्याचा दुसरा प्रमुख दोस्त, प.

बंगालमधील यशानंतर, अनेक बाबतीत जास्त जास्त आग्रही भूमिका घेऊ लागला आहे.

**भाजप**

२.११७ २००९च्या निवडणुकीतील पराभवानंतर भाजपमधील अंतर्गत वाद तीव्र झाले आहेत. नेतृत्वाच्या समस्येत रा. स्व. संघाला हस्तक्षेप करावा लागला, यावरून भाजपची संघापुढील लाचारी पुन्हा उघड झाली आहे. त्या पक्षात अजूनही कित्येक गट एकमेकांच्या विरोधात उभे आहेत. भ्रष्टाचाराच्या विरोधात काढलेल्या रथयात्रेच्या माध्यमातून लाल कृष्ण आडवाणींना त्या पक्षाने नेता म्हणून समोर आनण्याचा प्रयत्न केला, या प्रसंगी हे दिसून आले. भाजपला निवडणुकांत अपयश आले असले तरी गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड यासारख्या राज्यांत त्याचा पाया अजून कायम आहे. भ्रष्टाचाराच्या मुद्द्याचा भाजप फायदा उठवू पहात आहे. पण कर्नाटकातील येडीयुरप्पा सरकारचे लांच्छनास्पद काम आणि पक्षाची खाण माफियाशी जोडलेली घट्ट नाळ यामुळे भ्रष्टाचारचा मुद्दा भाजप फार परिणामकारकरित्या उठवू शकलेला नाही. येडीयुरप्पांना अटक करून तुरूंगात जावे लागल्याने भाजपच्या प्रतिमेवर काळिम्याची आणखी पुटे चढली. पण भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून निर्माण झालेल्या कॉंग्रेसविरोधी भावनेमुळे शहरी मध्यम वर्गातील मोठ्या विभागाचा पाठिंबा भाजपला मिळाला आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत मिळवलेले यश आणि जनतेच्या काही विभागात वाढत असलेली कॉंग्रेसविरोधी भावना यामुळे या पक्षाचे नीतीधैर्य वाढले असून रालोआला नवीन दोस्त मिळावेत यासाठी त्याचा प्रयत्न चालू आहे.

२.११८ रा. स्व. संघाच्या मार्गदर्शनाने भाजप अयोध्येत देऊळ बांधणे वा 'इस्लामी दहशतवाद' अशा जमातवादी प्रश्नांवर जनतेला संघटीत करायचा प्रयत्न करत असला तरी त्याला फारसा प्रतिसाद मिळालेला नाही. कॉंग्रेसच्या आर्थिक धोरणाविषयी मूलभूत मतभेद नसले तरी जनतेचा पाठिंबा मिळवण्यासाठी लोकसभेतील मुख्य विरोधी पक्ष म्हणून भाजप संपुआच्या काही धोरणांणा विरोध करत असतो. भाजपची नव-उदार आर्थिक नीतीशी बांधिलकी आहे; आणि तो केवळ एक जमातवादी पक्ष नाही तर तो कॉंग्रेस पक्षाचा उजवा पर्याय आहे.

**प्रादेशिक पक्ष**

२.११९ बहुतेक प्रादेशिक पक्ष प्रादेशिक भांडवलदार आणि ग्रामीण सधनांचे प्रतिनिधित्व करतात. त्यांच्या राजकारणावर कॉंग्रेस आणि भाजप यांच्याविषयीच्या त्यांच्या संधीसाधू दृष्टीकोनाची छाप असते. केंद्रामध्ये आघाडीचे राजकारण हा जणू नियमच बनल्याने या पक्षांना आपापल्या राज्यातील तत्कालीन हितसंबंधांनुसार कॉंग्रेस किंवा भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये जाण्याची संधी मिळते. आपली

आघाडी बळकट करण्यासाठी आणि केंद्रात सत्ता मिळवण्यासाठी काँग्रेस आणि भाजप या दोघांनाही काही प्रादेशिक पक्षांशी आघाडी करणे भाग पडते.

२.१२० सत्ताधारी वर्गांना नेहमीच द्विपक्षीय नाही तर बड्या भांडवली पक्षांच्या नेतृत्वाखालील दोन आघाड्यांची व्यवस्था हवी असते. याद्वारे जी कोणती आघाडी सत्तेवर येईल त्यातून बड्या भांडवली विभागांचे वर्गीय हितसंबंध जोपासले जातील, अशी व्यवस्था होते. अशा दोन आघाड्यांची व्यवस्था बळकट होऊ नये असे आपले प्रयत्न असतात. जे पक्ष काँग्रेस वा भाजपसोबत नाहीत अशा प्रादेशिक पक्षांसोबत आपले नाते टिकवून ते आणखी बळकट केले पाहिजे. जनतेचे प्रश्न, राष्ट्रीय सार्वभौमत्वाचे संरक्षण, केंद्र-राज्य संबंध आदी प्रश्नांवर असे सहकार्य आणि संघटीत कृती शक्य आहे.

२.१२१ हे पक्ष दोलायमान असले तरी संसदेत विशिष्ट प्रश्नांवर बिगरकाँग्रेसी धर्मनिरपेक्ष पक्षांशी सहकार्य वाढवण्याचा आपला दृष्टीकोन असला पाहिजे. संसदेबाहेर चळवळ विस्तारण्यासाठी जनतेच्या प्रश्नांवर संयुक्त कृती करता येतात.

**माकप आणि डावे पक्ष**

२.१२२ माकप आणि डाव्या पक्षांच्या ताकदीत ९व्या पक्ष परिषदेच्या वेळी असलेल्या परिस्थितीच्या तुलनेत मोठा बदल झाला आहे. २००८ मध्ये १९वी परिषद झाली तव्हा २००६ च्या पश्चिम बंगाल आणि केरळच्या विधानसभा निवडणुकीतील विजयामुळे पक्ष बळकट झाल्याचे चित्र होते. त्रिपुरामध्येदेखिल २००८ मध्ये डाव्या आघाडीने सलग चौथ्यांदा सत्ता हस्तगत केली होती. परंतु मे २००९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत पक्षाची दारूण अवस्था होऊन आजपर्यंतच्या सर्वात कमी जागा पक्षाला मिळाल्या. २०११च्या विधानसभा निवडणुकीत प. बंगालमध्ये डाव्या पक्षांचा १९७७ नंतर प्रथमच पराभव झाला. केरळमध्ये डाव्या लोकशाही आघाडीचा अगदी थोडक्यात का असेना, पण पराभव झाला.

२.१२३ निवडणुकीतील पीछेहाट आणि इतर कुठल्याही राज्यात पक्षाला करता न आलेली प्रगती यामुळे राष्ट्रीय स्तरावर पक्षाची आणि डाव्या शक्तींची ताकद दुबळी झाली आहे. सत्ताधारी वर्ग आपली नव-उदार धोरणे रेटतआहेत आणि जमातवादी शक्ती हातपाय पसरायचा प्रयत्न करत आहेत ते या परिस्थितीत. त्यामुळे माकपला बळकट करणे आणि डाव्यांनी गमावलेली ताकद पुन्हा प्राप्त करणे या गोष्टींना अपार महत्त्व येते.

**डाव्यांच्या नेतृत्वाखालील सरकारे**

२.१२४ प. बंगालमधील २०११ च्या विधानसभा निवडणुकीत डाव्या आगाडीचा १९७७ नंतर प्रथमच पराभव झाला. डावी आघाडी सलग ३४ वर्षे सत्तेत होती. हा पराभव ही देशातील डाव्या आणि लोकशाहीवादी शक्तींची झालेली मोठी पीछेहाट आहे, यात शंकाच नाही. पण डाव्या आघाडीच्या सरकारने केलेली कमाई सहजासहजी नजरेआड करता येत नाही. भूमी सुधारणांची अंमलबजावणी, पंचायत व्यवस्थेचे लोकशाहीकरण आणि विकेंद्रीकरण, कामकरी विभागांच्या हक्कांचे संरक्षण, धार्मिक सलोखा आणि विविध जाती-धर्मात धर्मनिरपेक्ष मूल्यांची वृद्धी ही या कमाईची काही ठळक उदाहरणे होत. तृणमूल कॉंग्रेसच्या नव्या सत्तखाली या सर्व गोष्टी आता हल्ल्याचे लक्ष्य बनल्या आहेत. भूमीसुधारणांचे चक्र उलटे फिरवून शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. पंचायत व्यवस्थेचे अवमूल्यन करून लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या हातातील सत्ता नोकरशाहीला बहाल केली जाऊ लागली आहे. कष्टकरी वर्गांचे हक्क आणि कामगार संघटना यांच्यावर हल्ले होऊ लागले आहेत. माकप आणि डाव्या पक्षांवर व्यापक हल्ले करून लोकशाही हक्कांची पायमल्ली केली जात आहे.

२.१२५ जनतेला संघटीत करून आपण या हल्ल्यांचा मुकाबला केलाच पाहिजे; भूमी सुधारणांनी करून दिलेल्या कमाईचे संरक्षण केले पाहिजे; आणि मूलभूत वर्गांच्या आणि जनतेच्या चळवळी बांधल्या पाहिजेत. अनुभवातून शिकून राजकीय आणि संघटनात्मक कमकुवतपणावर मात करून आपल्यापासून दुरावलेल्या जनतेशी पुन्हा दुवे प्रस्थापित केले पाहिजेत.

२.१२६ केरळमध्ये संयुक्त लोकशाही आघाडीला आपल्यापेक्षा १ टक्का मते जास्त पडली, आणि ३ जागांनी बहुमत मिळाले याचा अर्थ जनतेने डाव्या लोकशाही आघाडीच्या सरकारला आणि त्याच्या धोरणांना झिडकारले असा अजिबात होत नाही. उलट, केरळच्या कष्टकरी जनतेने माकप आणि डाव्या लोकशाही आघाडीला मोठा पाठिंबा दिल्याचेच स्पष्ट दिसते.

२.१२७ या दोन्ही राज्यांत पक्ष जनतेचा जास्त जास्त पाठिंबा मिळवण्यासाठी प्रयत्नशील राहील.

## त्रिपुरा सरकारचे रक्षण करा

२.१२८ त्रिपुराच्या डाव्या आघाडीच्या सरकारने लोकांच्या सेवेने मोठी विश्वासार्हता मिळवली आहे. भ्रष्टाचारमुक्त शासनाचे ते स्वच्छ उदाहरण आहे. दारिद्र्य कमी करणे, लोकांना मूलभूत सोयी-सुविधा पुरवणे, आदिवासी कल्याण, आणि आदिवासी आणि बिगर-आदिवासींमध्ये एकजूट जोपासणे याबाबतीत अनुकरणीय कार्य केले आहे. कॉंग्रेस आणि इतर उजव्या शक्तींनी डाव्या आघाडीच्या सरकारला हल्ल्याचे लक्ष्य केले आहे. तेथील दहशतवादी शक्तींनी ईशान्य भारतातील

इतर अतिरेकी गटांशी संधान साधल्यामुळे त्याबाबत खूपच जागरूक राहिले पाहिजे. पक्षाने आणि देशातील डाव्या शक्तींनी त्रिपुरातील डाव्या आघाडी सरकारचे रक्षण करायला हवे. त्यासाठी केंद्र सरकारने लोकांचा विकास करण्यासाठी राज्याला पुरेसा निधी द्यावा अशी मागणी करायला हवी.

## हिंसाचाराला मूठमाती द्या

## पश्चिम बंगालमधील लोकशाहीचे संरक्षण करा

२.१२९ पश्चिम बंगालमध्ये माकपवर भयानक हल्ले होत आहेत. मे २००९च्या लोकसभा निवडणुकीनंतर पक्ष कार्यकर्त्यांवर आणि पक्षाच्या पारिख्यांवर नेम धरून हल्ले सुरू झाले आहेत. हे हल्ले विशेषत: ग्रामीण भागात होत आहेत. मे २०११च्या विधानसभा निवडणुकांनंतर तर हे हल्ले फारच तीव्र झाले आहेत. माओवाद्यांनी ठरवून केलेल्या आपल्या पक्ष कार्यकर्त्यांच्या हत्त्या आणि तृणमूल कॉंग्रसच्या नेतृत्वाखाली उघडलेली रक्तरंजीत आघाडी हे या हल्ल्यांचे ठळक अंग आहे. मे २००९ च्या लोकसभा निवडणुकीपासून या हिंसक मोहिमेत माकप आणि डाव्या आाघाडीचे ४४६ कॉम्रेड्स ठार करण्यात आले आहेत. यापैकी ५२ कॉम्रेड्स मे २०११च्या विधानसभा निवडणुकीनंतर ठार करण्यात आले आहेत. कित्येक ठिकाणी पक्षाची, कामगार आणि जन संघटनांची शेकडो कार्यालये ताब्यात घेण्यात आली आहेत, नाही तर त्यांवर हल्ले करण्यात आले आहेत. बऱ्याचदा असे हल्ले करण्यासाठी पोलीसच तृणमूलच्या गुंडांना मदत करत असतात. निवडून आलेल्या पंचायत सदस्यांना धमक्या देऊन त्यांच्या कामात सर्रास अडथळे आणून त्यांना काम करू दिले जात नाही. पक्षाला विकलांग करण्यासाठी आणि त्याला जनतेच्या पायापासून तोडण्यासाठी केलेला हा योजनाबद्ध प्रयत्न आहे.

२.१३० पश्चिम बंगालमधील पक्षावरचा हा हल्ला म्हणजे संपूर्ण माकप वर केलेलाच हल्ला आहे. तो लोकशाहीवरील आणि लोकशाही अधिकारांवरील हल्ला आहे. संपूर्ण पक्षाने पक्षाच्या पश्चिम बंगाल शाखेला भ्रातृभावी पाठिंबा देऊन त्याचे रक्षण करायला सरसावले पाहिजे. या हल्ल्यांचा निषेध करून त्याविरुद्ध जनमत संघटीत करणे आणि लोकशाही शक्तींना या कार्यासाठी संघटीत करणे हे पक्षासमोरील तातडीचे कार्य आहे. तृणमूल कॉंग्रेसने हे हल्ले थांबवावेत आणि शांततेचे वातावरण त्वरीत प्रस्थापित व्हावे यासाठी लोकशाही शक्तींना संघटीत केले पाहिजे.

## संयुक्त आंदोलने तीव्र करा

**२.१३१** अखिल भारतीय स्तरावर डाव्या कृती आणि विविध राजकीय शक्तींची संयुक्त आंदोलने उभारण्याचा पक्षाने प्रयत्न केला. डाव्या पक्षांनी कित्येक संयुक्त मोहिमा घेतल्या. भाववाढीच्या प्रश्नांवर एक महत्वाची मोहीम घेतली. १२ मार्च

२०१० रोजी दिल्ली रॅलीत डाव्या पक्षांनी दिलेल्या हाकेनुसार ८ एप्रिल २०१० रोजी देशभर निदर्शने आणि जेल भरो आंदोलन करण्यात आले. यात २० लाख लोक सहभागी झाले. पाठोपाठ २७ एप्रिलला १३ पक्षांनी हरताळ पाळायची हाक दिली होती, तिला मोठे यश मिळाले. डाव्या आणि धर्मनिरपेक्ष पक्षांनी पुन्हा वारंवार केल्या जाणाऱ्या इंधन दरवाढीविरुद्ध ५ जुलै रोजी हरताळ पुकारला. रालोआने देखील त्या दिवशीच बंद पुकारला. गेल्या वीस वर्षातली हे एक अतिभव्य असे निषेध आंदोलन झाल्याचे दिसून आले.

२.१३२ सर्व केंद्रीय कामगार संघटनांनी उभे केलेले संयुक्त व्यासपीठ ही एक महत्वाची घटना आहे. भारतीय मजदूर संघ सोडून इतर सर्व केंद्रीय कामगार संघटनांनी ७ सप्टेंबर २०१० रोजी सार्वत्रिक संप केला. त्यानंतर ८ नोव्हेंबर २०११ रोजी जेल भरो करण्यात आला. या जेल भरोत इंटक आणि भारतीय मजदूर संघदेखील सामील झाले होते. निदर्शनात ७.५ लाख कामगार आणि कर्मचारी सहभागी झाले होते. केंद्रीय कामगार संघटनांनी २८ फेब्रुवारी २०१२ रोजी सार्वत्रिक संपाची हाक दिली आहे. इंटक आणि भामसं यांचा सहभाग असलेला, केंद्रीय कामगार संघटनांचा हा पहिला सार्वत्रिक संप असेल. सर्व केंद्रीय कामगार संघटनांचे व्यासपीठ तयार होणे हा देशाच्या कामगार चळवळीच्या इतिहासातील एक महत्वाचा टप्पा आहे. या संयुक्त कृतीची वेगवेगळे कष्टकरी विभाग आणि जनसंघटना यांच्या संयुक्त आंदोलनांना प्रेरणा मिळणार आहे.

२.१३३ नव-उदार धोरणांना आव्हान देण्यासाठी आताची चळवळ पुरेशी नसल्याने लढे अजून जास्त व्यापक आणि तीव्र केले पाहिजेत. जमीन आणि जमीन अधिग्रहणाचे प्रश्न, अन्न, नवा रोजगार आणि असलेल्या नोकऱ्या नियमित करणे, आणि जनतेच्या जीवनमानाचे रक्षण या प्रश्नांवर खूप व्यापक चळवळ व्हायला हवी. आपल्या प्रभावाबाहेरील जनतेला संयुक्त लढ्यात आणल्यानेच हे शक्य होणार आहे.

## पक्षाचे राजकीय धोरण

२.१३४ काँग्रेस आणि भाजपसोबत माकपने राजकीय लढाई करायला हवी. वर्गीय शोषण चालू ठेवणारी आणि जनतेच्या विविध विभागांवर सामाजिक दडपशाही करणाऱ्या बड्या भांडवलदार-जमीनदारी व्यवस्थेचे प्रतिनिधित्व हे दोन्ही पक्ष करतात. ते नव-उदार धोरणाचा आणि अमेरिकाधार्जिण्या परराष्ट्र नीतीचा पुरस्कार करतात. लोकांना चिरडून टाकणाऱ्या महागाईचे ओझे लादणाऱ्या, बेरोजगारीत ढकलणाऱ्या, शेतकरी-कामगारांना जगणे असह्य करणाऱ्या आणि दुसरीकडे उघड भ्रष्टाचाराला खतपाणी घालणाऱ्या आणि बड्या भांडवलदार - श्रीमंत थरांना प्रचंड सवलती देणाऱ्या काँग्रेस आणि संपुआचा पराभव केलाच पाहिजे. डाव्या, लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष शक्तींची आगेकूच होण्यासाठी भाजपला एकाकी पाडणे आणि त्याच्या जमातवादी, उजव्या कार्यक्रमाला विरोध

करणे अत्यावश्यक आहे.

२.१३५ काँग्रेस आणि भाजपच्या विरोधात माकप डावा आणि लोकशाही पर्याय पुढे ठेवतो. भांडवलदार-जमीनदारांच्या सत्तेला केवळ डावे आणि लोकशाही व्यासपीठ हाच पर्याय असू शकतो. चळवळी आणि लढ्यांच्या प्रक्रियांमधून आणि डाव्या व लोकशाही शक्तींची राजकीय आघाडी निर्माण करूनच हा पर्याय उभा केला पाहिजे. असे प्रयत्न करत असताना ज्या बिगरकाँग्रेसी आणि बिगरभाजप शक्ती लोकशाही, राष्ट्रीय सार्वभौमत्व, धर्मनिरपेक्षता, देशाचा संघराज्यीय ढाचा आणि जनतेचे जीवनमान आणि हक्क यासाठी लढा करण्यात महत्वाची भूमिका पार पाडू शकतील अशांना एकत्र आणणे गरजेचे होऊ शकते. डाव्या आणि लोकशाही शक्तींची आघाडी उभी करण्यासाठी अशा संयुक्त व्यासपीठांचे मोठे साह्य मिळू शकते.

२.१३६ प्राप्त परिस्थितीत आंदोलने विस्तारीत करण्यासाठी बिगर-काँग्रेसी धर्मनिरपेक्ष पक्षांना सोबत घेऊन वरील प्रश्नांवर संयुक्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजहे. विशिष्ट धोरणात्मक बाबी आणि लोकांच्या प्रश्नांवर संसदेत या पक्षांशी सहकार्य करणे शक्य आहे. जेव्हा आणि जशी गरज भासेल त्यानुसार यातील काही पक्षांसोबत निवडणुकीत समझोते करणे शक्य आहे.

**स्वतंत्र भूमिका आणि कार्य बळकट करा**

२.१३७ सद्यस्थितीत डाव्या शक्तींची निवडणुकीत मोठी हानी झाली असताना आणि पक्षाचा सर्वात बळकट आधार असलेल्या पश्चिम बंगालमध्ये हल्ले होत असताना पक्षाचा पाया विस्तारणे आणि त्याचा प्रभाव वाढवणे खूप महत्वाचे झाले आहे. हे करण्यासाठी पक्षाचे स्वतंत्र कार्य विस्तारणे आणि बळकट करणे अत्यंत आवश्यक आहे. पक्ष वाढवण्याची गुरुकिल्ली हीच आहे. लोकांनी चळवळीत आणि लढ्यात भागीदारी करावी म्हणून जनतेला कृतीशील करणे आणि त्यांची जाणीव विकसित करायला हवी. आणि यासाठी राजकीय आणि आर्थिक प्रश्नांवर पक्षाच्या स्वतंत्र कृती व्हायला पाहिजेत. लोकांना संघटीत करून चळवळीत उतरवण्यासाठी, आपल्या प्रभावापलिकडील जनविभाग व्यापक चळवळीत यावेत यासाठी जनसंघटना या स्वतंत्र व्यासपीठे झाल्या पाहिजेत.

२.१३८ पक्षाचे राजकीय-वैचारिक काम आपल्या वर्गीय दृष्टीच्या आधारावर विकसित केले पाहिजे. सर्व मुख्य प्रश्नांवर पक्षाने राजकीय हस्तक्षेप केलाच पाहिजे. येत्या नजिकच्या काळात पक्षाच्या राजकीय व्यासपीठाभोवती स्वतंत्र राजकीय मोहीम उभारणे आणि जनतेला आंदोलनात उतरवणे या कामाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. याची आपल्या पक्षाला भांडवली पक्षांपासून आणि त्यांच्या राजकारणापासून अलग ठेवण्यात मदत होईल. पक्षाने भांडवली पक्षांची विचारसरणी आणि त्यांचे राजकारण यांचा प्रतिवाद केला पाहिजे. पक्षाने आपली राजकीय मोहीम आणि राजकीय काम नव्या भागात आणि नव्या समाजविभागात

नेले पाहिजे. निवडणुकीतील सहभाग आणि संसदीय व्यासपीठांवरील काम हे जनतेच्या चळवळी विकसित करण्याच्या आणि जनतेचे राजकीय आंदोलन उभे करायच्या कामी वापरायला हवे.

२.१३९ पक्षाच्या मूलभूत वर्गांतील कामाला प्राधान्य द्यायला हवे. वर्गीय आणि सामुदायिक लढ्यात शेतकऱ्यांना आणि खेड्यांतील गरीबांना सामील करून घेण्यात राहिलेली त्रुटी भरून काढली पाहिजे. पक्षाने मॅन्युफॅक्चरिंग आणि कळीच्या संघटीत क्षेत्रातील कामगारांवर प्रभाव वाढवला पाहिजे. त्याचबरोबर असंघटीत क्षेत्रातील कामगारांना चळवळीत आणून त्यांच्यात राजकीय काम करायला हवे.

२.१४० दलित, अल्पसंख्य, आदिवासी आणि स्त्रिया यांचे विशिष्ट प्रश्न असतात. एका व्यापक लोकशाही व्यासपीठाचा भाग म्हणून असे प्रश्न घ्यायला हवेत.

२.१४१ मागील दोन पक्ष परिषदांमध्ये स्थानिक प्रश्नांवर सातत्यपूर्ण लढे विकसित करण्यावर भर दिला होता. पण हे काही पुरेश्या प्रमाणात घडलेले नाही. ही कमजोरी दुरूस्त करायला हवी. लोकांचे जगण्याचे प्रश्न, जमीन, रोजगाराची हमी, योग्य वेतन, आरोग्यसेवा, शिक्षण आणि इतर मूलभूत सुविधांचा लाभ घेण्याची संधी, या सर्व गोष्टींवर नव-उदार धोरणांचे दुष्परिणाम झाले आहेत. हे प्रश्न निवडून स्थानिक पातळीवर त्यांवर सातत्यपूर्ण संघर्ष उभा केला पाहिजे. तसेच अशा चळवळी राज्य पातळीवर विस्तारीत केल्या पाहिजेत. नव-उदार धोरणाविरुद्धच्या चळवळी अखिल भारतीय आणि राज्यस्तरांवर उभारायला हव्यात.

२.१४२ युवक आणि बेरोजगारांत पक्षाने आपल्या राजकीय कामाला गती दिली पाहिजे. शहरी भागातील, विशेषत: झोपडपट्ट्या आणि गरीब वस्त्यांतील या कामाला जास्त प्राधान्य द्यायला हवे. लोकांवर परिणाम करणारे आणि विसेषत: गरीब आणि मागास जनतेच्या जिवनमानावर दुष्परिणाम करणारे पर्यावरणाचे प्रश्न पक्षाने घेतले पाहिजेत.

## डावी एकजूट

२.१४३ माकप, भाकप, अखिल भारतीय फॉरवर्ड ब्लॉक आणि क्रांतीकारी समाजवादी पक्ष हे गेली दोन दशके राष्ट्रीय स्तरावर एकजुटीने काम करत आहेत. संपुआ - १ च्या कार्यकालात अनेक धोरणात्मक आणि जनतेच्या प्रश्नांवर निर्णय घ्यायचे असल्याने हे सहकार्य खूपच घट्ट झाले होते.

२.१४४ अलिकडच्या काळात तेलंगण राज्य स्थापन करण्यासारख्या काही प्रश्नांवर माकप आणि भाकप यांनी वेगवेगळ्या भूमिका घेतल्या आहेत. यामुळे आंध्र प्रदेशात काही अडचणी निर्माण झाल्या आहेत. असे असले तरी, राष्ट्रीय स्तरावर एकूणत: डावे पक्ष समान भूमिका घेत संयुक्त कार्यक्रम करत आले आहेत.

सद्यस्थितीत निवडणुकांत पिछाडीवर जावे लागल्याने आणि प. बंगालमध्ये मोठा पराभव पदरी आल्याने डावी एकजूट टिकवून ती बळकट करणे जास्तच जरूरीचे झाले आहे. प. बंगालमधील दाव्या आघाडीच्या सरकारसमोरील समस्या आणि तेथील घटनांनी घेतलेले वळण याविषयी मतभिन्नता असू शकते. पण त्याकडे डावी आघाडी विकलांग होणार नाही अशा समीक्षात्मक दृष्टीने आणि भ्रातृभावाने पहायला हवे. डाव्यांवर होणाऱ्या पाशवी हल्ल्याचा प्रतिकारही एका सामुहिक निर्धाराने आणि एकजुटीने लोकांच्यात जाऊनच करावा लागेल.

२.१४५ डाव्यांच्या स्वतंत्र भूमिकेवर भर देण्याची मोठी गरज आहे. नव-उदार धोरणे आणि साम्राज्यवादी प्रभावाच्या विरोधात फक्त डावे पक्षच सातत्याने लढत असल्याने डावी एकजूट जास्तच गरजेची झाली आहे.

२.१४६ डाव्या पक्षांच्या बाहेर डावा विचार मानणारे कित्येक गट आणि व्यक्ती आहेत. डावे मांडत असलेल्या भूमिकेच्या व्यासपीठांवर त्यांना आणायला हवे. यासाठी पक्षाने पुढाकार घ्यायला हवा.

**डावा आणि लोकशाही कार्यक्रम**

२.१४७ गेल्या दोन दशकातील राबवण्यात आलेले उदारीकरण आणि केंद्रात एका मागोमाग एक आलेल्या सरकारांनी बडे भांडवलदार आणि जमीनदार यांना धार्जिण्या असलेल्या धोरणांचा केलेला पाठपुरावा, यावरून भांडवलदार-जमीनदार व्यवस्थेला डाव्या-लोकशाहीवादी शक्ती याच खऱ्या पर्याय आहेत, हे स्पष्ट झाले आहे. काम करणाऱ्या विविध थरांतील जनतेचे , - मग ते औद्योगिक कामगार असोत की असंघटीत क्षेत्रातील कामगार, शेतकरी असोत की शेतमजूर, मध्यमवर्गीय असोत की बुद्धिवादी - या सर्वांचे हित पहाण्याची क्षमता डाव्या आणि लोकशाही कार्यक्रमातच आहे. डाव्या आणि लोकशाही आघाडीच्या कार्यक्रमावर काम करणाऱ्या सर्व थरांना आंदोलनात उतरवूनच आपल्याला जनतेची लोकशाही आघाडीकडे आगेकूच करत मूलभूत समाज परिवर्तन घडवून आणता येईल.

२.१४८ डाव्या आणि लोकशाही कार्यक्रमात सद्यस्थितीत पुढील धोरणांचा आणि मागण्यांचा समावेश होतो: १. सर्वंकष जमीन सुधारणा आणि शेतीसंबंधांची लोकशाही परिवर्तन; २. स्वावलंबी विकासमार्ग, आंतरराष्ट्रीय वित्त भांडवलावर कडक नियंत्रण, खाणी आणि नैसर्गिक तेल स्रोतांचे राष्ट्रियीकरण, नियोजित विकास आणि संतुलित वाढ; ३. आर्थिक आणि सामाजिक विषमतेत घट, मक्तेदारीवर नियंत्रण आणि सार्वजनिक क्षेत्राला प्रोत्साहन, संपत्तीचे पुनर्वाटप करण्यासाठी राजकोषीय आणि कर रचनेचे उपाय; ४. लोकशाही आणि संघराज्यीय व्यवस्थेचे संवर्धन करणारी व्यवस्था, केंद्र-राज्य संबंधांची पुनर्रचना आणि परिणामकारक लोकशाही विकेंद्रिकरण, लोकसाहीचा विस्तार व्हावा आणि खोली वाढावी यासाठि

घटनात्मक बदल, आंतरराष्ट्रीय करारावर संसदेने शिक्कामोर्तब करायची तरतूद; ५. उच्चस्तरीय भ्रष्टाचार रोखण्यासाठी कठोर उपाय, निवडणूक सुधारणा, अंशत: यादी पद्धतीचा समावेश असलेली प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची निवडणूक पद्धती; ६. धर्मनिरपेक्षतेचे मूलभूत तत्त्व म्हणून धर्म आणि शासन यांची फारकत घटनेत ग्रथित करणे, जमातवादी शक्तींना कह्यात ठेवण्यासाठी कठोर उपाययोजना करणे; ७. योग्य वेतन आणि सामाजिक सुरक्षेची हमी, व्वस्थापनात कामगारांना प्रतिनिधित्व अशा कामकरी जनतेच्या हक्कांचे संरक्षण; ८. अन्न आणि सर्व जीवनावश्यक वस्तू मिळण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था; ९. सर्वांना शिक्षण आणि आरोग्याचा हक्क मिळण्यासाठी सार्वजनिक शिक्षण आणि आरोग्य व्यवस्थांचा विकास; १०. जातीय अन्यायाचा अंत करून, स्त्रियांना समान अधिकार देऊन, दलित, अल्पसंख्य आणि आदिवासी जनतेला संरक्षण देऊन सामाजिक न्यायाची प्रस्थापना ११. पर्यावरणाचे संरक्षण, ऊर्जा, पाणी आणि इतर राष्ट्रीय संसाधनांवर सर्वांचा न्याय्य आणि समान हक्क; १२. साम्राज्यशाहीची अधिसत्ता नष्ट करण्यासाठी स्वतंत्र परराष्ट्र धोरण.

**पुढील कार्ये**

**२.१४९** जनतेच्या विविध विभागांच्या जीवनावर दुष्परिणाम करणाऱ्या सर्व नव-उदार धोरणांविरूद्ध लढा उभारणे हे प्रमुख कार्य आहे. कामगार वर्ग, शेतकरी, शेतमजूर, असंघटित (informal sector) क्षेत्रातील कामगार, तुटपुंजे वेतन मिळणारे आणि पगारदार, कारागीर आणि काम करणाऱ्या महिला - या साऱ्यांचे शोषण वाढते आहे; त्यांचे जीवन जगण्याची साधने नष्ट होत आहेत; आणि त्यांना त्यांच्या जमिनीवरून विस्थापित केले जात आहे. त्यांना आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत सुविधादेखील त्यांना मिळत नाहीत.

२.१५० स्थानिक, राज्य आणि राष्ट्रीय या सर्व स्तरांवर नव-उदार धोरणांविरुद्ध निर्धारपूर्वक लढा करणे.

२.१५१ आपला धर्मवादी, जमातवादी कार्यक्रम पुढे रेटायची संधी जमातवादी शक्ती सोडत नाहीत. रा. स्व. संघ आणि त्याची राजकीय शाखा असलेला भाजप हे बहुसंख्याक जमातवादाचे आणि हिंदुत्ववादी विचारसरणीचे प्रमुख वाहक आहेत. भाजपला निवडणुकीत काही प्रमाणात फटका बसलेला असला तरी त्याच्या धार्मिक तेढ निर्माण करायच्या कृत्त्यांत काही घट झालेली नाही. येत्या काळात हिंदुत्ववादी कृत्त्ये आणि आणि जमातवादाविरुद्ध संघर्ष केलाच पाहिजे. त्याचवेळी, अल्पसंख्याक जमातवाद आणि दहशतवाद यांना विरोध करण्यासाठी सावध आणि तयार राहिले पाहिजे.

२.१५२ संपुआ सरकार अमेरिकेसोबत लष्करी सहयोगासकट सर्व स्तरांवर

सामरिक आघाडी बळकट करायचा प्रयत्न करत आहे. या आघाडीचा देशांतर्गत धोरणांवर परिणाम होतो. आणि अशी आघाडी हाच स्वतंत्र परराष्ट्र धोरण घेण्यात प्रमुख अडसर आहे. भारत-अमेरिका सामरिक आघाडीला आणि त्याच्या सर्व रूपांना विरोध करायचा कार्यक्रम पक्षाने आणखी प्रखर केला पाहिजे. सर्व देशभक्त, लोकशाहीवादी स्तरांना या सामरिक आघाडीविरुद्ध संघटीत करून साम्राज्यशाहीने जगाला घातलेल्या विळख्याविरुद्ध आणि आपल्या देशाने स्वतंत्र परराष्ट्र धोरण स्वीकारावे म्हणून लढा उभा केला पाहिजे.

२.१५३ सर्वसाधारण लोकशाही व्यासपीठाचा भाग म्हणून दलित, आदिवासी, अल्पसंख्य, स्त्रिया आणि इतर दडपल्या विभागांच्या हक्कांचा पाठपुरावा पक्ष करत राहील.

२.१५४ प. बंगालमधील माकप आणि सर्व डाव्या शक्तींचे संरक्षण करण्यासाठी पक्ष जनतेला आणि लोकशाही शक्तींना संघटित करण्याचा प्रयत्न करील आणि तेथील जनतेवर होत असलेले हल्ले परतवून लावण्यासाठी संपूर्ण पक्ष अथकपणे लढत राहील.

२.१५५ पर्यायी धोरणांभोवती जास्तीत जास्त व्यापक लोकशाहीवादी आणि धर्मनिरपेक्ष शक्तींना संघटित करायचा प्रयत्न पक्ष करत राहील. डावी एकजूट बळकट करत, माओवाद्यांच्या विघातक कृत्यांविरुद्ध संघर्ष करण्यासाठी निर्धारपूर्वक लढा उभारत असताना सर्व डाव्या शक्ती एकवटण्याचा प्रयत्न पक्ष करत राहील.

२.१५६ कामगार वर्ग, शेतकरी, शेतमजूर, कारागीर आणि कामकरी वर्गांच्या इतर विभागांना संघटित करून मागण्यांच्या डाव्या आणि लोकशाहीवादी व्यासपीठावर जनविरोधी धोरणांविरुद्ध आणि जनतेच्या जगण्याच्या साधनांचे आणि हक्कांचे संरक्षण करण्यासाठी माकप लढत राहील. भांडवली पक्षांच्या प्रभावाखाली असलेल्या जनविभागांचे प्रश्न घेऊन त्यावर त्यांना संघटित लढ्यात आणून पक्षाने त्यांना आपल्याकडे वळवून घेण्याचा प्रयत्न करायला हवा.

## पुढील मार्गक्रमण

२.१५७ माकपची २०वी परिषद ही सर्व कार्ये पूर्ण करण्यासाठी अथक प्रयत्न करावेत अशी हाक पक्षाला देत आहे. कामकरी जनतेच्या हितावर गंभीर दुष्परिणाम करणाऱ्या नव-उदार धोरणांविरुद्धच्या लढ्यात पक्षाने अग्रभागी राहिले पाहिजे. जमीन, अन्न, रोजगार आणि सामाजिक न्याय यासाठी आपण लढे उभारले पाहिजेत. माकपने जमातवादी आणि फूट पाडणाऱ्या शक्तींशी लढा देत धर्मनिरपेक्षतेचे संरक्षण केले पाहिजे. सर्व क्षेत्रातील साम्राज्यवादी दबावाशी दोन हात करत राहिले पाहिजे.

i. पक्षावर होणारे हल्ले आणि पक्षाला अलग पाडण्याचे प्रयत्न लोकांच्या

आधाराने  निर्धाराने हाणून पाडू.

ii. मार्क्सवाद-लेनिनवादाची कास धरत डाव्या आणि लोकशाही व्यासपीठावर कष्टकरी जनतेच्या सर्व विभागांना संघटित करायचा अथक प्रयत्न पक्ष करत राहील.

iii. जनतेच्या सर्व स्तरांना संघटित करायची क्षमता असलेला एक ताकदवान कम्युनिस्ट पक्ष देशभर बांधू या.

iv. भारतीय जनतेचे वर्गीय शोषण आणि तिच्यावरील सामाजिक अत्याचार याविरुद्धचा संघर्ष नव्या जोमाने आणि अधिक निर्धाराने करत राहू. या मार्गानेच आपल्याला पर्यायी मार्गाने आगेकूच करता येईल – तो मार्ग आहे जनतेच्या लोकशाहीचा आणि समाजवादाचा.